| | | सुनावणीचा दि. 08.12.2025 | | वेळ सकाळी 10.30 वा. | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | अपील क्र. | अपीलार्थीचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | प्रथम अपीलीय अधिकारी | शेरा |
| 1 | 219/2025 | श्री. गाडेकर मुंजाराम ज्ञानोबा, रा. कालिका नगर, माजलगाव ता. माजलगांव जि. बीड | ज.मा.अ. जवाहर माध्यामिक व उच्च माध्यमिक विद्यालय केसापुरी वसाहत ता. माजलगाव जि. बीड | मुख्याध्यापक, जवाहर माध्यामिक व उच्च माध्यमिक विद्यालय केसापुरी वसाहत ता. माजलगाव जि. बीड | |
| 2 | 220/2025 | श्री. गाडेकर मुंजाराम ज्ञानोबा, रा. कालिका नगर, माजलगाव ता. माजलगांव जि. बीड | ज.मा.अ. महात्मा जोतिबा फुले माध्यामिक विद्यालय समता कॉलनी, माजलगांव ता. माजलगांव जि. बीड | मुख्याध्यापक, महात्मा जोतिबा फुले माध्यामिक विद्यालय समता कॉलनी, माजलगांव ता. माजलगांव जि. बीड | |
| 3 | 221/2025 | श्री. गाडेकर मुंजाराम ज्ञानोबा, रा. कालिका नगर, माजलगाव ता. माजलगांव जि. बीड | ज.मा.अ. महात्मा जोतिबा फुले माध्यामिक विद्यालय समता कॉलनी, माजलगांव ता. माजलगांव जि. बीड | मुख्याध्यापक, महात्मा जोतिबा फुले माध्यामिक विद्यालय समता कॉलनी, माजलगांव ता. माजलगांव जि. बीड | |
| 4 | 222/2025 | श्री. गाडेकर मुंजाराम ज्ञानोबा, रा. कालिका नगर, माजलगाव ता. माजलगांव जि. बीड | ज.मा.अ. महात्मा जोतिबा फुले माध्यामिक विद्यालय समता कॉलनी, माजलगांव ता. माजलगांव जि. बीड | मुख्याध्यापक, महात्मा जोतिबा फुले माध्यामिक विद्यालय समता कॉलनी, माजलगांव ता. माजलगांव जि. बीड | |
| 5 | 223/2025 | श्री. गाडेकर मुंजाराम ज्ञानोबा, रा. कालिका नगर, माजलगाव ता. माजलगांव जि. बीड | ज.मा.अ. जवाहर माध्यामिक व उच्च माध्यमिक विद्यालय केसापुरी वसाहत ता. माजलगाव जि. बीड | मुख्याध्यापक, जवाहर माध्यामिक व उच्च माध्यमिक विद्यालय केसापुरी वसाहत ता. माजलगाव जि. बीड | |
| 6 | 224/2025 | श्री. गाडेकर मुंजाराम ज्ञानोबा, रा. कालिका नगर, माजलगाव ता. माजलगांव जि. बीड | ज.मा.अ. जवाहर माध्यामिक व उच्च माध्यमिक विद्यालय केसापुरी वसाहत ता. माजलगाव जि. बीड | मुख्याध्यापक, जवाहर माध्यामिक व उच्च माध्यमिक विद्यालय केसापुरी वसाहत ता. माजलगाव जि. बीड | |
| 7 | 225/2025 | श्री. गाडेकर मुंजाराम ज्ञानोबा, रा. कालिका नगर, माजलगाव ता. माजलगांव जि. बीड | ज.मा.अ. जवाहर माध्यामिक व उच्च माध्यमिक विद्यालय केसापुरी वसाहत ता. माजलगाव जि. बीड | मुख्याध्यापक, जवाहर माध्यामिक व उच्च माध्यमिक विद्यालय केसापुरी वसाहत ता. माजलगाव जि. बीड | |
| 8 | 226/2025 | श्री. गाडेकर मुंजाराम ज्ञानोबा, रा. कालिका नगर, माजलगाव ता. माजलगांव जि. बीड | ज.मा.अ. जवाहर माध्यामिक व उच्च माध्यमिक विद्यालय केसापुरी वसाहत ता. माजलगाव जि. बीड | मुख्याध्यापक, जवाहर माध्यामिक व उच्च माध्यमिक विद्यालय केसापुरी वसाहत ता. माजलगाव जि. बीड | |
| 9 | 1510/2025 | श्री. मिर्झा शारेख बेग खुर्शिद बेग, व्दारा. मिर्झा सज्जाद बेग, हत्ती खाना कागदी दरवाजा, बीड | मुख्याध्यापक, अलहुदा उर्दु माध्यामिक शाळा, शहिनशाह नगर, बार्शी रोड, बीड | शिक्षणधिकारी (माध्यामिक), जिल्हा परिषद बीड | |
| 10 | 2192/2025 | श्री. सचिन कमलाकरराव जोशी, रा. रत्नकमल निवास, विठ्ठल मंदिरा समोर, विठ्ठल नगर, शाहू नगर, जालना रोड, बीड | ज.मा.अ. स्वातंत्र सेननी रामराव आवरगावकर विधी महाविद्यालय बर्शी रोड, बीड | प्राचार्य, स्वातंत्र सेननी रामराव आवरगावकर विधी महाविद्यालय बर्शी रोड, बीड | |
| | | सहाय्यकाचे नांव व स्वाक्षरी | | लघुलेखकाचे नांव व स्वाक्षरी | |

| | | सुनावणीचा दि. 08.12.2025 | | वेळ सकाळी 10.30 वा. | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | अपील क्र. | अपीलार्थीचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | प्रथम अपीलीय अधिकारी | शेरा |
| 11 | 2211/ 2025 | श्री. राजेश बालाजी वाहुळे, रा. माऊलीनगर, यशवंतराव चौक, अंबाजोगाई ता. अंबाजोगाई जि.बीड | ज.मा.अ. यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबजोगाई जि.बीड | प्राचार्य, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबजोगाई जि.बीड | |
| 12 | 2212/ 2025 | श्री. राजेश बालाजी वाहुळे, रा. माऊलीनगर, यशवंतराव चौक, अंबाजोगाई ता. अंबाजोगाई जि.बीड | ज.मा.अ. यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबजोगाई जि.बीड | प्राचार्य, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबजोगाई जि.बीड | |
| 13 | 2213/ 2025 | श्री. राजेश बालाजी वाहुळे, रा. माऊलीनगर, यशवंतराव चौक, अंबाजोगाई ता. अंबाजोगाई जि.बीड | ज.मा.अ. यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबजोगाई जि.बीड | प्राचार्य, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबजोगाई जि.बीड | |
| 14 | 2214/ 2025 | श्री. राजेश बालाजी वाहुळे, रा. माऊलीनगर, यशवंतराव चौक, अंबाजोगाई ता. अंबाजोगाई जि.बीड | ज.मा.अ. यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबजोगाई जि.बीड | प्राचार्य, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबजोगाई जि.बीड | |
| 15 | 2215/ 2025 | श्री. राजेश बालाजी वाहुळे, रा. माऊलीनगर, यशवंतराव चौक, अंबाजोगाई ता. अंबाजोगाई जि.बीड | ज.मा.अ. यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबजोगाई जि.बीड | प्राचार्य, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबजोगाई जि.बीड | |
| 16 | 2216/ 2025 | श्री. राजेश बालाजी वाहुळे, रा. माऊलीनगर, यशवंतराव चौक, अंबाजोगाई ता. अंबाजोगाई जि.बीड | ज.मा.अ. यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबजोगाई जि.बीड | प्राचार्य, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबजोगाई जि.बीड | |
| 17 | 2217/ 2025 | श्री. राजेश बालाजी वाहुळे, रा. माऊलीनगर, यशवंतराव चौक, अंबाजोगाई ता. अंबाजोगाई जि.बीड | ज.मा.अ. यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबजोगाई जि.बीड | प्राचार्य, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबजोगाई जि.बीड | |
| 18 | 2908/ 2025 | श्री. बापुराव विष्णु खोत पाटील, रा. गुरुकृपा निवास शंकरपार्वती नगर, परळी वैजीनाथ ता. परळी वैजीनाथ जि. बीड | ज.मा.अ. शिवछत्रपती प्राथमिक विद्यालय परळी वैजीनाथ जि. बीड | मुख्याध्यापक, शिवछत्रपती प्राथमिक विद्यालय परळी वैजीनाथ जि. बीड | |
| 19 | 2941/ 2025 | श्री. साहेल खान ताजोदिन खान, रा.हत्तीखान बीड | उप मुख्यध्यापक, मिल्लीय माध्यामिक शाळा (मुलांची), बीड | मुख्यध्यापक, मिल्लीय माध्यामिक शाळा (मुलांची), बीड | |
| 20 | 3629/ 2025 | श्री. नानासाहेब एकनाथ वाघिरे, मु.पो. दासखेडा ता. पाटोदा जि. बीड | जेष्ठ शिक्षक, रामकष्ण माध्यामिक व उच्च माध्यामिक विद्यालय बारेगाव बु ता.केज जि. बीड | मुख्याध्यापक, रामकष्ण माध्यामिक व उच्च माध्यामिक विद्यालय बारेगाव बु ता.केज जि. बीड | |
| | | सहाय्यकाचे नांव व स्वाक्षरी | | लघुलेखकाचे नांव व स्वाक्षरी | |

| | | सुनावणीचा दि. 08.12.2025 | | वेळ सकाळी 10.30 वा. | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | अपील क्र. | अपीलार्थीचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | प्रथम अपीलीय अधिकारी | शेरा |
| 21 | 4385/ 2025 | श्री. शेख वसीम शेख सलीम, रा. आदर्श नगर तेलगाव नाका, बीड | ज.मा.अ. स्वा.से. रामराव आवरगावकर विधी महाविद्यालय बार्शि रोड, बीड | प्राचार्य स्वा.से. रामराव आवरगावकर विधी महाविद्यालय बार्शि रोड, बीड | |
| 22 | 4386/ 2025 | श्री. शेख वसीम शेख सलीम, रा. आदर्श नगर तेलगाव नाका, बीड | ज.मा.अ. स्वा.से. रामराव आवरगावकर विधी महाविद्यालय बार्शि रोड, बीड | प्राचार्य स्वा.से. रामराव आवरगावकर विधी महाविद्यालय बार्शि रोड, बीड | |
| 23 | 4216/ 2025 | श्री. तांबे नितीन मुधुकरराव मु.पो. तांबाराजुरी ता. पाटोदा जि. बीड | ज.मा.अ. माध्यामिक विद्यालय तांबाराजुरी ता. पाटोदा जि. बीड | मुख्याध्यापक, माध्यामिक विद्यालय तांबाराजुरी ता. पाटोदा जि. बीड | |
| 24 | 4196/ 2025 | श्री. रविंद्र नारायण मुंडे, मु.पो. ताडसोन्ना ता.जि. बीड | ज.मा.अ. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा ताडसोन्ना ता.जि. बीड | मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा ताडसोन्ना ता.जि. बीड | |
| 25 | 4534/ 2025 | श्री. शिवराज दिपील नेहरकर, रा. धावडी पो. आडस ता. अंबजोगाई जि. बीड | मुख्य लिपीक, संलग्न, सहाय्यक निबंधक सहकारी संस्था माजलगाव जि. बीड | सहाय्यक निबंधक, सहाय्यक निबंधक सहकारी संस्था माजलगाव जि. बीड | |
| 26 | 1392/ 2025 | ॲड. सदानंद म. वाघमारे,रा. सरस्वती शाळेजवळ, पंचशील नगर, ता. जि. बीड | मुख्यालय सहाय्यक, उप अधिक्षक भुमि अभिलेख कार्यालय बीड | उप अधिक्षक भुमि अभिलेख कार्यालय बीड | |
| 27 | 4334/ 2025 | श्री. भानुदास शिवाजी जेवे, रा. प्लॉट क्र. 69, अनुग्रह जबिंदा बंगलो शेजारी, देवानगरी दर्गा रोड, छत्रपती संभाजीनगर | मुख्यालय सहाय्यक, उप अधिक्षक भुमि अभिलेख कार्यालय, आष्टी जि.बीड | उप अधिक्षक भुमि अभिलेख कार्यालय, आष्टी जि.बीड | |
| 28 | 2754/ 2025 | श्री. प्रशात जयमल्हार बिडवई, रा. गणेश ईस्टेट एजन्सी चाळ रुम नंबर 02, गांधीनगर नियर साई सागर हॉटेल मांजर्ली रोड, वौशाली टॉकीजच्यामागे बदलापुर [illegible] | ज.मा.अ.प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय, बीड | उप प्रादशिक परिवहन अधिकारी, प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय, बीड | |
| 29 | 2119/ 2025 | श्री. प्रतीक नवनाथ सरवदे, रा. महात्मा फुले नगर, धानोरा रोड, बीड | प्रशासकीय अधिकारी, जिल्हा रुग्णालय बीड | जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, बीड | |
| 30 | 2122/ 2025 | श्री. प्रतीक नवनाथ सरवदे, रा. महात्मा फुले नगर, धानोरा रोड, बीड | प्रशासकीय अधिकारी, जिल्हा रुग्णालय बीड | जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, बीड | |
| | | सहाय्यकाचे नांव व स्वाक्षरी | | लघुलेखकाचे नांव व स्वाक्षरी | |

| | | सुनावणीचा दि. 08.12.2025 | | वेळ सकाळी 10.30 वा. | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | अपील क्र. | अपीलार्थीचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | प्रथम अपीलीय अधिकारी | शेरा |
| 31 | 3542/2025 | श्री. प्रविण धनाजी शेजुळ, मु. दिडगाव पो. बोरगाव बाजार, ता. सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर | जिल्हा हिवताप अधिकारी, जिल्हा हिवताप कार्यालय बीड | सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा हिवताप, लातुर | |
| 32 | 542/2025 | ॲड. शरद रावसाहेब चौधरी, मु.पो. सिव्हल कोर्ट आष्टी ता. आष्टी जि. बीड | दुय्यम निबंधक श्रेणी-01, दुय्यम निबंधक कार्यालय, जुनी तहसिल इमरात आष्टी जि.बीड | सह जिल्हा निबंधक वर्ग-01, तथा मुद्राक जिल्हाअधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर नगर रोड, बीड | |
| 33 | 3817/2025 | श्री. राहुल विनायकाराव चाळक, मु. ताकडगाव पो. केकतपांगरी ता. गेवराई जि. बीड | सरकारी कामगार अधिकारी, सरकारी कामगार अधिकारी कार्यालय, आदर्श नगर, डी.पी. रोड, बीड-431122 | सहाय्यक कामगार आयुक्त, सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालय, सदभावना नगर, विजय गॅस एजन्सी जवळ औसा रोड, लातुर | |
| 34 | 4656/2025 | श्री. रमेश भागचंद शिंदे, रा. पईपलाईनरोड सावेडी, अहिल्यानगर | जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, महिला व बाल विकास विभाग, बीड | विभागीय उप आयुक्त, महिला व बाल विकास ज्युबिली पार्क, पॅरामाऊंट मेडीकल स्टोअरच्या पाठीमागे, जिंदानी लॉब जवळ, छत्रपती संभाजीनगर | |
| 35 | 4549/2025 | श्री. विलास किसनराव ढोले रा. छत्रपती कॉलनी धांडेनगर बीड | ज.मा.अ. महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी शहर उपविभाग, बीड | ज.अ.अ. महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी शहर उपविभाग, बीड | |
| 36 | 4559/2025 | श्री. उमेश आश्रु क्षिरसागर, रा. चुबळी पो. तांबाराजुरी ता. पटोदा जि. बीड | कार्यकारी अभियंता (प्रशासन), माहाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी, मर्यादित, बीड | अधिक्षक अभियंता, माहाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी, मर्यादित, बीड | |
| 37 | 4917/2025 | श्री. विलास किसनराव ढोले रा. छत्रपती कॉलनी धांडेनगर बीड | अतिरिक्त कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी शहर उपविभाग, बीड | कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी शहर उपविभाग, बीड | |
| 38 | 4215/2025 | श्री. शेख गुलाम मुस्तफा गुलाम, रा. शहीशहानगर, मेराज मस्जीद जवळ मोहसीन किरणा स्टोअर्स समोर, बीड | उप कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्या. विभागीय कार्यालय अंबाजोगाई जि. बीड | अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मार्या मंडळ कार्यालय बीड | |
| 39 | 2569/2025 | श्री. तांबे नितीन मधुकरराव, मु.पो. तांबाराजुरी ता. पटोदा जि. बीड | ज.मा.अ. महाराष्ट्र राज्य विदुत वितरण कंपनी मर्यादित उपविभागीय कार्यालय पाटोदा जि. बीड | उप कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विदुत वितरण कंपनी मर्यादित उपविभागीय कार्यालय पाटोदा जि. बीड | |
| 40 | 2610/2025 | श्री. धुराजी कचरु शेजाळ, रा. शिक्षक कॉलनी, आसरडोह रोड धारुर ता. धारुर जि. बीड | उप कार्यकारी अभियंता, जायकवाडी पाटबंधारे विभाग क्र. 03 बीड | कार्यकारी अभियंता, जायकवाडी पाटबंधारे विभाग क्र. 03 बीड | |
| | | सहाय्यकाचे नांव व स्वाक्षरी | | लघुलेखकाचे नांव व स्वाक्षरी | |

| | | सुनावणीचा दि. 08.12.2025 | | वेळ सकाळी 10.30 वा. | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | अपील क्र. | अपीलार्थीचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | प्रथम अपीलीय अधिकारी | शेरा |
| 41 | 3368/2025 | श्री. बालासाहेब दामोधरराव फपाळ पाटील, मु.पो. तेलगाव (बु), ता. धारूर जि. बीड | उपविभागीय जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण उपविभाग-तेलगाव ता. धारूर जि. बीड | जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, जायकवाडी कॉलनी नगर रोड, बीड | |
| 42 | 3882/2025 | श्री. सुनिल रामु चव्हाण, रा. जायकवाडी नाथ नगर (उत्तर), ता. पैठण जि. छत्रपती संभाजीनगर | उप विभागीय अभियंता, गोदावारी पाटबंधारे विकास महामंडळ, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण अहमदनगर रोड जायकवाडी वसाहत बीड | कार्यकारी अभियंता, गोदावारी पाटबंधारे विकास महामंडळ, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण अहमदनगर रोड जायकवाडी वसाहत बीड | |
| 43 | 4007/2025 | श्री. भानुदास शिवाजी जेवे, रा. प्लॉट नंबर 69, अनुग्रह जिबिंद बंगलो शेजारी देवनागरी दर्गा रोड, छत्रपती संभाजीनगर | सहाय्यक जिल्हा जलसंधारण अधिकारी जिल्हा परिषद लघु पाटबंधारे उपविभाग आष्टी जि.बीड | उपविभागीय अधिकारी, जिल्हा जलसंधारण अधिकारी जिल्हा परिषद लघु पाटबंधारे उपविभाग आष्टी जि.बीड | |
| 44 | 4690/2025 | श्री. सय्यद सादेक आसद अली, रा. लाईन गल्ली कांरजारोड, बीड-431122 | उप विभागीय अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उपविभाग, बीड | कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवण प्रधिकरण विभाग, बीड | |
| 45 | 1610/2025 | श्री. मोहंमद इम्रान हारुण, रा. प्लॉट नंबर 47, मोतीवाला नगर, एम.जी.एम. हॉस्पीटल समोर, छत्रपती संभाजीनगर | सहा. प्रशासन अधिकारी, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालय, बीड | जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालय, बीड | |
| 46 | 3883/2025 | श्री. हरिभाऊ नामदेव वनवे, मु.पो. रोहतवाडी ता. पटोदा जि. बीड | कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी कार्यालय पाटोदा जि. बीड | तालुका कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी कार्यालय पाटोदा जि. बीड | |
| 47 | 2305/2025 | ॲड. सदानंद मा. वाघमारे, रा. सरस्वती शाळेजवळ, पंचशीला नगर ता. जि. बीड | मुख्यालय सहाय्यक, कार्यकारी अभियंता यांत्रिक विभाग नगर रोड बीड | कार्यकारी अभियंता यांत्रिक विभाग नगर रोड बीड | |
| 48 | 2306/2025 | ॲड. सदानंद मा. वाघमारे, रा. सरस्वती शाळेजवळ, पंचशीला नगर ता. जि. बीड | मुख्यालय सहाय्यक, कार्यकारी अभियंता यांत्रिक विभाग नगर रोड बीड | कार्यकारी अभियंता यांत्रिक विभाग नगर रोड बीड | |
| 49 | 4433/2025 | ॲड. सदानंद म. वाघमारे, रा. सरस्वती शाळेजवळ पंचशीला नगर, ता.जि. बीड | उप कार्यकारी अभियंता, यांत्रिक विभाग, जायकवाडी वसाहत, नगर रोड, बीड | कार्यकारी अभियंता, यांत्रिक विभाग, जायकवाडी वसाहत, नगर रोड, बीड | |
| 50 | 2592/2025 | ॲड. आशोक दे शेटे, रा. पालवन चौक, पालवन रोड, नाथनगर ता.जि. बीड-431122 | उप कार्यकारी अभियंता, यात्रीक विभाग नगर रोड जायकवाडी वसाहत बीड-431122 | कार्यकारी अभियंता, यात्रीक विभाग नगर रोड जायकवाडी वसाहत बीड-431122 | |
| | | सहाय्यकाचे नांव व स्वाक्षरी | | लघुलेखकाचे नांव व स्वाक्षरी | |

| | | सुनावणीचा दि. 08.12.2025 | | वेळ सकाळी 10.30 वा. | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | अपील क्र. | अपीलार्थीचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | प्रथम अपीलीय अधिकारी | शेरा |
| 51 | 4457/ 2025 | श्री. पाराराम गोविंद यादव , मु. धुनकवाडी ता. धारुर जि.बीड | ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय धुनकवाडी ता. धारुर जि. बीड | सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, नगर रोड, बीड | |
| 52 | 3125/ 2025 | श्री. तांदळे गणेश बन्सीधर, रा. श्रीराम नगर, नगर रोड, बीड | सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, नगर रोड, बीड | प्रादेशिक उपसंचालक, इतर मागास बहुजन कल्याण (प्रादेशि) विभाग, दुसरा मजला, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, खाकडपुरा, छत्रपती संभाजीनगर | |
| 53 | 883/2 025 | श्री. संपत शिवाजी सायकड, रा. आष्टी ता. आष्टी जि. बीड | उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, आष्टी जि. बीड | कार्यकारी अभियता, सार्वजनिक बांधकाम विभाग, बीड | |
| 54 | 884/2 025 | श्री. संपत शिवाजी सायकड, रा. आष्टी ता. आष्टी जि. बीड | उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, आष्टी जि. बीड | कार्यकारी अभियता, सार्वजनिक बांधकाम विभाग, बीड | |
| 55 | 1897/ 2025 | श्री. मुहंमद अबुबकर खमर पाशा, व्दारा कोहीनुर बेकरी बाबा चौक भालदारपुरा बीड | उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उप विभाग, बीड | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, बीड | |
| 56 | 1897/ 2025 | श्री. मुहंमद अबुबकर खमर पाशा, व्दारा कोहीनुर बेकरी बाबा चौक भालदारपुरा बीड | उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उप विभाग, बीड | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, बीड | |
| 57 | 1967/ 2025 | श्री. अब्दुल समद खान पिता मन्सुर खान, रा. मंडीबाजार अंबाजोगाई ता. अंबाजोगाई जि. बीड | ज.मा.अ. सार्वजनिक बांधकाम उप विभाग, अंबाजोगाई जि. बीड | उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उप विभाग, अंबाजोगाई जि. बीड | |
| 58 | 2218/ 2025 | श्री. शेख आखिल उस्मान, रा. भंडार गल्ली जुना बाजार, बीड | उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, बीड | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, बीड | |
| 59 | 2335/ 2025 | श्री. मनोहर चिमाजी चाळक, रा. शास्त्री चौक रोडच्या पश्चिम बाजुस, नगर परिषद कोर्ट रोडच्या दक्षिण बाजुस गेवराई ता. गेवराई जि.बीड | उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, गेवराई जि. बीड | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, बीड | |
| 60 | 2857/ 2025 | श्री. शेख जाफर चॉद, मु.पो. केरुळ ता.आष्टी जि.बीड | उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग आष्टी जि. बीड | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. 02 बीड | |
| | | सहाय्यकाचे नांव व स्वाक्षरी | | लघुलेखकाचे नांव व स्वाक्षरी | |

| | | सुनावणीचा दि. 08.12.2025 | | वेळ सकाळी 10.30 वा. | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | अपील क्र. | अपीलार्थीचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | प्रथम अपीलीय अधिकारी | शेरा |
| 61 | 2876/2025 | श्री. वैजनाथ ज्ञानोबा गित्ते, रा. नांदागौळ, ता. परळी वैजीनाथ जि. बीड | ज.मा.अ. सार्वजनिक बांधकाम उपविभाग अंबाजोगाई जि.बीड | उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग अंबाजोगाई जि.बीड | |
| 62 | 5107/2025 | श्री. वासुदेव ज्ञानोबाराव डोंगरे, रा. बसस्टँड जवळ केज ता. केज जि.बीड | ज.मा.अ. सार्वजनिक बांधकाम उपविभाग केज जि. बीड | उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग केज जि. बीड | |
| 63 | 145/2025 | श्री. सलीम कादर शेख, रा. वार्ड नंबर 04, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर-4113709 | वन क्षेत्रपाल, सामाजिक वनिकरण परिक्षेत्र कार्यालय, माजलगांव जि. बीड | सहाय्यक वनसंरक्षक, सामाजिक वनिकरण विभाग, बी.डी. आदर्श नगर, ऑफिसच्या पाठीमागे, एल.एन.एस.पी. रोड, बीड | |
| 64 | 146/2025 | श्री. सलीम कादर शेख, रा. वार्ड नंबर 04, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर-4113709 | वन क्षेत्रपाल, सामाजिक वनिकरण परिक्षेत्र कार्यालय, गेवराई जि. बीड | सहाय्यक वनसंरक्षक, सामाजिक वनिकरण विभाग, बी.डी. आदर्श नगर, ऑफिसच्या पाठीमागे, एल.एन.एस.पी. रोड, बीड | |
| 65 | 147/2025 | श्री. सलीम कादर शेख, रा. वार्ड नंबर 04, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर-4113709 | वन क्षेत्रपाल, सामाजिक वनिकरण परिक्षेत्र कार्यालय, केज जि. बीड | सहाय्यक वनसंरक्षक, सामाजिक वनिकरण विभाग, बी.डी. आदर्श नगर, ऑफिसच्या पाठीमागे, एल.एन.एस.पी. रोड, बीड | |
| 66 | 148/2025 | श्री. सलीम कादर शेख, रा. वार्ड नंबर 04, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर-4113709 | वन क्षेत्रपाल, सामाजिक वनिकरण परिक्षेत्र कार्यालय, धारुर जि. बीड | सहाय्यक वनसंरक्षक, सामाजिक वनिकरण विभाग, बी.डी. आदर्श नगर, ऑफिसच्या पाठीमागे, एल.एन.एस.पी. रोड, बीड | |
| 67 | 149/2025 | श्री. सलीम कादर शेख, रा. वार्ड नंबर 04, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर-4113709 | वन क्षेत्रपाल, सामाजिक वनिकरण परिक्षेत्र कार्यालय, आष्टी जि. बीड | सहाय्यक वनसंरक्षक, सामाजिक वनिकरण विभाग, बी.डी. आदर्श नगर, ऑफिसच्या पाठीमागे, एल.एन.एस.पी. रोड, बीड | |
| 68 | 150/2025 | श्री. सलीम कादर शेख, रा. वार्ड नंबर 04, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर-4113709 | वन क्षेत्रपाल, सामाजिक वनिकरण परिक्षेत्र कार्यालय, अंबाजोगाई जि. बीड | सहाय्यक वनसंरक्षक, सामाजिक वनिकरण विभाग, बी.डी. आदर्श नगर, ऑफिसच्या पाठीमागे, एल.एन.एस.पी. रोड, बीड | |
| 69 | 482/2025 | श्री. सलीम कादर शेख, रा. वार्ड नंबर 04, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर-4113709 | वनक्षेत्रपाल सामाजिक वनिकरण परिक्षेत्र शिरुर कासार जि. बीड | सहाय्यक वनसंरक्षक, सामाजिक वनिकरण विभाग, बी.डी. आदर्श नगर, ऑफिसच्या पाठीमागे, एल.एन.एस.पी. रोड, बीड | |
| 70 | 483/2025 | श्री. सलीम कादर शेख, रा. वार्ड नंबर 04, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर-4113709 | वनक्षेत्रपाल सामाजिक वनिकरण परिक्षेत्र वडवणी जि. बीड | सहाय्यक वनसंरक्षक, सामाजिक वनिकरण विभाग, बी.डी. आदर्श नगर, ऑफिसच्या पाठीमागे, एल.एन.एस.पी. रोड, बीड | |

सहाय्यकाचे नांव व स्वाक्षरी

लघुलेखकाचे नांव व स्वाक्षरी

| | | सुनावणीचा दि. 08.12.2025 | | वेळ दुपारी 02.30 वा. | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | अपील क्र. | अपीलार्थीचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | प्रथम अपीलीय अधिकारी | शेरा |
| 71 | 484/2025 | श्री. सलीम कादर शेख, रा. वार्ड नंबर 04, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर-4113709 | वनक्षेत्रपाल सामाजिक वनिकरण परिक्षेत्र बीड | सहाय्यक वनसंरक्षक, सामाजिक वनिकरण विभाग, बी.डी. आदर्श नगर, ऑफिसच्या पाठीमागे, एल.एन.एस.पी. रोड, बीड | |
| 72 | 485/2025 | श्री. सलीम कादर शेख, रा. वार्ड नंबर 04, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर-4113709 | वनक्षेत्रपाल सामाजिक वनिकरण परिक्षेत्र पाटोदा जि. बीड | सहाय्यक वनसंरक्षक, सामाजिक वनिकरण विभाग, बी.डी. आदर्श नगर, ऑफिसच्या पाठीमागे, एल.एन.एस.पी. रोड, बीड | |
| 73 | 486/2025 | श्री. सलीम कादर शेख, रा. वार्ड नंबर 04, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर-4113709 | वनक्षेत्रपाल सामाजिक वनिकरण परिक्षेत्र परळी वैजीनाथ जि. बीड | सहाय्यक वनसंरक्षक, सामाजिक वनिकरण विभाग, बी.डी. आदर्श नगर, ऑफिसच्या पाठीमागे, एल.एन.एस.पी. रोड, बीड | |
| 74 | 1989/2025 | श्री. तांदळे सुनिल जनार्धन, रा. येवलवाडी (ना), पो.पाटोदा ता. पाटोदा जि. बीड | वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक) परिक्षेत्र आष्टी जि. बीड | विभागीय वन अधिकारी (प्रादेशिक) वन विभाग लेंढी रोड, बीड | |
| 75 | 1997/2025 | श्री. नंदु सुकदेव वैसणे, रा. महाले नगर मोगलाई धुळे-424001 | वनपरिक्षेत्र अधिकारी (वन्यजीव) नायगाव जि. बीड | सहाय्यक वनसंरक्षक (वन्यजीव), पैठण स्थित नविन प्रशासकीय इमारात दुसरा मजला चुन्नीलाल पेट्रोल पंपाच्या मागे वनसाहत उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर | |
| 76 | 3632/2025 | कैलास दत्तात्रय दरेकर, रा. जगदंबादेवी मंदिराजवळ सायकड गल्ली आष्टी ता. आष्टी जि.बीड | ज.मा.अ. विभागीय वन अधिकारी (प्रादेशिक) कार्यालय, लेडी रोड, बीड | ज.अ.अ. विभागीय वन अधिकारी (प्रादेशिक) कार्यालय, लेडी रोड, बीड | |
| 77 | 3643/2025 | श्री. शेख जाफर चाँद, रा. सुदर्शन नगर लेन-02, गुरुकृपा रेसिडेसी फ्लॅट नंबर 01 पिंपळगुरव, पुणे-411061 | वन परिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक) परिक्षेत्र आष्टी जि. बीड | विभागीय वन अधिकारी, विभागीय वन अधिकारी कार्यालय बीड | |
| 78 | 6945/2025 | श्रीमती. जरीफा बेगम रहीम शेख, रा. दर्गा मसिजिद जवळ, बालेपीर बीड | मुख्य लेखापाल विभागीय वन अधिकारी (प्रादेशिक), खासबाग लेंडी रोड, बीड | विभागीय वन अधिकारी, विभागीय वन अधिकारी कार्यालय खासबाग लेंडी रोड, बीड | |
| 79 | 4875/2025 | श्री. प्रविण कचरु वाव्हळ, मु.पो. ढवळपुरी ता. परनेर जि. अहिल्यानगर | वनक्षेत्रपाल, सामाजिक वनिकरण परिक्षेत्र शिरुर कासार जि. बीड | सहाय्यक वनसंरक्षक, सामाजिक वनिकरण विभाग, बीड | |
| 80 | 4876/2025 | श्री. प्रविण कचरु वाव्हळ, मु.पो. ढवळपुरी ता. परनेर जि. अहिल्यानगर | वनक्षेत्रपाल, सामाजिक वनिकरण परिक्षेत्र शिरुर कासार जि. बीड | सहाय्यक वनसंरक्षक, सामाजिक वनिकरण विभाग, बीड | |
| | | सहाय्यकाचे नांव व स्वाक्षरी | | लघुलेखकाचे नांव व स्वाक्षरी | |

| | | सुनावणीचा दि. 08.12.2025 | | वेळ दुपारी 02.30 वा. | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | अपील क्र. | अपीलार्थीचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | प्रथम अपीलीय अधिकारी | शेरा |
| 81 | 276/2025 | श्री. रामभाऊ सिताराम आंवुलकर, रा. प्लॉट नंबर 16, रमानगर (85, प्लॉट ऐरिया), बेलतरोडी रोड, नागपुर-440027 | पोलीस निरीक्षक, जिल्हा विशेष शाखा पोलीस अधिक्षक कार्यालय, बीड | पोलीस उप अधिक्षक (मुख्यालय), पोलीस अधिक्षक कार्यालय, बीड | |
| 82 | 421/2025 | श्री. प्रतीक नवनाथ सरोदे, रा. महात्मा फुले नगर, धानोरा रोड, बीड | कार्यालय अधिक्षक, पोलीस अधिक्षक कार्यालय बीड | पोलीस उप अधिक्षक (मुख्यालय), पोलीस अधिक्षक कार्यालय, बीड | |
| 83 | 600/2025 | श्री. महादेव भिमराव केंद्रे, रा. भोजनकवाडी पो. धर्मापुरी ता. परळी वैजीनाथ जि. बीड | पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन बीड | अपर पोलीस अधिक्षक, पोलीस अधिक्षक कार्यालय बीड | |
| 84 | 1311/2025 | श्री. रमेश भागचंद शिंदे, रा. भोसे ता. पाथर्डी जि. अहिल्यानगर | कार्यालय अधिक्षक, पोलीस अधिक्षक कार्यालय बीड | पोलीस उप अधिक्षक (मुख्यालय), पोलीस अधिक्षक कार्यालय बीड | |
| 85 | 1469/2025 | श्री. वैजनाथ शामराव सुरवसे, रा. हॉटेल शिव जगदंब मलबा हॉस्पिटल शेजारी भवानी रोड, तुळजापुर ता. तुळजापुर जि. धाराशिव | ज.मा.अ. पोलीस स्टेशन परळी वैजीनाथ जि. बीड | पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन परळी वैजीनाथ जि. बीड | |
| 86 | 1470/2025 | श्री. वैजनाथ शामराव सुरवसे, रा. हॉटेल शिव जगदंब मलबा हॉस्पिटल शेजारी भवानी रोड, तुळजापुर ता. तुळजापुर जि. धाराशिव | पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन दिंद्रुड ता. धारुर जि. बीड | पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन धारुर जि. बीड | |
| 87 | 1472/2025 | श्री. वैजनाथ शामराव सुरवसे, रा. हॉटेल शिव जगदंब मलबा हॉस्पिटल शेजारी भवानी रोड, तुळजापुर ता. तुळजापुर जि. धाराशिव | ज.मा.अ. पोलीस स्टेशन बर्दापुर ता. अंबाजोगाई जि. बीड | पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन बर्दापुर ता. अंबाजोगाई जि. बीड | |
| 88 | 1473/2025 | श्री. वैजनाथ शामराव सुरवसे, रा. हॉटेल शिव जगदंब मलबा हॉस्पिटल शेजारी भवानी रोड, तुळजापुर ता. तुळजापुर जि. धाराशिव | ज.मा.अ. पोलीस स्टेशन बर्दापुर ता. अंबाजोगाई जि. बीड | पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन बर्दापुर ता. अंबाजोगाई जि. बीड | |
| 89 | 1679/2025 | श्री. बाबासाहेब ज्योतिराम शिंदे, रा. चिंचगव्हाण ता. माजलगांव जि. बीड | पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन माजलगाव जि. बीड | सहायक पोलीसस अधिकारी, उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय माजलगाव जि. बीड | |
| 90 | 2256/2025 | श्री. वामन एकनाथ उगले, रा. प्रगती चाळ नंबर 02, रुम नंबर 8686, सावंत पार्कच्या पाठीमागे, खदानीजवळ, महालक्ष्मीनगर, अंबरनाथ (पुर्व), जि. ठाणे | पोलीस निरीक्षक, जिल्हा विशेष शाखा पोलीस अधिक्षक कार्यालय, बीड | जिल्हा पोलीस अधिक्षक, पोलीस अधिक्षक कार्यालय, बीड | |

सहाय्यकाचे नांव व स्वाक्षरी

लघुलेखकाचे नांव व स्वाक्षरी

| | | सुनावणीचा दि. 08.12.2025 | | वेळ दुपारी 02.30 वा. | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | अपील क्र. | अपीलार्थीचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | प्रथम अपीलीय अधिकारी | शेरा |
| 91 | 2334/2025 | सौ. मनिषा धनंजय देशपांडे, रा. पवारवाडी विठ्ठल मंदिराजवळ त्रिमुर्ती निवास, चाळीसगाव जि. जळगाव | पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन गेवराई जि.बीड | उपविभागीय पोलीस अधिकारी, उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय गेवराई जि. बीड | |
| 92 | 3973/2025 | श्री. महारुद्र राजेंद्र डोईफोडे, रा. राजमुद्रा प्रतिष्ठान शिवाजी धांडे नगर बार्शी रोड, बीड | कार्यालय अधिक्षक, पोलीस अधिक्षक कार्यालय, बीड | पोलीस उप अधिक्षक (गृह), पोलीस अधिक्षक कार्यालय बीड | |
| 93 | 3974/2025 | श्री. महारुद्र राजेंद्र डोईफोडे, रा. राजमुद्रा प्रतिष्ठान शिवाजी धांडे नगर बार्शी रोड, बीड | कार्यालय अधिक्षक, पोलीस अधिक्षक कार्यालय, बीड | पोलीस उप अधिक्षक (गृह), पोलीस अधिक्षक कार्यालय बीड | |
| 94 | 3975/2025 | श्री. महारुद्र राजेंद्र डोईफोडे, रा. राजमुद्रा प्रतिष्ठान शिवाजी धांडे नगर बार्शी रोड, बीड | कार्यालय अधिक्षक, पोलीस अधिक्षक कार्यालय, बीड | पोलीस उप अधिक्षक (गृह), पोलीस अधिक्षक कार्यालय बीड | |
| 95 | 4298/2025 | श्री. भगवान विष्णुपंत ठोबरे, रा. चेंबर नंबर ए-407, ए विंग बिल्डींग, ॲडव्हेकोट चेंबर बिल्डिंग, उच्च न्यायालय परिसर एन-03 सिडको, छत्रपती संभाजीनगर | पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन गेवराई जि. बीड | उपविभागीय पोलीस अधिकारी, उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय गेवराई जि. बीड | |
| 96 | 4299/2025 | श्री. भगवान विष्णुपंत ठोबरे, रा. चेंबर नंबर ए-407, ए विंग बिल्डींग, ॲडव्हेकोट चेंबर बिल्डिंग, उच्च न्यायालय परिसर एन-03 सिडको, छत्रपती संभाजीनगर | पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन गेवराई जि. बीड | उपविभागीय पोलीस अधिकारी, उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय गेवराई जि. बीड | |
| 97 | 4300/2025 | श्री. भगवान विष्णुपंत ठोबरे, रा. चेंबर नंबर ए-407, ए विंग बिल्डींग, ॲडव्हेकोट चेंबर बिल्डिंग, उच्च न्यायालय परिसर एन-03 सिडको, छत्रपती संभाजीनगर | पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन गेवराई जि. बीड | उपविभागीय पोलीस अधिकारी, उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय गेवराई जि. बीड | |
| 98 | 4548/2025 | श्री. साळवे प्रशांत राजु, मु.पो. कडा ता. आष्टी जि. बीड | पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन आष्टी जि. बीड | उपविभागीय पोलीस अधिकारी, उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय आष्टी जि. बीड | |
| 99 | 4631/2025 | श्री. शाहराव दादाराव निकाळजे, रा. पिंपळवाडी ता.जि.बीड | पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन नेकनुर ता. जि. बीड | उपविभागीय पोलीस अधिकारी, उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय केज जि. बीड | |
| 100 | 4632/2025 | श्री. शाहराव दादाराव निकाळजे, रा. पिंपळवाडी ता.जि.बीड | पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन नेकनुर ता. जि. बीड | उपविभागीय पोलीस अधिकारी, उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय केज जि. बीड | |
| | | सहाय्यकाचे नांव व स्वाक्षरी | | लघुलेखकाचे नांव व स्वाक्षरी | |

| | | सुनावणीचा दि. 08.12.2025 | | वेळ दुपारी 02.30 वा. | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | अपील क्र. | अपीलार्थीचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | प्रथम अपीलीय अधिकारी | शेरा |
| 101 | 4717/2025 | श्री.विजय ज्ञानेबा साळवे, मु.पो. फुलेपिंपळगाव ता. माजलगाव जि. बीड | पोलीस उपनिरीक्षक, पोलीस स्टेशन माजलगाव जि.बीड | उपविभागीय पोलीस अधिकारी, उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय माजलगाव जि.बीड | |
| 102 | 4845/2025 | श्री.विलास किसनराव ढोले, रा. बार्शी नाका बीड | पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन पेठ बीड | उपविभागीय पोलीस अधिकारी, उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय उप विभाग, बीड | |
| 103 | 5219/2025 | श्री. केशव दादाराव तांदळे, रा. वंजारवाडी ता.जि. बीड | उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.02 बीड | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.02 बीड | |
| 104 | 0 | 0 | 0 | 0 | |
| 105 | 0 | 0 | 0 | 0 | |
| 106 | 0 | 0 | 0 | 0 | |
| 107 | 0 | 0 | 0 | 0 | |
| 108 | 0 | 0 | 0 | 0 | |
| 109 | 0 | 0 | 0 | 0 | |
| 110 | 0 | 0 | 0 | 0 | |
| | | सहाय्यकाचे नांव व स्वाक्षरी | | लघुलेखकाचे नांव व स्वाक्षरी | |

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक २१९, २२३,२२४,२२५ व २२६/२०२५**
**बोर्ड क्र. १, ५,६,७,व ८ एकूण ०५ प्रकरणे**

श्री. गाडेकर मुंजाराम ज्ञानोबा,
रा. कालिका नगर माजलगांव,
ता. माजलगांव, जि. बीड,
मो. नंबर ९५११८१८४१० — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक,
जवाहर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,
केसापुरी वसाहत, ता. माजलगांव, जि. बीड — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी,
जवाहर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,
केसापुरी वसाहत, ता. माजलगांव, जि. बीड — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०८.१२.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.१५.०१.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये पाच द्वितीय अपिले दाखल केलेले आहेत. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी श्री. अभिमन्यु राम इबिते, मुख्याध्यापक, जवाहर विद्यालय, उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी, अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड अ.क्र. | द्वितीय अपील क्रमांक | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जाती विषय/ तपशिल |
|---|---|---|---|
| ०१ | ०२१९/२०२५ | २४.१०.२०२४ | दि.०१ जानेवारी २०१८ ते आज तागायतपर्यंत या |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | कालावधीतील आपल्या विद्यालयाला प्राप्त झालेल्या वेतनेत्तर अनुदानाच्या निधी बाबतची माहिती व नवविकास मंडळ कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या आपल्या आस्थापनेतून कर्मचाऱ्याची कपाती संदर्भातील माहिती. |
| ०५ | ०२२३/२०२५ | २४.१०.२०२४ | दि.०१ जानेवारी २०१८ ते ३० ऑगस्ट २०२५पर्यंत या कालावधीतील आपल्या आस्थापनेत नियुक्ती झालेल्या जाहिरातीचा दिनांक, मुलाखत दिनांक, मुलाखतीस हजर उमेदवारांची यादी व वर्तमानपत्र पत्र जाहिरात साक्षांकित प्रतीत देण्यात यावी. |
| ०६ | ०२२४/२०२५ | २४.१०.२०२४ | दि.०१ जानेवारी २०१८ ते आज तागायतपर्यंत या कालावधीतील नवीन कर्मचारी भरती करण्यासाठी घेण्यात आलेल्या शाळा व्यवस्थापन समिती व शालेय समितीच्या बैठकीचा दिनांक बैठकिला उपस्थित सदस्यांची यादी, बैठकीमध्ये घेण्यात आलेले ठराव व अहवालाच्या साक्षांकित प्रती देण्यात याव्यात. |
| ०७ | ०२२५/२०२५ | २४.१०.२०२४ | दि.०१ जानेवारी २०१८ ते ३० ऑगस्ट २०२४ पर्यंत नव्याने आपल्या आस्थापनेत नियुक्ती झालेल्या कर्मचाऱ्यांची माहिती देण्यात येवून ती भरती करण्यासाठी देण्यात आलेल्या जाहिरातीचा दिनांक, मुलाखत दिनांक, मुलाखतीस हजर उमेदवारांची यादी व वर्तमानपत्र पत्र जाहिरात साक्षांकित प्रतीत देण्यात यावी व इतर सहा मुद्याबाबत... |
| ०८ | ०२२६/२०२५ | २४.१०.२०२४ | दि.०१ जानेवारी २०१८ ते आज तागायतपर्यंत या कालावधीतील नवीन कर्मचारी भरती यांची आपल्या कार्यालयातून पाठविण्यात आलेल्या प्रस्तावाची प्रत, मंजूर/ नामंजूर झालेले प्रस्ताव व नव्याने कर्मचारी नियुक्त करण्यासाठी वरिष्ठ कार्यालयास आपण केलेले पत्रव्यवहार व त्यांचे मंजूरीपत्र देण्यात यावेत. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीच्या अनुषंगाने त्यांना देय होणारी माहिती दि.२२.११.२०२४ रोजीच्या पत्रान्वये देण्यात आलेली आहे. तसेच काही माहिती त्रयस्थ पक्षाची वैयक्तिक स्वरुपाची असल्यामुळे त्रयस्थाना विचारणा केली असता त्यांनी माहिती देण्यास नकार दिलेला आहे. तसे अपिलार्थी यांना सविस्तरपणे कळविण्यात आलेले आहे. तसेच अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहिती पैकी ऑनलाई संकेतस्थळावर (शालांत आयडीवर) उपलब्ध असून तेथूनही अपिलार्थी माहिती उपलब्ध करु शकतात.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न दिल्यामुळे व माहिती देण्यास टाळाटाळ केल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी

यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने देय होणारी माहिती उपलब्ध करुन दिल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली काही माहिती त्रयस्थपक्षाशी संबंधित आहे. त्रयस्थपक्षाशी संबंधित माहितीची मागणी केल्यानंतर कलम ७ (७) व कलम ११ (१) नुसार त्रयस्थांना त्यांची बाजु मांडण्याची संधी देणे, ही बाब नैसर्गिक न्यायं व पारदर्शकतेच्या दृष्टीकोनातून योग्य ठरते. या नंतर माहिती प्रगट करणे व्यापक जनहिताच्या कसोटीवर उतरत असल्यास अशी माहिती प्रगट करणे आवश्यक आहे. या नंतर माहिती प्रगट करणे व्यापक जनहिताच्या कसोटीवर उतरत असल्यास अशी माहिती प्रगट करणे आवश्यक आहे. सारांशाने, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अधिनियमातील कलम ८ (१) (त्र) मधील व्यापक जनहिताच्या कसोटीवर उतरत नसल्यामुळे ती अपिलार्थी यांना देय होणार नाही, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे पाच द्वितीय अपिले निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

जा.क्र. 18165 दिनांक : 24.12.2025

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ०२२०/२०२५ ते ०२२२/२०२५
बोर्ड क्र.०२ ते ४

श्री. गाडेकर मुंजाराम ज्ञानोबा,
रा. कालिका नगर माजलगांव,
ता. माजलगांव, जि. बीड,
मो. नंबर ९५११८१८४१० — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक,
महात्मा ज्योतिबा फुले माध्यमिक विद्यालय, समता कॉलनी,
माजलगांव, ता. माजलगांव, जि. बीड — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी,
महात्मा ज्योतिबा फुले माध्यमिक विद्यालय, समता कॉलनी,
माजलगांव, ता. माजलगांव, जि. बीड — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०८.१२.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.१५.०१.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये तीन द्वितीय अपिले दाखल केलेले आहेत. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी श्री. मोताळे किशोर लक्ष्मीकांतराव, मुख्याध्यापक, म.ज्यो.फले माध्य.विद्यालय, माजलगांव उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| सु.बोर्ड अ.क्र. | द्वितीय अपिल क्रमांक | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जाती विषय/ तपशिल |
|---|---|---|---|
| ०२ | ०२२०/२०२५ | २०.०९.२०२४ | सन २०१७ जानेवारी ते ऑगस्ट २०२४ पर्यंत या |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | कालावधीतील १) दि.०१ एप्रिल २०२१ ते ऑगस्ट २०२४ पर्यंत वेतनेत्तर अनुदान किती मिंहाले व त्याचा विनियोग पावल्यासह मिळणेबाबत. २) ०१ एप्रिल २०२१ ते ऑगस्ट २०२४ पर्यंतचे वेतनेत्तर अनुदान बँक खात्याचा उतारा व तपशील ३) वेतनेत्तर अनुदानाचा खर्च व झालेला तपशीलाची सत्यप्रत व ते का खर्च न झाले याचे कारण, अनुदान खर्च साठीचे आपले प्रयोजन, वेतनेत्तर अनुदान खर्च केलेल्या चेकचा नंबर व कोणाचे नावे ४) आपल्या आस्थापनेत कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्याचे नवविकास मंडळ कर्मचारी असलेल्या कपात होत असलेल्या खातेनिहाय माहिती ५) ०१ एप्रिल २०१७ ते ऑगस्ट २०२४ पर्यंतचे शिक्षक -शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थितीपट साक्षांकित प्रतीत या कालावधीत नियुक्त कर्मचारी ठराव, जाहिरात, मंजूरी शाळा ठराव इ.माहिती. |
| ०३ | ०२२१/२०२५ | २६.१०.२०२४ | दि.०१ जानेवारी २०२१ ते आज तागायतपर्यंत या कालावधीतील विद्यालयास प्राप्त झालेल्या वेतनेत्तर अनुदानाचे बँक खात्याचा उतारा देण्यात यावा. |
| ०४ | ०२२२/२०२५ | २६.१०.२०२४ | दि.०१ जानेवारी २०२१ ते आज तागायत या कालावधीतील आपल्या विद्यालयाला वेतनेत्तर अनुदान किती प्राप्त झाला या बाबतची सविस्तर माहिती देवून ज्या कामासाठी निधी खर्च करण्यात आला त्याची माहिती देवून खर्च केलेल्या निधीचे विविरण पावत्यांच्या प्रति देण्यात याव्यात तसेच खर्च न झालेल्या निधिची माहिती देण्यात यावी.२. ०१ जानेवारी २०२१ ते आजतागायतपर्यंत नवविकास मंडळ कर्मचारी सहकारी पतसंस्थेत आपल्या आस्थापनेतून कार्यरत कर्मचाऱ्यांच्या होणाऱ्या कपातीचे विवरण देण्यात यावे. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अगवत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये मागणी केल्यानुसार अर्जासोबत डी.आर.डी. प्रमाणपत्राची मुळ प्रत रेशनकार्ड जोडण्यात आलेले नाही, सदर माहिती मिळण्याबाबत केलेल्या अर्जातील त्रृटीची पुर्तता करावी असे दि.१९.११.२०२४ रोजीच्यापत्रान्वये कळविण्यात आलेले आहे. तथापि अपिलार्थी यांनी कोणताही प्रतिसाद दिलेला नाही. तसेच काही माहिती त्रयस्थ पक्षाची वैयक्तिक स्वरुपाची मागणी केलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये,

माहिती न दिल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली काही माहिती त्रयस्थपक्षाशी संबंधित आहे. त्रयस्थपक्षाशी संबंधित माहितीची मागणी केल्यानंतर कलम ७ (७) व कलम ११ (१) नुसार त्रयस्थांना त्यांची बाजु मांडण्याची संधी देणे, ही बाब नैसर्गिक न्याय व पारदर्शकतेच्या दृष्टीकोनातून योग्य ठरते. सारांशाने, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अधिनियमातील कलम ८ (१) (त्र) मधील व्यापक जनहिताच्या कसोटीवर उतरत नसल्यामुळे ती अपिलार्थी यांना देय होणार नाही, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे तीन द्वितीय अपिले निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 18166 दिनांक :- 24.12.2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १५१०/२०२५**
**बोर्ड क्र.०९**

श्री. मिर्झा शारेख बेग खुर्शिद बेग, — अपिलार्थी
द्वारा- मिर्झा सज्जाद बेग, हत्ती खाना कागदी दरवाजा, बीड
मो. नंबर-८४८२९३५५१५

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
मुख्याध्यापक,
अलहुदा उर्दू माध्यमिक शाळा,
शहिनशाह नगर, बार्शी रोड, बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, बीड

**(सुनावणी दिनांक ०८.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१६.०४.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी, श्री. पठाण सिराज खान सरवर खान, मुख्याध्यापक, अलहुदा उर्दू हायस्कूल, बीड उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ३१.०१.२०२५ | सन २००० ते आजपर्यंत या कालावधीतील अलहुदा उर्दू माध्यमिक शाळा, बीउ येथे कार्यरत सर्व कर्मचारी (शिक्षक व शिक्षकेत्तर) यांचे प्रथम नियुक्ती आदेश, नियुक्ती ठराव शैक्षणिक पात्रतेचे कागदपत्र (गुणपत्रक व प्रमाणपत्र इ.) आणि त्यांचे सर्व वैयक्तिक मान्यते आदेशाची सत्यप्रती मिळणेबाबत. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन

माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी २५ वर्षापुर्वीची व त्रयस्थ पक्षाची वैयक्तिक माहितीची मागणी केलेली आहे. त्रयस्थ पक्षांना विचारणा केली असता त्यांनी माहिती देण्यास नकार दिलेला असल्यामुळे तसे अपिलार्थी यांना दि.२४.०२.२०२५ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्रयस्थ पक्षाची वैयक्तिक माहिती मागितल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांना दि.२४.०२.२०२५ रोजीच्या पत्रान्वये सविस्तरपणे कळविल्याचे दिसून येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद आयोगास योग्य दिसून येत आहे. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती प्रगट केल्यास नेमके कोणते व्यापक जनहित साध्य होऊ शकते याबाबत अपिलार्थी यांना विचारणा केली असता ते याबाबत कोणतेही समर्थणीय कारण आयोगास देऊ शकले नाही. सारांशाने, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अधिनियमातील कलम ८ (१) (त्र) मधील व्यापक जनहिताच्या कसोटीवर उतरत नसल्यामुळे ती अपिलार्थी यांना देय होणार नाही, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपिल निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.- 18167 दिनांक :- 24.12.2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक २१९२/२०२५
बोर्ड क्र.१०

श्री. सचिन कमलाकर जोशी,
रा. रत्नकमल निवास, विठ्ठल मंदिरा समोर,
विठ्ठल नगर, शाहू नगर, जालना रोड, बीड,
ता.जि. बीड. मो. नंबर-९९२२१८४६४६. — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी,
स्वतंत्र सेनानी रामराव आवरगावकर विधी महाविद्यालय बार्शी रोड, बीड — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
प्राचार्य,
स्वतंत्र सेनानी रामराव आवरगावकर विधी महाविद्यालय बार्शी रोड, बीड — : उत्तरवादी क्र.२

## (सुनावणी दिनांक ०८.१२.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.०२.०६.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी यांचे वतीने प्रतिनिधी, श्री. शेख एफ.जी. उपस्थित आहेत. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी, डॉ. शेख ए.आर. स्वतंत्र सेनानी रामराव आवरगावकर विधी महाविद्यालय, बीड उपस्थित आहेत. तसेच अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २५.०४.२०२५ | चि. अक्षय दिलीप देवगांवकर हा विद्यार्थी नियमित कोर्ससाठी आहे का अनियमित कोर्ससाठी आहे याचा तपशील सविस्तर देण्यात यावे व प्रवेश घेताना त्यांनी सोबत जोडलेले सर्व कागदपत्रे झेरॉक्स प्रत देण्यात यावे. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये त्रयस्थ पक्षाची माहितीची मागणी केलेली आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्रयस्थ पक्षाची वैयक्तिक माहिती मागणी केलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती पुरविली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्रयस्थपक्षाशी संबंधित आहे. त्रयस्थपक्षाशी संबंधित माहितीची मागणी केल्यानंतर कलम ७ (७) व कलम ११ (१) नुसार त्रयस्थांना त्यांची बाजु मांडण्याची संधी देणे, ही बाब नैसर्गिक न्याय व पारदर्शकतेच्या दृष्टीकोनातून योग्य ठरते. या नंतर माहिती प्रगट करणे व्यापक जनहिताच्या कसोटीवर उतरत असल्यास अशी माहिती प्रगट करणे आवश्यक आहे. आज रोजी सुनावणीकरिता अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तथापि माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती उघड केल्यास नेमके कोणते व्यापक जनहित साध्य होऊ शकते याबाबत अपिलार्थी यांनी त्यांच्या व्दितीय अपिलामध्ये काहीही नमूद केलेले नाही. सारांशाने, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अधिनियमातील कलम ८ (१) (त्र) मधील व्यापक जनहिताच्या कसोटीवर उतरत नसल्यामुळे ती अपिलार्थी यांना देय होणार नाही, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 18168 दिनांक : 24.12.2025

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व.कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक २२११/२०२५ ते २२१७/२०२५
बोर्ड क्र.११ते १७ एकूण ०७ प्रकरणे

श्री. राजेश बालाजी वाहुळे,
रा. माऊलीनगर, यशवंतराव चौक, अंबाजोगाई, जि. बीड
मो. नंबर-9858913913 — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी,
यशवंतराव चव्हाण, महाविद्यालय, अंबाजोगाई, जि. बीड — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
प्राचार्य,
यशवंतराव चव्हाण, महाविद्यालय, अंबाजोगाई, जि. बीड — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०८.१२.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.०३.०६.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये एकूण सात द्वितीय अपिले दाखल केलेले आहेत. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, श्री. रमेश माणीकराव शिंदे व प्रथम अपिलीय अधिकारी, शिवदास सिरसाठ, प्राचार्य, यशंवराव चव्हाण महाविद्यालय, अंबाजोगाई, जि. बीड तसेच विधीज्ञ उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| सु.बो. अ.क्र. | द्वितीय अपील क्रमांक | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय/ तपशिल |
|---|---|---|---|
| ११ | २२११/२०२५ | ०१.०३.२०२५ | सन २०२२ ते २०२५ या कालावधीतील आपल्या महाविद्यालयास अनुदान स्वरुपात मिळणाऱ्या कोणकोणत्या उद्देशासाठी शासनाकडून विद्यापीठाकडून किती रुपये थेट अनुदान किंवा मदत रक्कम मिळाली या रक्कमेची माहिती कामाची यादी द्यावी व कोठे केंव्हा कसा झाला संपूर्ण तपशिल पावत्यासह द्यावा. |

| | | | |
|---|---|---|---|
| १२ | २२१२/२०२५ | ०१.०३.२०२५ | सन २०२२ ते २०२५ या कालावधीतील शैक्षणिक वर्षात किती आर्थिक अनुदान मिळाले अनुदानाचा सविस्तर तपशील द्यावा अनुदान कोणत्या कारणासाठी कधी खर्च झ ाले, किंवा शिल्लक आहे तपशिल दर्शवणारी कागदपत्रे द्यावीत. आपणा विद्यार्थ्यांकडून देणगी फंड विकास निधी किंवा अन्य कारणासाठी शुल्क घेत असलयास आजपर्यंत आपणाकडे किंती रुपये विकास निधी जमा झाला याचा विनियोग कसा झाला याचा तपशील कागदपत्रे द्यावीत. महाविद्यालयाच्या मागील तीन वर्षाचया ऑडिटची छायांकित प्रत द्यावी. |
| १३ | २२१३/२०२५ | ०१.०३.२०२५ | सन २०२२ ते २०२५ या कालावधीतील आपल्या महाविद्यालयातील एकूण किती कायम व रोजंदारी कर्मचारी आहेत त्यांना किती रुपये मासिक वेतन दिले जाते व कधीपासून यचा तपशील द्यावा. |
| १४ | २२१४/२०२५ | ०१.०३.२०२५ | सन २०२२ ते २०२५ या कालावधीतील आपल्या महाविद्यालयातील कायम व रोजंदरी कर्मचारी आहेत त्यांना किती रुपये मासिक वेतन दिले जाते व कधीपासून याचा तपशिल द्यावा |
| १५ | २२१५/२०२५ | ०१.०३.२०२५ | सन २०२२ ते २०२५ या कालावधीतील आपल्या महाविद्यालयास मिळणाऱ्या अनुदान व विद्यार्थ्यांच्या फिस स्वरुपात मिळणाऱ्या रक्कमेची माहिती मिळणेबाबत. |
| १६ | २२१६/२०२५ | ०१.०३.२०२५ | सन २०२२ ते २०२५ या कालावधीतील आपल्या महाविद्यालयास विद्यापीठाकडून प्राप्त झालेल्या मानधनाचा व महाविद्यालयाकडून करण्यात आलेल्या खर्चाची माहिती मिळणेबाबत. |
| १७ | २२१७/२०२५ | ०१.०३.२०२५ | सन २०२२ ते २०२५ या कालावधीतील आपल्या महाविद्यालयास अनुदान स्वरुपात मिळणाऱ्या रक्कमेची माहिती मिळणेबाबत. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी व त्यांचे विधीज्ञ यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये व्यक्तिश: माहिती मागितलेली आहे. अपिलार्थी यांनी माहितीचे अवलोकन करुन माहिती माहिती घेऊन जाण्याबाबत नोटीस बोर्डवर प्रसिध्द केली होती. तदनंतर दि.२३.०३.२०२५ रोजीच्या पत्रान्वये रु.२३०/- इतकी रक्कम भरुन माहिती हस्तगत करण्याबाबत कळविले होते. तथापि अपिलार्थी यांनी घेण्यास नकार म्हणून ते पत्र न स्वीकारल्यामुळे परत आलेले आहे. प्रथम अपिलावर सुनावणी घेण्यासाठी दोन वेळेस नोटीस पाठविले होते. पहिल्या नोटीसला अनुपस्थित असल्यामुळे दुसऱ्यांदा नोटीस पाठविण्यात आली होती. तथापि दुसऱ्या नोटीसला अपिलार्थी हे प्रथम अपील सुनावणीसाठी ते उपस्थित राहिले नाहीत. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित केले आहे. यावरुन अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन घेण्यात स्वारस्य दिसून येत नाही, त्यामुळे अपिलार्थी यांचे द्वितीय अपील खारील करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या सातही प्रथम अपिलावर दि.२२.०४.२०२५ दि.२३.०४.२०२५, दि.२४.०४.२०२५ व दि.२५.०४.२०२५, रोजी सुनावणी घेऊन, जन माहिती अधिकारी, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय हे उपस्थित राहून माहिती अधिकार अधिनियम २०२५ अन्वये विहित मुदतीत माहिती देणे संदर्भातील कार्यवाही केल्याचे लेखी म्हणणे सादर केले होते.अपिलार्थी श्री. राजेश बालाजी वाहुळे हे सदर सुनावणीस अनुपस्थित होते. यावरुन अपिलार्थीला सदर माहितीची गरज नाही असे, स्पष्ट दिसून येते, सदर अर्ज निकाली काढण्यात येत आहे असा निर्णय पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न दिल्याच्या नाराजीने, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जामध्ये व्यक्तिशः माहितीची मागणी केलेली आहे. तसेच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांना वेळोवेळी कळविण्यात आलेले आहे. तथापि अपिलार्थी यांनी प्रतिसाद दिल्याचे दिसून येत नाही. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती, जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद व अधिनियमातील तरतुदी याचा सारासार विचार करता, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी उक्त नमूद दिलेल्या निर्णयात बदल करण्याची आवश्यकता आयोगास दिसून येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे सात द्वितीय अपिले निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.- 18169 दिनांक :- 24.12.2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक २९०८/२०२५**
**बोर्ड क्र.१८**

श्री. बापूराव विष्णू खोतपाटील, ... अपिलार्थी
रा. गुरुकृपा निवास शंकरपार्वती नगर, परळी (वै.,),
जि. बीड-४३१५१५

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी क्र.१
शिवछत्रपती प्राथमिक विद्यालय, परळी वैजीनाथ, जि. बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
मुख्याध्यापक,
शिवछत्रपती प्राथमिक विद्यालय, परळी वैजीनाथ,
जि. बीड

**(सुनावणी दिनांक ०८.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१०.०७.२०२५ रोजी, राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०४.०३.२०२५ | इ.स.२००५ ते आजपर्यंत या कालावधीतील १. आपल्या कार्यालयातील इ.स.२००५ ते २०२४-२०२५ पर्यंतच्या प्रतिवर्षाच्या संचमान्यता. २. आपल्या शाळेतील संस्थेअंतर्गत शाळेतील कर्मचाऱ्यांची सेवा जेष्ठता यादीची सत्यप्रत. ३. माझे सेवेचे प्रथम नियुक्ती आदेश सह (संस्था आदेश), जोडपत्र ब सहित ४. वैयक्तिक मान्यता व कायम मान्यता (मा.शिक्षणाधिकारी प्रा.), यांनी दिलेल्या मान्यतेच्या सत्यप्रती. ५. मला ज्या कारणास्तव व ज्या निकषाच्या आधारे अतिरिक्त ठरविले त्याचा तपशील ६. संस्थेचया/ शाळेच्या बिंदुनावली (रोष्टरची) सत्यप्रत. |

प्रस्तुत प्रकरणात, आयोगापुढील कागदपत्रावरुन, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास विहित मुदतीत प्रतिसाद दिला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय

अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम १९ (६) चा भंग झालेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही व सुनावणी घेतली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**<u>आदेश</u>**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी, शिवछत्रपती प्राथमिक विद्यालय, परळी वैजीनाथ, जि. बीड यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

१. तत्कालीन जन माहिती अधिकारी, शिवछत्रपती प्राथमिक विद्यालय, परळी वैजीनाथ, जि. बीड यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात विहित मुदतीत कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच **दि.०२४.०२.२०२६ रोजी** व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

२. मुख्याध्यापक, शिवछत्रपती प्राथमिक विद्यालय, परळी वैजीनाथ, जि. बीड यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, बीड यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी कलम १९ (६) चा भंग दिसून येत आहे. म्हणून त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.केमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१.०३.२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

४. शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, बीड यांना आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी आयोगास कोणतीही पूर्वसूचना न देता अथवा पूर्व परवानगी न घेता जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी सुनावणीस अनुपस्थित राहिले असल्याने त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.(२२२/१५)/सहा, दि.०१.१२.२०१५ नुसार कार्यवाही करावी.

५. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(स्वाक्षरी)

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

---

जा.क्र.- 19061 दिनांक :- 31/12/2025 **नोंदणीकृत टपालाद्वारे**

प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता,
शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, बीड

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक २९४१/२०२५**
**बोर्ड क्र.१९**

श्री. सोहेल खान ताजोद्दीन खान, — अपिलार्थी
रा. हत्तीखाना, बीड, ता.जि. बीड-४३१ १२२.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
उप मुख्याध्यापक, मिल्लिया माध्यमिक शाळा (मुलींची), बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
मुख्याध्यापक, मिल्लिया माध्यमिक शाळा (मुलींची), बीड

**(सुनावणी दिनांक ०८.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.११.०७.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ३०.०४.२०२५ | मिल्लीया कॉलेजचे नव निर्वाचीत मुख्याध्यापक/ प्राचार्य फैसल चाऊस यांना कोणत्या आधारे मुख्याध्यापक पदी नियुक्ती करण्यात आली व जेष्ठता यादीची छायांकित प्रत देण्यात यावी. |

प्रस्तुत प्रकरणात, आयोगापुढील कागदपत्रावरुन, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास विहित मुदतीत प्रतिसाद दिला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम ७ (१) चा भंग झालेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, जाणीवपुर्वक माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना परिपुर्ण माहिती मिळाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे अपिलार्थी यांनी त्यांच्या द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात

तथ्यांश दिसून येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा उप मुख्याध्यापक, मिल्लिया माध्यमिक शाळा (मुलींची), बीड यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उप मुख्याध्यापक, मिल्लिया माध्यमिक शाळा (मुलींची), बीड यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात विहित मुदतीत कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच **दि.२४.०२.२०२६ रोजी** व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. मुख्याध्यापक, मिल्लिया माध्यमिक शाळा (मुलींची), बीड यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

४. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, बीड यांना आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी आयोगास कोणतीही पूर्वसूचना न देता अथवा पूर्व परवानगी न घेता जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी सुनावणीस अनुपस्थित राहिले असल्याने त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.(२२२/१५)/सहा, दि.०१.१२.२०१५ नुसार कार्यवाही करावी.

५. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

---

**जा.क्र.** 19060 **दिनांक :** 31/12/2025 **नोंदणीकृत टपालाद्वारे**

प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता,
शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, बीड

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ३६२९/२०२५**
**बोर्ड क्र.२०**

श्री. नानासाहेब एकनाथ वाघिरे,
मु. पो. दासखेड, ता. पाटोदा, जि. बीड-४१४ २०४.
मो. नंबर-९२८४७००९१९ — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
जेष्ठ शिक्षक,
रामकृष्ण माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, बोरगाव बु.,
ता.केज.जि.बीड — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
मुख्याध्यापक,
रामकृष्ण माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, बोरगाव बु.,
ता.केज, जि. बीड — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०८.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०१.०८.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १२.०२.२०२५ | १. माहे जून व जुलै २०२३ शिक्षक हजेरीच्या साक्षांकित प्रती, २. माहे जून व जुलै २०२३ बुलेटीन (तासवाटप) रजिस्टरची साक्षांकित प्रत, ३. माहे जून ते सप्टेंबर २०२३ चार महिन्याचे पगार बीलाच्या साक्षांकित प्रती, ४. माहे जुलै व ऑगस्ट २०२३ चा माझा पगार ज्या संस्था किंवा जि. प. शिक्षणाधिकारी यांच्या आदेशाने रोखला त्या पत्राची एक साक्षांकित प्रत, ५. माहे जुलै २०२३ ची वेतनवाढ ज्या संस्था व शिक्षणाधिकारी आदेशाने रोखली त्याची प्रत्येक एक साक्षांकित प्रत. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती देण्यास नकार दिल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांचा युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे त्यांनी केलेल्या युक्तिवादात व द्वितीय अपिलात तथ्यांश दिसून येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी, जेष्ठ शिक्षक, रामकृष्ण माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, बोरगाव बु., ता. केज. जि. बीड यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली माहिती कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, (फक्त मुद्दा क्र.४) आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. मुख्याध्यापक, जेष्ठ शिक्षक, रामकृष्ण माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, बोरगाव बु., ता. केज. जि. बीड यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.---18170--- दिनांक :-24.12.2025-

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ४३८५/२०२५ व ४३८६/२०२५**
**बोर्ड क्र.२१ व २२**

श्री. शेख वसीम शेख सलीम,
रा. आदर्श नगर, तेलगांव नाका, बीड — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी,
स्वा. से. रामराव आवरगावकर विधी महाविद्यालय बार्शी रोड, बीड — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
प्राचार्य,
स्वा. से. रामराव आवरगावकर विधी महाविद्यालय बार्शी रोड, बीड — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०८.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२३.०९.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपिले दाखल केलेले आहेत. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी, श्री.शेख ए. आर. प्राचार्य, स्वा.से.रामराव आवरगावकर विधी महाविद्यालय, बीड उपस्थित आहेत. तसेच जन माहिती अधिकारी यांचे वतीने प्रतिनिधी श्री. शेख फारुख, उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| सु. बोर्ड अ.क्र. | द्वितीय अपील क्रमांक | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय/ तपशिल |
|---|---|---|---|
| २१ | ४३८५/२०२५ | १५.०७.२०२५ | सन २०२१-२०२२, २०२२-२०२३, २०२३-२०२४, २०२४-२०२५ या शैक्षणिक वर्षात आपल्या संस्थेला विधी महाविद्यालयाला शासनाकडून किती आर्थिक अनुदान मिळाले व अनुदानाचा सविस्तर तपशिल देण्यात यावा व अनुदान कोणत्या कारणासाठी कधी खर्च झाले व किती शिल्लक आहे याचा तपशिल दर्शविनारी सर्व कागदपत्रांची छायांकित प्रत देण्यात यावी. |

| | | | |
|---|---|---|---|
| २२ | ४३८६/२०२५ | १५.०७.२०२५ | शैक्षणिक वर्षात एल.एल.बी. प्रथम वर्षामध्ये प्रवेश घेतलेले विद्यार्थी (संवर्ग निहाय) यादी. त्यांचे शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्र डिग्री व इतर कागदपत्रांची छायांकित व साक्षांकित प्रत (विद्यार्थी निहाय) यादी देण्यात यावी तसेच बाहयस्थ विद्यार्थी व नियमित विद्यार्थी किती आहेत याची यादी देण्यात यावी. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती त्रयस्थ पक्षाची वैयक्तिक स्वरुपाची असल्यामुळे देता येत नाही असे अपिलार्थी यांना कळविण्यात आलेले आहे, तथापि अपिलार्थी हे त्या पत्यावर राहत नसल्यामुळे ते पत्र परत आलेले आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.१६.०९.२०२५ रोजी सुनावणी घेऊन, अपिलाचे कारणामध्ये संधीगता असल्या कारणाने व सदर अपिलार्थी अनुपस्थित असल्यामुळे महितीची आवश्यकता समजून आलेली नाही, जन माहिती अधिकारी यांनी महाविद्यालयास कुठल्याही प्रकारचे अनुदान मिळालेले नाही त्यामुळे छायांकित प्रति देणे शक्य नाही असे नमूदे केलेले आहे. तरी अपिलार्थी यांना माहितीची गरज नाही असे दिसून यते त्यामुळे हे अपील या ठिकाणी निकाली काढण्यात येत आहे, असा निर्णय पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न मिळाल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दिलेला प्रतिसाद व घेतलेला निर्णय योग्य दिसून येत आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती, जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद व अधिनियमातील तरतुदी यांचा सारासार विचार करता, प्रथम अपिलीय अधिकारी दि.१६.०९.२०२५ रोजी पारित केलेल्या निर्णयात बदल करण्याची आवश्यकता आयोगास दिसून येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे दोन द्वितीय अपिले निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.---- 18171 ---- दिनांक :---- 24.12.2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ४२१६/२०२५
बोर्ड क्र.२३

श्री. तांबे नितीन मधुकरराव,
मु. पो. तांबाराजुरी, ता. पाटोदा,
जि. बीड-४१४२०४,
मो. नंबर-९१३०९३४५०५ — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
सहशिक्षक, माध्यमिक विद्यालय, तांबाराजुरी, ता. पाटोदा, जि. बीड — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
मुख्याध्यापक,
माध्यमिक विद्यालय तांबाराजुरी, ता. पाटोदा, जि. बीड — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०८.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१५.०९.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, श्री. निंगुळे रामदास आबाजीराव, सहशिक्षक, उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ३०.०६.२०२५ | मुद्दा क्र.१ मा.वि.शि.प्र. मंडळ संचलित माध्यमिक शाळेत पठाण एम. ए. या कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यासाठी मुख्याध्यापक यांनी दि.१६.०५.२०२५ रोजी जा.क्र.३७/२०२५ च्या पत्रान्वये मा. शिक्षणाधिकारी कार्यालय (मा.), जि.प.बीड यांनी दाखल केलेल्या प्रस्तावाला सर्व पानांच्या झेरॉक्सप्रती साक्षांकित दयाव्या, मुद्दा क्र.०२ दि.१६.०५.२०२५ रोजी मुख्याध्यापक यांनी माध्यमिक शिक्षण विभगात पठाण एम. ए. या कर्मचाऱ्यांना दाखल केलेल्या प्रस्तावानुसार शिक्षणाधिकारी (मा.), जि. प. बीड यांनी दिलेल्या मान्यता आदेशाच्या प्रती सत्यप्रतीत देण्यात याव्यात. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांना दि.०५.१२.२०२५ रोजीच्या पत्रान्वये माहिती देण्यात आलेली आहे. अपिलार्थी यांनी माहिती स्वीकारुन दि.०६.१२.२०२५ रोजी माहिती मिळाल्याबाबतची पोहच दिलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, जाणीवपुर्वक माहिती देण्यापासून वंचित ठेवले आहे,असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन दिल्याचे दिसून येत आहे. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलेकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.---18172--- दिनांक :---24.12.2025---

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ४१९६/२०२५**
**बोर्ड क्र. २४**

श्री. रविंद्र नारायण मुंडे,
मु. पो. ताडसोन्ना, ता.जि. बीड — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
जिल्हा परिषद प्राथमिक शाहा ताडसोन्ना, ता. जि.बीड — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
मुख्याध्यापक,
जिल्हा परिषद, प्राथमिक शाळा, ताडसोन्ना, ता.जि. बीड — : उत्तरवादी क्र.२

## (सुनावणी दिनांक ०८.१२.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.०८.०९.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २४.०६.२०२५ | इ.स.२०१५ ते २०२० पर्यंत या कालावधीतील विद्यार्थ्यांचे नामांकन यादी ॲडमिशन फॉर्म व त्यासोबत विद्यार्थ्यांचे व पाल्याचे सोबत जोडलेले कागदपत्र, वस्तीगृहात झालेला खर्च खर्चाचे कागदपत्रे जि. प. बीड यांनी केलेला ऑर्डर रिपोर्ट. |

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलाथी यांनी विस्तृत व मोघम माहिती मागितल्याचे दिसून येत आहे. अशी माहिती एकत्रित / संकलित करण्याकरिता सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधन सामग्री मोठ्या प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाही. या प्रकरणाच्या अनुषंगाने मा. सर्वोच्च न्यायालयाने सेंट्रल बोर्ड ऑफ सेकंडरी एज्युकेशन व इतर विरुध्द आदित्य बंडोपाध्य व इतर सिव्हिल

अपील नं.४६५४/२०११ या निर्णयाकडे सर्व संबंधितांचे लक्ष वेधण्यात येत आहे. या निर्णयामध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने माहिती अधिकाराचा योग्य वापर होणेबाबत लक्ष वेधलेले आहे. याचाही सर्वांनी विचार करणे आवश्यक आहे, असे आयोगाचे मत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपिल निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलेकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 18173 दिनांक : 24.12.2025

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ४५३४/२०२५**
**बोर्ड क्र.२५**

श्री. शिवराज दिली नेहरकर, — अपिलार्थी
रा. धावडी, पो. आडस, ता. अंबाजोगाई, जि. बीड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
मुख्य लिपीक संलग्न सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, ता. माजलगांव, जि. बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
सहायक निबंधक सहकारी संस्था,
ता. माजलगांव, जि. बीड

**(सुनावणी दिनांक ०८.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०३.१०.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, श्री. विजय सर्जेराव सावध, मुख्य लिपीक, व प्रथम अपिलीय अधिकारी, श्री.सुरज उत्तमराव जगदाळे, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था माजलगांव, जि. बीड उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २८.०४.२०२५ | दि.१३.०७.२०२१ ते दि.२८.०४.२०२५ या कालावधीतील मा. विभागीय अधिकारी सहकारी संस्था लातूर यांचे पत्र दि.०९.०३.२०२३ अन्वये नमूद त्रृटीची पुर्तता करुन आपले कार्यालयाने सादर केलेल्या प्रस्तावाची तसेच श्री एस. डी. नेहरकर यांनी त्यांचे वेतना संदर्भात आपले कार्यायास वरील कालावधीत केलेल्या पत्रव्यवहाराच्या व त्यावर आपले कार्यालयाकडून करण्यात आलेल्या पत्रव्यवहाराची प्रत व इतर.. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगानें त्यांना कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती देण्यात आलेली आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.०४.०८.२०२५ रोजी सुनावणी घेऊन, जन माहिती अधिकारी तथा मुख्य लिपीक, संलग्न सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, ता. माजलगांव / सहायक जन माहिती अधिकारी (संबंधीत विभाग) यांना देऊन कळविण्यात येते की, वादी यांना आपले कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती दाखवून त्यापैकी त्यांना आवश्यक असलेली माहिती विनामूल्य उपलब्ध करुन देण्याचे यावी, असा आदेश पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, अपुर्ण व त्रोटक माहिती दिल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती, जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद व अधिनियमातील तरतुदी याचा सारासार विचार करता, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.०४.०८.२०२५ रोजी पारित केलेल्या निर्णयात बदल करण्याची आवश्यकता आयोगास दिसून येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा मुख्य लिपीक संलग्न सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, ता. माजलगांव, जि. बीड यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. सहायक निबंधक सहकारी संस्था,ता. माजलगांव, जि. बीड यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.---18174--- दिनांक :--29.12.2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १३९२/२०२५**
**बोर्ड क्र.२६**

ॲड. सदानंद म. वाघमारे, अपिलार्थी
रा. सरस्वती शाळेजवळ, पंचशील नगर,
ता.जि. बीड-४३११२२.मो. नंबर-९९२२१३०३६६

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
मुख्यालय सहाय्यक, उप अधिक्षक भूमि अभिलेख कार्यालय, बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
उप अधिक्षक भूमि अभिलेख कार्यालय, बीड

**(सुनावणी दिनांक ०८.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०७.०४.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ३१.०१.२०२५ | दि.०१.०१.२०१८ ते दि.३१.१२.२०१८ आणि दि.०१.०१.२०१९ ते दि.३१.१२.२०१९ या कालावधीतील आपल्या कार्यालयातील सर्व कर्मचारी यांची नांवानिशी पदनाम सही रजा उपस्थिती (हजेरी पट) यांची छायांकित प्रती मिळणे. |

प्रस्तुत प्रकरणात, आयोगापुढील कागदपत्रावरुन, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास विहित मुदतीत प्रतिसाद दिला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम १९ (६) चा भंग झालेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, मुद्दाम

माहिती देण्याचे टाळले जाते, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे अपिलार्थी यांनी त्यांच्या द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा मुख्यालय सहाय्यक, उप अधिक्षक भूमि अभिलेख कार्यालय, बीड यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा मुख्यालय सहाय्यक, उप अधिक्षक भूमि अभिलेख कार्यालय, बीड यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात विहित मुदतीत कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच **दि.२४.०२.२०२६ रोजी** व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. उप अधिक्षक भूमि अभिलेख कार्यालय, बीड यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

४. जिल्हा अधिक्षक, भूमि अभिलेख कार्यालय, बीड यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी कलम १९ (६) चा भंग दिसून येत आहे. म्हणून त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.केंमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१.०३.२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

५. जिल्हा अधिक्षक, भूमि अभिलेख कार्यालय, बीड यांना आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी आयोगास कोणतीही पूर्वसूचना न देता अथवा पूर्व परवानगी न घेता जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी सुनावणीस अनुपस्थित राहिले असल्याने त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.(२३२/१५)/सहा, दि.०१.१२.२०१५ नुसार कार्यवाही करावी.

६. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(स्वाक्षरी)

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

**जा.क्र.** 19059 **दिनांक :** 31/12/2025 **नोंदणीकृत टपालाद्वारे**

प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता,
जिल्हा अधिक्षक, भूमि अभिलेख कार्यालय, बीड

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ४३३४/२०२५**
**बोर्ड क्र.२७**

श्री. भानुदास शिवाजी जेवे, — अपिलार्थी
रा. प्लॉट क्र.६९, अनुग्रह अबिंद बंगलो शेजारी देवनागरी दर्गा रोड, छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
मुख्यालय सहाय्यक,
उप अधिक्षक भूमि अभिलेख कार्यालय,
आष्टी, जि. बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
उप अधिक्षक भूमि अभिलेख कार्यालय,
आष्टी जि. बीड

**(सुनावणी दिनांक ०८.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१९.०९.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २९.०४.२०२५ | मौजे खडकत ता आष्टी जि.बीड येथील पाझर तलावासाठी केलेल्या भूसंपादनाच्या संदर्भात तीन मुद्याबाबत माहिती मागितलेली आहे. १. मौजे खडकत ता आष्टी जि बीड येथील जामखेड रोड लगतच्या सध्याच्या गट क्रमांक ४२० मधील पाझर तलावासाठी शासनाने केलेल्या भूसंपादन नकाशाची सत्यप्रत मिळावी २. गट क्रमांक ४२० मधील पाझर तलावासाठी शासनाने संपादन केलेल्या जमिनीची शेतकरी निहाय माहिती द्यावी,३. गट क्रमांक ४२० मधील पाझर तलावाचे भूसंपादन award कॉपी मिळावी. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. तथापि निर्णयाची प्रत ही मिळाली नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली परिपुर्ण माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती अप्राप्त असल्याबाबत, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांचा युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे अपिलार्थी यांच्या युक्तिवादात व त्यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा मुख्यालय सहाय्यक, उप. अधिक्षक भूमि अभिलेख कार्यालय,आष्टी, जि. बीड यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. उप अधिक्षक भूमि अभिलेख कार्यालय, आष्टी जि. बीड यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.-----18175----- दिनांक :-24.12.2025-----

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक २७५४/२०२५**
**बोर्ड क्र.२८**

श्री. प्रशांत जयमल्हार बिडवई, — अपिलार्थी
रा. गणेश ईस्टेट एजन्सी चाळ, रुम नं.२, गांधीनगर, नियर साई सागर हॉटेल, मांजर्ली रोड, वैशाली टॉकीजच्यामागे, बदलापूर (पश्चिम), ता. अंबरनाथ, जि. ठाणे-४२१ ५०३,
मो. नंबर-९३२४७३५९८२

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — उत्तरवादी क्र.१
प्रादेशिक परिवहन अधिकारी,
प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय, बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
उप प्रादेशिक परिवहन अधिकारी,
प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय, बीड

**(सुनावणी दिनांक ०८.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.३०.०६.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २६.०३.२०२५ | दि.२६.०३.२०२५ या कालावधीतील एमडीएल नं एमएच२३ १९९५०००१८४०, डेथ ऑफ बर्थ १०-०७-१९७२, डेथ ऑफ इश्यू ०९.०६.१९९५, अपघात दि.११.०९.२०२३ ड्रायव्हरचे नाव दिनकर कदम हया ड्रायव्हिंग लायसन्सची माहिती अपघाताच्या काळातील दयावी, अलिबाग एमएसीटी नं.५९/२०२४ |

प्रस्तुत प्रकरणात, आयोगापुढील कागदपत्रावरुन, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास विहित मुदतीत प्रतिसाद दिला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन

कलम १९ (६) चा भंग झालेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न दिल्यामुळे व कुठलाही आदेश मिळाला नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा प्रादेशिक परिवहन अधिकारी, प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय, बीड यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा प्रादेशिक परिवहन अधिकारी, प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय, बीड यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात विहित मुदतीत कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच **दि.२४.०२.२०२६ रोजी** व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय, बीड यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

४. प्रादेशिक परिवहन अधिकारी, प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी कलम १९ (६) चा भंग दिसून येत आहे. म्हणून त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.कमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१.०३.२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

५. प्रादेशिक परिवहन अधिकारी, प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी आयोगास कोणतीही पूर्वसूचना न देता अथवा पूर्व परवानगी न घेता जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी सुनावणीस अनुपस्थित राहिले असल्याने त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.(२२२/१५)/सहा, दि.०१.१२.२०१५ नुसार कार्यवाही करावी.

६. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.- 19058 दिनांक :- 31/12/2025 नोंदणीकृत टपालाद्वारे

प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता,

प्रादेशिक परिवहन अधिकारी, प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक २११९/२०२५ व २१२२/२०२५**
**बोर्ड क्र. २९ व ३०**

श्री. प्रतीक नवनाथ सरवदे, — अपिलार्थी
रा. महात्मा फुले नगर, धानोरा रोड, बीड,
मो.नंबर ९९७५३६७१४३

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी क्र.१
प्रशासकीय अधिकारी, जिल्हा रुग्णालय कार्यालय, बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, बीड

**(सुनावणी दिनांक ०८.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२७.०५.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| सु. बोर्ड अ.क्र. | द्वितीय अपील क्रमांक | माहिती अर्जाचा दिनांक | माहितीचा विषय/ तपशिल |
|---|---|---|---|
| २९ | २११९/२०२५ | २१.०१.२०२५ | जिल्हा रुग्णालय बीड येथील वर्ग-१ व वर्ग -२ निवासस्थानाची दुरुस्तीचे कामाचे अंदाजपत्रक प्र.आ. कार्यारंभ आदेश, इ-निवीदा प्रणाली यांची माहिती मिळणेबाबत. |
| ३० | २१२२/२०२५ | २१.०१.२०२५ | सन २०२३-२४ मध्ये DPDC च्या कामाचा तपशील मिळणेबाबत (जिल्हाधिकारी बीड यांच्याकडून प्राप्त प्रशासकीय मान्यता प्रमाणे) |

प्रस्तुत प्रकरणात, आयोगापुढील कागदपत्रावरुन, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास विहित मुदतीत प्रतिसाद दिला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय

अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम १९ (६) चा भंग झालेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती देण्यास टाळाटाळ केली जात आहे, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन अपिलार्थी यांना माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही त्यामुळे अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी, प्रशासकीय अधिकारी, जिल्हा रुग्णालय कार्यालय, बीड यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.
२. तत्कालीन जन माहिती अधिकारी, प्रशासकीय अधिकारी, जिल्हा रुग्णालय कार्यालय, बीड यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात विहित मुदतीत कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच **दि.२४.०२.२०२६ रोजी** व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुद्ध वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.
३. जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, बीड यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.
४. उप संचालक, आरोग्य सेवा मंडळ, छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी कलम १९ (६) चा भंग दिसून येत आहे. म्हणून त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.केमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१.०३.२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.
५. उप संचालक, आरोग्य सेवा मंडळ, छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी आयोगास कोणतीही पूर्वसूचना न देता अथवा पूर्व परवानगी न घेता जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी सुनावणीस अनुपस्थित राहिले असल्याने त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.(२२२/१५)/सहा, दि.०१.१२.२०१५ नुसार कार्यवाही करावी.
६. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे दोन द्वितीय अपिले निकाली काढण्यात येत आहे.

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

---

**जा.क्र.** 19057 **दिनांक :-** 31/12/2025 **नोंदणीकृत टपालाद्वारे**

प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता,

उप संचालक, आरोग्य सेवा मंडळ, छत्रपती संभाजीनगर

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ३५४२/२०२५
बोर्ड क्र.३१

श्री. प्रविण धनाजी शेजूळ,
रा. दिडगाव, पो. बोरगांव,
ता. सिल्लोड, जि. छत्रपती संभाजीनगर,
मो. नंबर-७०२०९६४०८७ — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
जिल्हा हिवताप अधिकारी,
जिल्हा हिवताप अधिकारी कार्यालय, बीड — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
सहाय्यक संचालक,
आरोग्य सेवा हिवताप, लातूर — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०८.१२.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.२९.०७.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी यांचे वतीने प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १९.०५.२०२५ | सन २००५ ते २०१७ या कलावधीतील हंगामी फवारणी कार्यक्रम राबवील्याची माहिती व कोषागारातून अदा केलेल्या वेतनाची प्रत. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती देण्याचे आदेशीत करुनही जन माहिती अधिकारी यांनी अद्यापर्यंत माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांचे प्रतिनिधी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.१५.०७.२०२५ रोजी सुनावणी घेऊन, सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा (हिवताप), लातूर यांनी अपिलार्थी यांना जिल्हा हिवताप अधिकारी, बीड यांनी पोलीस स्टेशन, बीड येथे दिलेल्या कागदपत्राची पोहंच तसेच मुळ अर्जामध्ये अपिलकर्त्याने मागितलेली माहिती उपलब्ध असल्यास आठ दिवसांत अर्जदारास त्वरीत उपलब्ध करुन देणेबाबत आदेशीत करुन सदर अपिल निकाली काढल्याचे दिसून येत आहे. प्रथम अपिलाच्या आदेशाप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन दिली नाही याबाबीची आयोगाने गंभीर दखल घेतलेली आहे. त्यामुळे अपिलार्थी यांच्या प्रतिनिधीने केलेल्या युक्तिवादात व द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती, जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद व अधिनियमातील तरतुदी याचा सारासार विचार करता, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.१५.०७.२०२५ रोजीच्या निर्णयात बदल करण्याची आवश्यकता आयोगास दिसून येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा जिल्हा हिवताप अधिकारी,जिल्हा हिवताप अधिकारी कार्यालय, बीड यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ. मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा हिवताप, लातूर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 19063 दिनांक : 31/12/25

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ०५४२/२०२५
बोर्ड क्र.३२

अ‍ॅड. शरद रावसाहेब चौधरी,
मु. पो आष्टी सिव्हील कोर्ट आष्टी,
ता. आष्टी, जि. बीड. — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
दुय्यम निबंधक श्रेणी-१, आष्टी,
ता. आष्टी, जि. बीड — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
सह जिल्हा निबंधक वर्ग-१,
सह जिल्हा निबंधक कार्यालय, बीड — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०८.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०३.०२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, श्री. घनशाम कृष्णा खेडसकर, दुय्यम निबंधक श्रेणी-१, आष्टी उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १२.०८.२०२४ | १. खरेदी खत नं.२८४६/२०२४ ची खरेदी (गुंठेवारी) कुठल्या नियमाला धरुन झाली त्याची संपूर्ण लेखाजोखा, २. दि.०१.०१.२०२४ पासून दि.१२.०८.२०२४ मध्ये सामाईक क्षेत्राच्या खरेदी खत किती, गुठेवारीचे खरेदी खत किती त्यांचे नं सहीत. ३. दि.०७.०७.२०२४ रोजी दुय्यम निबंधकाचा चार्ज कोणाकडे होता. ४. खरेदी खंत क्र.२८४६/२०२४ चे मूल्यांकन ७/१२ उतारा व प्रत्यक्ष जायमोक्यावरील मूल्यांकन झाले का ? |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती ही प्रश्नार्थक स्वरुपाची असल्यामुळे माहिती अधिकार कायदयातील कलम २(च) व्याख्यानुसार आपला अर्ज निकाली काढण्यात येत आहे असे अपिलार्थी यांना दि.१०.०९.२०२४ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे. तसेच अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.१८.१०.२०२४ रोजी सुनावणी घेऊन, जन माहिती अधिकारी तथा दुय्यम निबंधक श्रेणी-१, आष्टी यांनी कार्यालयाचे पत्र जा.क्र./दु.नि.आष्टी/RTI २०२५ दि.१०.०९.२०२४ अन्वये माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम २ (च) नुसार कळविण्यात आल्यामुळे प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, दिशाभूल करणारी माहिती दिली, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.१८.१०.२०२४ रोजी सुनावणी घेऊन, जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही कायम ठेवून प्रथम अपील निकाली काढल्याचे दिसून येत आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती, जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद व अधिनियमातील तरतुदी याचा सारासार विचार करता, प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयात बदल करण्याची आवश्यकता आयोगास दिसून येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

<u>आदेश</u>

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 19069 दिनांक : 31/12/25

## राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहितीआयोग,खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे,छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| बोर्ड क्रं. ३३ | द्वितीय अपील क्रं. ३८१७/२०२५ |
|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. राहुल विनायकराव चाळक,<br>रा. ताकडगाव, पो. केकतपांगरी, ता.गेवराई, जि. बीड-४३११२७<br>मो. नंबर-७०३०००७१०३ | | अपिलार्थी |

विरुध्द

| सु. बोर्डक्रं. | द्वितीय अपील क्रं. | जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी | उत्तरवादी क्रं.१ व २ | उपस्थिती |
|---|---|---|---|---|
| ३३ | ३८१७/२०२५ | सरकारी कामगार अधिकारी, सरकारी कामगार अधिकारी कार्यालय, आदर्श नगर, डी.पी. रोड, बीड-४३११२२ | उत्तरवादी क्रं. १ | अनुपस्थित |
| | | सहाय्यक कामगार आयुक्त, सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालय, सद्भावना नगर, विजया गॅस एजन्सी जवळ, औसा रोड, लातूर | उत्तरवादीक्रं. २ | अनुपस्थित |

**( सुनावणीदिनांक ०८.१२.२०२५ )**

अपिलार्थी यांनी दिनांक १४.०८.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपिल दाखल केले आहे. सदर द्वितीय अपिलांची एकत्रित सुनावणी दिनांक १०.११.२०२५ रोजी घेण्यात आलेली आहे. तत्पुर्वी सुनावणीचा दिनांक व वेळ अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आला होता. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी सुनावणी दरम्यान उपलब्ध करुन देण्यात आलेली होती. त्यानुसार आज रोजी, सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहितीची मागणी केलेली आहे.

| बोर्ड क्रं. | माहिती अर्ज दिनांक | कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील क्रं. | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|---|---|
| ३३ | ०२.०५.२०२५ | ३८१७/२०२५ | दि.०१ जानेवारी २०२२ ते माहिती मिळेपर्यंत या |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | कालावधीतील महाराष्ट्र ईमारत व इतर बांधकाम कामगार यांना मिळालेल्या विविध योजनाची माहिती त्यांची संख्या, अपघातात त्यांना केलेली आर्थिक मदत त्यांच्यानावानिशी संपूर्ण माहिती मिळणेबाबत व इतर.. चार मुद्याबाबत |

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी अवगत केले की, जन माहिती अधिकारी यांनी मला कोणतीच माहिती दिलेली नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मोघम व दिशाभूल करणारी दिली, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली असल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांचा युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांना दि.२८.०५.२०२५ रोजीच्या पत्रान्वये, अपिलार्थी यांनी मागणी केलीली माहिती संकेतस्थळावर व डीबीटी द्वारे करण्याचे कामकाज असे सविस्तरपणे कळविण्यात आलेले आहे. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.२५.०७.२०२५ रोजी सुनावणी घेऊन, जन माहिती अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कल्याणकारी मंडळ तथा सरकारी कामगार अधिकारी, बीड यांनी अपिलकर्ते अर्जदार यांच्या अर्जावर विहित वेळेत योग्य ती कार्यवाही केल्याचे दिसून येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही कायम ठेवून प्रथम अपील निकाली काढल्याचे दिसून येत आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती, जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद व अधिनियमातील तरतुदी यांचा सारासार विचार करता, प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या उक्त नमूद निर्णयात बदल करण्याची आवश्यकता आयोगास दिसून येत नाही.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्यमाहितीआयुक्त,
खंडपीठछत्रपती संभाजीनगर

जावक क्र./ 19065 /दि. 31/12/25

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ४६५६/२०२५**
**बोर्ड क्र.३४**

श्री. रमेश भागचंद शिंदे,
रा. भोसे, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर,
ह.मु. पाईपलाईन रोड, सावेडी अ.नगर,
मो. नंबर-९६२३०५७१६७ — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी,
महिला व बाल विकास विभाग, बीड — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विभागीय उप आयुक्त, महिला व बाल विकास ज्युबलीपार्क,
पॅरामाऊंट मेडीकल स्टोअरच्या पाठीमागे, जिंदानी लॉन जवळ,
छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०८.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१०.१०.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी प्रथम अपिलीय अधिकारी, श्री. के. एफ. राठोड, विभागीय उप आयुक्त, महिला व बाल विकास, छत्रपती संभाजीनगर विभाग, उपस्थित आहेत. अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०६.११.२०२४ | दि.१९.०१.२०२४ ते आजपावेतो या कालावधीतील १. माझी पत्नी कु. राणी दुर्गाजी गलधर ऊर्फ सौ. राणी रमेश शिंदे हिने माझ्या विरुध्द महिला सेल, बीड यांचेकडे दाखल केलेल्या मूळ तक्रार/फिर्यादीची प्रमाणीत प्रत. २. तसेच त्या अर्जामध्ये झालेल्या कु. राणी दुर्गाजी गलधर ऊर्फ सौ. राणी रमेश शिंदे हिच्या जबाबाची प्रमाणीत प्रत. ३. माझे विरुध्द तक्रार दाखल करणेकामी महिला सेल, बीड यांनी चकलांबा पोलीस स्टेशन, ता. गेवराई, जि.बीड यांना दिलेल्या पत्राची प्रमाणीत प्रत. |

प्रस्तुत प्रकरणात, आयोगापुढील कागदपत्रावरुन, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास विहित मुदतीत प्रतिसाद दिला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम ७ (१) चा भंग झालेला आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.०६.०५.२०२५ रोजी सुनावणी घेऊन,जन माहिती अधिकारी यांनी अर्जदाराच्या मूळ अर्जामध्ये नमूद केलेली माहिती संबंधित कार्यालयाकडून प्राप्त करवून घेऊन माहितीचा अधिकार अधिकनयम २००५ अन्वये देय असलेलीम ाहिती अर्जदारास ०७ (सात) दिवसांचया आत विनामूल्य उपलब्ध करुन देण्यात यावी, असा आदेश पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, अपुर्ण व अर्धवट माहिती दिल्याने, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात प्रथम अपिलीय अधिकारी यांचा युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती देण्याचे आदेशीत करुनही जन माहिती अधिकारी यांनी परिपुर्ण माहिती दिल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनामध्ये तथ्यांश दिसून येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, महिला व बाल विकास विभाग, बीड यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, महिला व बाल विकास विभाग, बीड यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात विहित मुदतीत कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच **दि.२४.०२.२०२६ रोजी** व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. विभागीय उप आयुक्त, महिला व बाल विकास ज्युबलीपार्क, पॅरामाऊंट मेडीकल स्टोअरच्या पाठीमागे, जिंदानी लॉब जवळ, छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

४. विभागीय उप आयुक्त, महिला व बाल विकास ज्युबलीपार्क, पॅरामाऊंट मेडीकल स्टोअरच्या पाठीमागे, जिंदानी लॉब जवळ, छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी आयोगास कोणतीही पूर्वसूचना न देता अथवा पूर्व परवानगी न घेता जन माहिती अधिकारी सुनावणीस अनुपस्थित राहिले असल्याने त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.(२२२/१५)/सहा, दि.०१.१२.२०१५ नुसार कार्यवाही करावी.

५. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

जा.क्र. 19056 दिनांक : 31/12/2025 नोंदणीकृत टपालाद्वारे

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ४५४९/२०२५ व ४९१७/२०२५**
**बोर्ड क्र. ३५ व ३७**

श्री. विलास किसनराव ढोले,
रा. छत्रपती कॉलनी धांडेनगर, बीड — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
अतिरिक्त कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विदयुत वितरण कंपनी मर्या., बीड शहर उपविभाग — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.,
बीड शहर उपविभाग — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०८.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०६.१०.२०२५ व दि.३०.१०.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपिले दाखल केलेले आहेत. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी, श्री. विक्रम सीताराम चव्हाण, अति. कार्यकारी अभियंता, बीड (श.) उपविभाग, महावितरण, बीड उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| सु.बोर्ड. अ.क्र. | द्वितीय अपील क्रमांक | माहिती अर्जाचा दिनांक | माहितीचा तपशील/ विषय |
|---|---|---|---|
| ३५ | ४५४९/२०२५ | २३.०७.२०२५ | दि.२३.०७.२०२५ ते दि.०९.०८.२०२५ चे दरम्यान MSEDCL UiNiT३ कार्यालय अंतर्गत एस टी एस वर्कशॉप बार्शी नाका डि पी वरुन ते विंगडे तर्फे गट नं २० मधील विहिरीचे पुर्वे बाजू पर्यंत किती पोला, तारा, वजन तान, चिमण्या त्यांचे इस्टीमेंटची प्रत इस्टीमेंट |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | कोणत्या अधिकारी यांनी केले त्यांचे नाव नवनाथ किसनराव ढोले यांनी किती कोटेशन भरले त्याची पावती, व इतर.. |
| ३७ | ४९१७/२०२५ | ११.०८.२०२५ | दि.११.०९.२०२३ रोजी अतिरिक्त कार्यकारी अभियंता आवक टेबल माळीवेस -- बीड, कार्यकारी अभियंता आवक टेबल चे सीसीटीव्ही बाबत व इतर.. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती प्राप्त झालेली नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली परिपुर्ण माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या दोन्ही माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांना देय होणारी दि.०१.०३.२०२४ रोजीच्या पत्रान्वये उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. अपिलार्थी यांनी माहिती स्वीकारुन पोहच दिलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न मिळाल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने माहिती उपलब्ध करुन दिल्याचे दिसून येत आहे. तथापि या प्रकरणी माहितीचा अर्ज दि.२३.०७.२०२५ व ११.०८.२०२५ रोजीचा आहे. जन माहिती अधिकारी यांनी दि.०१.०३.२०२४ रोजी माहिती दिल्याचे या प्रकरणी विचारात घेणे संयुक्तिक ठरणार नाही. त्यामुळे अपिलार्थी यांच्या युक्तिवादात व त्यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा अतिरिक्त कार्यकारी अभियंता,महाराष्ट्र राज्य विदयुत वितरण कंपनी मर्या., बीड शहर उपविभाग यांनी अपिलार्थी यांच्या दोन्ही जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. कार्यकारी अभियंता,महाराष्ट्र राज्य विदयुत वितरण कंपनी मर्या., बीड शहर उपविभाग यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे दोन द्वितीय अपिले निकाली काढण्यात येत आहे.

(स्वाक्षरी)

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 19066 दिनांक : 31/12/25

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ४५५९/२०२५**
**बोर्ड क्र.३६**

श्री. उमेश आश्रु क्षिरसागर,
रा. चुंबळी, पो. तांबाराजुरी,
ता. पाटोदा, जि. बीड-४१४२०४, — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता (प्रशासन),
महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी, मर्यादित, बीड — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
अधिक्षक अधिक्षक अभियंता,
महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी, मर्यादित, बीड — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०८.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०७.१०.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, श्री. योगेंद्र पांडूरंग कांबळे, कार्यकारी अभियंता (प्रशासन), उपस्थित आहेत. तसयेच प्रथम अपिलीय अधिकारी व अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ३०.०७.२०२५ | दि.०१ जानेवारी २०२४ ते ३० जुलै २०२५ या कालावधीतील अधिक्षक अभियंता, महाहाराष्ट्र राज्य विदयुत वितरण कंपनी मर्यादित विदयुत भवन मंडळ कार्यालय, बीड या कार्यालयाने कलम ४(१)ख मधील ०१ ते १७ मुद्याची माहिती. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये व्यक्तीश: माहितीची मागणी केलेली आहे. माहिती तयार असून अपिलार्थी यांना संपर्क साधला असता माहिती उपलब्ध करुन घेण्यासाठी कार्यालयात उपस्थित राहिले नाहीत.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न नाही, सुनावणी घेतली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात जन माहिती अधिकारी यांचा युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी आयोगाच्या पटलावर दि.०१.१२.२०२५ रोजीचे लेखी निवेदन सादर केलेले आहे. त्या निवेदनाचे अवलोकन केले असता, त्यांना माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. तसेच जन माहिती अधिकारी यांनी माहिती संपर्क साधूनही अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन घेण्याचे टाळले आहे. त्यामुळे अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन घेण्यात स्वारस्य दिसून येत नाही. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांच्या लेखी निवेदनात व त्यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**<u>आदेश</u>**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 19067 दिनांक : 31/12/25

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ४२१५/२०२५**
**बोर्ड क्र.३८**

श्री. शेख गुलाम मुस्तफा गुलाम दस्तगीर,
रा. शहीशाह नगर, मेराज मस्जीद जवळ,
मोहसीन किराणा स्टोअर्स समोर, बीड — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
उप कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्या.,
विभागीय कार्यालय, अंबाजोगाई, जि. बीड — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
अधिक्षक अभियंता,
महाराष्ट्र राज्य विदयुत वितरण कंपनी मर्या.,
मंडळ कार्यालय, बीड — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०८.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१५.०९.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २६.०६.२०२५ | अनाधिकृत व बेकायदेशीर दिलेली वीज कनेक्शन रद्द करणेबाबत दि.०९.०९.२०२४ रोजी दिलेल्या तक्रार अर्जावर कोणती कार्यवाही करण्यात आलली याची माहिती देणेबाबत. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती अद्याप मिळाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांचा युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची, तक्रार अर्जावर केलेल्या कार्यवाहीची अपेक्षा केलेली केलेली असून अशा माहितीचा माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मधील माहिती या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये समावेश होत नाही. त्यामुळे अपिलार्थी यांच्या युक्तिवादात व त्यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत नाही, म्हणून ती अपिलार्थी यांना देय होणार नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

जा.क्र. 18183 दिनांक : 24.12.2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक २५६९/२०२५**
**बोर्ड क्र.३९**

श्री. तांबे नितीन मधुकरराव,
मु. पो. तांबाराजुरी, ता. पाटोदा,
जि. बीड-४१४२०४ — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
महाराष्ट्र राज्य विदयुत वितरण कंपनी मर्यादित उपविभागीय कार्यालय, पाटोदा, जि. बीड — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपकार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विदयुत वितरण कंपनी मर्यादित उपविभागीय कार्यालय, पाटोदा, जि. बीड — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०८.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२३.०६.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २५.०२.२०२५ | मुद्दा क्रं. दि.०९.१२.२०२४ रोजी पोलीस ठाणे पाटोदा यांनी आपल्या कार्यालयास दिलेल्या पत्रानुसार आपण घटनास्थळी पाहणी करुन जो अहवाल सादर केलेला |

| | |
|---|---|
| | होता. त्या अहवालाची प्रत व सदरील अहवालानुसार मुख्याध्यापक माध्यमिक विद्यालय, तांबाराजुरी यांना consumer No. ७७७७७४४१६४९८ अन्वये देण्यात आलेल्या दंड स्वरुपातील बिलाची रक्कम महावितरण विभागास भरणा केलेल्या कागदपत्रांची/ पावतीची प्रमाणित प्रती देण्यात याव्यात मुद्दा क्र.२, मुख्याध्यापक मा.वि.तांबाराजुरी यांनी consumer No. ७७७७७४४१६४९८ या बिलाच्या दंडाची रक्कम आजरोजीपर्यंत महाविरतण विभागास भरणा केलेली नसेल तर आपल्या विभागाकडून शासन नियमानुसार संबंधितावर केलेल्या कारवाई अहवालाची प्रती सत्यप्रतीत देण्यात याव्यात. |

प्रस्तुत प्रकरणात, आयोगापुढील कागदपत्रावरुन, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास विहित मुदतीत प्रतिसाद दिला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम १९ (६) चा भंग झालेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, जाणीवपुर्वक माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी, महाराष्ट्र राज्य विदयुत वितरण कंपनी मर्यादित उपविभागीय कार्यालय, पाटोदा, जि. बीड यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी, महाराष्ट्र राज्य विदयुत वितरण कंपनी मर्यादित उपविभागीय कार्यालय, पाटोदा, जि. बीड यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात विहित मुदतीत कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच **दि.२४.०२.२०२६ रोजी**

व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. उपकार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विदयुत वितरण कंपनी मर्यादित उपविभागीय कार्यालय, पाटोदा, जि. बीड यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

४. कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विदयुत वितरण कंपनी मर्यादित विभाग, बीड यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी कलम १९ (६) चा भंग दिसून येत आहे. म्हणून त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.केंमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१.०३.२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

५. कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विदयुत वितरण कंपनी मर्यादित विभाग, बीड यांना आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी आयोगास कोणतीही पूर्वसूचना न देता अथवा पूर्व परवानगी न घेता जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी सुनावणीस अनुपस्थित राहिले असल्याने त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.(२२२/१५)/सहा, दि.०१.१२.२०१५ नुसार कार्यवाही करावी.

६. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 19055 दिनांक : 31/12/2025 नोंदणीकृत टपालाद्वारे

प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता,
कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विदयुत वितरण कंपनी मर्यादित विभाग, बीड

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक २६१०/२०२५**
**बोर्ड क्र.४०**

श्री. धुराजी कचरु शेजाळ, अपिलार्थी
मु. पो. शिरसमार्ग, ता. गेवराई, जि. बीड,
मो. नंबर-७४४८१४५६९५

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
उप कार्यकारी अभियंता,
जायकवाडी पाटबंधारे विभाग क्र.०३, बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
कार्यकारी अभियंता,
जायकवाडी पाटबंधारे विभाग क्र.०३, बीड

**(सुनावणी दिनांक ०८.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२५.०६.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, श्री.एम.आर.शेळके, उप कार्यकारी अभिलयंता, व प्रथम अपिलीय अधिकारी, श्री. नखाते वि.वि., कार्यकारी अभियंता अपिलार्थी उपस्थित आहेत. अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०८.०१.२०२५ | जानेवारी २०१० ते डिसेंबर २०२२ या कालावधीतील पोलीस उप अधिक्षक लाचलुचपत प्रति.विभाग बीड अथवा इतर ठिकाणी खालील कर्मचारी यांनी किती वेळा पंच म्हणून काम केले त्यांचे जावक आदेश प्रती १. वसिम सय्यद सलिम, द.कारकून, २. एस.व्ही.भुते, शिपाई. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती कार्यालयात उपलब्ध नाही असे अपिलार्थी यांना दि.०७.०२.२०२५ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.२५.०३.२०२५ रोजी सुनावणी घेऊन, सन २०१० ते २०२२ या कालावधीत पंच म्हणून तपास काम पुर्ण झाले कसे संबंधित विभागाचे कामकाज पुर्ण झाले कसे माहिती घेऊन, दहा दिवसाच्या आत संबंधित अपिलार्थीस कळवावे, विभागाकडून प्राप्त झालेल्या अभिप्राय आधारे माहिती अधिकार अधिनियम २००५ नियमानुसार माहिती देण्याचे किंवा माहिती नाकारण्याचे कार्यवाही करण्यात यावी, असे जन माहिती अधिकारी यांना आदेशीत करुन प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती नाकारली आहे, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती देण्याचे आदेशीत करुनही जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिली नाही याबाबीची आयोगाने गंभीर दखल घेतलेली आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती, जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद व अधिनियमातील तरतुदी याचा सारासार विचार करता, प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या दि.२५.०३.२०२५ रोजीच्या उक्त नमूद निर्णयात बदल करण्याची आवश्यकता आयोगास दिसून येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, जायकवाडी पाटबंधारे विभाग क्र.०३, बीड यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. कार्यकारी अभियंता, जायकवाडी पाटबंधारे विभाग क्र.०३, बीड यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.---18184--- दिनांक :---24.12.2025---

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ३३६८/२०२५**
**बोर्ड क्र.४१**

श्री. बाळासाहेब दामोधरराव फपाळ पाटील, मु. पो. तेलगांव (बु.), ता. धारुर, जि. बीड. मो. नंबर-७७४४८१६०६०. — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण उपविभाग, तेलगांव, ता. धारुर, जि. बीड — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, बीड — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०८.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२४.०७.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, व जन माहिती अधिकारी, श्री. ए.व्ही. पाईकराव, जलसंधारण अधिकारी उपस्थित आहेत. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २३.१२.२०२४ | सन २०२२-२०२३, २०२३-२०२४ या कालावधीतील माजलगांव तालुक्यातील मौजे बेलुरा (गट नं.६) धारुर तालुक्यातील मौजे संगम (गट नं.७५) मध्ये करण्यात आलेल्या या दोन्ही कामाचे अंदाजपत्रके, कार्यारंभ आदेश, काम करणाऱ्या एजन्सीला कामापोटी देण्यात आलेल्या देयकाचा तपशिल, कामावर प्रत्यक्षात करण्यात आलेला खर्च, सद्याचा कामाची सद्यस्थिती दोन्ही काम पुर्णत्वाचा कार्यकारी अभियंत्याच्या स्वाक्षरीचा दाखला. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती देण्याचे आदेशीत करुनही जन माहिती अधिकारी यांनी मला अद्यापपर्यंत माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अगवत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांना दि.२४.०१.२०२५ रोजीच्यापत्रान्वये, २९८/- रुपये जमा करुन माहिती उपलब्ध करुन घेण्याबाबत कळविले आहे. तथापि अपिलार्थी यांनी कोणताही प्रतिसाद दिलेला नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.२८.०४.२०२५ रोजी सुनावणी घेऊन, जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय जलसंधारण अधिकारी, यांनी अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती १५ दिवसांमध्ये विनाशुल्क पुरविण्यात यावी असा आदेश पारित केल्याचे दिसून येत आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन दिल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे अपिलार्थी यांच्या युक्तिवादात व त्यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती, जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद व अधिनियमातील तरतुदी याचा सारासार विचार करता, प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या दि.२८.०४.२०२५ रोजीच्या उक्त नमूद निर्णयात बदल करण्याची आवश्यकता आयोगास दिसून येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण उपविभाग, तेलगांव, ता. धारुर, जि. बीड यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.
२. जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, बीड यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.
३. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 18185 दिनांक : 24.12.2025 नोंदणीकृत टपालाद्वारे

प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता,

--

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ३८८२/२०२५**
**बोर्ड क्र.४२**

श्री. सुनिल रामू चव्हाण, — अपिलार्थी
रा. जायकवाडी नाथ नगर (उत्तर),
ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर-४३११४८
मो. नंबर-७४९९३५८१३५

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
उपविभागीय अभियंता,
लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
कार्यकारी अभियंता,
लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, बीड

**(सुनावणी दिनांक ०८.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०९.०८.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, श्री. ए. व्हि. मिसाळ, उपविभागीय अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी, श्री. नखाते वि.वि, कार्यकारी अभियंता, (तांत्रिक कक्ष) उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १८.०२.२०२५ | दि.०६.०१.२०२५ ते आजपर्यंत या कालावधीतील उपकार्यकारी अभियंता, माजलगांव पाटबंधारे विभाग, परळी वै. जि. बीड यांचे पत्र जा.क्र. मापावि/परळी वै./ आस्था-२/४३/सो. दिनांक ०६.०१.२०२५ च्यापत्रानुसार लाड-पागे समितीच्या शिफारशीनुसार सफाईल कामगारांच्या पाल्यांना वारसा हक्काने नियुक्ती मिळणेबाबत व इतर.. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, जन माहिती अधिकारी यांनी चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिलेली आहे. माहिती अर्जान्वये मागणी केलेली परिपुर्ण माहिती उपलब्ध

करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अगवत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांना दि.१०.०३.२०२५ रोजीच्या पत्रान्वये माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अगवत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, दिशाभूल करणारी माहिती दिल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती चुकीची व दिशाभूल करणारी मिळाली असल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना देय होणारी माहिती दिल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे अपिलार्थी यांच्या युक्तिवादात व त्यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत नाही. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र.--------19068------------------- दिनांक :31/12/25-----------

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ४००७/२०२५
बोर्ड क्र.४३

श्री. भानुदास शिवाजी जिवे, — अपिलार्थी
रा. प्लॉट क्र.६९, अनुग्रह जबिंद बंगलो शेजारी, देवगिरी दर्गा रोड, छत्रपती संभाजीनगर. मो. नंबर-८३८०८३२२७८

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
सहाय्यक जिल्हा जलसंधारण अधिकारी,
जिल्हा परिषद लघु पाटबंधारे उपविभाग, आष्टी, जि.बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
उपविभागीय अधिकारी,
जिल्हा जलसंधारण अधिकारी,
जिल्हा परिषद लघु पाटबंधारे उपविभाग, आष्टी, जि. बीड

## (सुनावणी दिनांक ०८.१२.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.२९.०८.२०२८ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ऑनलाईन | १.मौजे खडकत ता. आष्टी, जि. बीड येथील गट क्रमांक ४२० शिवारातील पाझर तलावाचे एकूण बुडीत क्षेत्र किती हे. आहे २. मौजे खडकत ता. आष्टी.जि.बीड येथील गट क्रमांक ४२० शिवारातील पाझर तलावाचे भूसंपादन नकाशाची सत्यप्रत मिळावी ३. मौजे खडकत ता. आष्टी, जि. बीड येथील गट क्रमांक ४२० शिवारातील पाझर तलावाची भूसंपादन award कॉपी मिळावी. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपर्यंत माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, कोणताही प्रतिसाद / माहिती मिळाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांचा युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्रयस्थ पक्षाची व मोघम माहिती मागितल्याचे दिसून येत आहे. नेमकी मागितलेली नाही. सारांशाने, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अधिनियमातील कलम ८ (१) (त्र) मधील व्यापक जनहिताच्या कसोटीवर उतरत नसल्यामुळे ती अपिलार्थी यांना देय होणार नाही, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 19069 दिनांक : 31/12/25

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ४६९०/२०२५**
**बोर्ड क्र.४४**

श्री. सय्यद सादेक सय्यद असद अली,
रा. लाईन गल्ली कारंजा रोड, बीड-४३११२२,
मो. नंबर-९४२२५९१८०९.
अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
उप विभागीय अभियंता,
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उपविभाग, बीड
: उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, बीड
: उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०८.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१३.१०.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, श्री. पठाण एम.जी. पठाण, म.जी.प्रा.उपविभाग,बीड व प्रथम अपिलीय अधिकारी,श्री. ग.ज.खराटे, कार्यकारी अभियंता उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १९.०८.२०२५ | योजना सुरु झाल्यापासून आजपर्यंत या कालावधीतील बीड शहरातील अटल अमृत पाणी पुरवठा योजनेच्या झोन निहाय मंजूर करण्यात आलेल्या नकाशाच्या पत्राची प्रत २. प्रत्येक झोन मध्ये समाविष्ठ असलेल्या भाग/ वार्डाची तपशीलची माहिती प्रत दयावी, ३. योजनेच्या झालेल्या Audit कार्यालयाकडून प्राप्त पत्र व Audit remarke ची माहितीची प्रत दयावी, ४. अमृत योजना पुर्ण झाले बाबत प्रमाणपत्राची प्रत दयावी. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांना दि.२०.०८.२०२५ रोजीच्या पत्रान्वये माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न दिल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना देय होणारी माहिती उपलब्ध करुन दिल्याचे दिसून येत आहे. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.-----19020----- दिनांक :-31/12/25-----

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १६१०/२०२५**
**बोर्ड क्र.४५**

श्री. मोहम्मंद इम्रान हारुण,
रा. प्लॉट नं.४७, मोतीवाला नगर,
एम.जी.एम.हॉस्पीटल समोर, छत्रपती संभाजीनगर.
मो. नंबर-९१५८२०१३६७ — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
कृषि उपसंचालक,
जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालय, बीड — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, बीड — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०८.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२३.०४.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंड्पीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, श्री. जाधवर दादाराव विठ्ठलराव, कृषि उपसंचालक, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी,बीड उपस्थित आहेत. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांचे वतीने प्रतिनिधी, श्री. आर. आर. मेश्राम, सहाय्यक प्रशासन अधिकारी, उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १४.०१.२०२५ | दिन मोहम्मद खान पिता अख्तर खान हे माझे सासरे असून कृषी विभाग बीड येथून त्यांनी मागील वर्षी स्वच्छा निवृत्ती स्वीकारली आहे तसेच त्यांनी स्वेच्छा निवृत्ती स्विकारण्यासाठी आपल्या कार्यालयात जो कागदपत्रासह प्रस्ताव सादर केलेला होता त्या प्रस्तावातील संपूर्ण कागदपत्रांची पुर्ण संचीकेची साक्षांकित प्रत देण्यात यावी. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती त्रयस्थ पक्षाशी संबंधीत असल्यामुळे माहिती अधिकार अधिनियम कलम ८(१)(त्र) नुसार वैयक्तिक स्वरुपाची माहित असल्यामुळे देता येत नाही असे कळविण्यात आलेले आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांचे वतीने प्रतिनिधी यांनी अगवत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.०४.०३.२०२५ रोजी सुनावणी घेऊन, सदरील माहिती त्रयस्थ पक्षाशी संबंधित असलेमुळे व माहिती अधिकार अधिनियम कलम ८(१)(त्र) नुसार वैयक्तिक स्वरुपाची माहिती आहे, सदर माहितीच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद योग्य असल्याने प्रथम अपील निकाली काढले, असा निर्णय पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न दिल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्रयस्थ पक्षाची माहिती मागितल्याचे दिसून येत आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती, जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद व अधिनियमातील तरतुदी याचा सारासार विचार करता, प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या दि.०४.०३.२०२५ रोजीच्या उक्त नमूद निर्णयात बदल करण्याची आवश्यकता आयोगास दिसून येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 19071 दिनांक : 31/12/25

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ३८८३/२०२५
बोर्ड क्र.४६

श्री. हरिभाऊ नामदेव वनवे, — अपिलार्थी
रा. रोहतवाडी, ता. पाटोदा, जि. बीड-४३१००१,
मो. नंबर ९४२०६५७३९४

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
कृषि अधिकारी,
तालुका कृषि अधिकारी कार्यालय, पाटोदा, जि. बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
तालुका कृषि अधिकारी,
तालुका कृषी अधिकारी कार्यालय, पाटोदा, जि. बीड

**(सुनावणी दिनांक ०८.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१९.०८.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाटी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २७.०३.२०२५ | सन २०२३ चे खरिप (सोयाबीलचे अनुदान न मिळाल्याबाबत) माझा दि.१३.०३.२०२५ चे अर्जावर काय कार्यवाही करण्यात आली याबाबतची तपशिल मिहणेबाबत. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती

मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांचा युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये कार्यवांही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाला संबंधीत माहिती मागितल्याचे दिसून येत आहे. माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम २(च) मध्ये माहितीची व्याख्या दिलेली आहे. या व्याख्येनुसार माहिती तयार करुन, माहितीचे संस्करण करुन, इतर कार्यालयाकडून प्राप्त करुन घेऊन, लेखी, खुलासेवजा, स्पष्टीकरण मागणारी इत्यादी माहिती देणे अभिप्रेत नाही. अपिलार्थींचा अर्ज ज्यावेळी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात प्राप्त होतो त्यावेळी जी माहिती त्यांच्या कार्यालयात ज्या स्थितीत उपलब्ध असते ती माहिती त्याच स्थितीत अपिलार्थीस देय होते. त्यामुळे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मधील माहिती या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये समावेश होत नाही, म्हणून ती अपिलार्थी यांना देय होणार नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

<u>आदेश</u>

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 19072 दिनांक : 31/12/25

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक २३०५/२०२५ व २३०६/२०२५**
**बोर्ड क्र.४७ व ४८**

अॅड. सदानंद मा. वाघमारे, — अपिलार्थी
रा. सरस्वती शाळेजवळ, पंचशील नगर,
ता.जि.बीड-४३११२२, मो. नंबर ९८२२१३०३६६.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
उप कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग, बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग, बीड

**(सुनावणी दिनांक ०८.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१०.०६.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, श्री.अमोल विठ्ठलराव बोंन्द्रे, उप कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग, बीड व प्रथम अपिलीय अधिकारी, श्री. राम भालचंद्र कुलकर्णी, कार्यकारी अभियंता, उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| सु.बोर्ड अ.क्र. | द्वितीय अपील क्रमांक | माहिती अर्जाचा दिनांक | माहितीचा तपशील/ विषय |
|---|---|---|---|
| ४७ | २३०५/२००५ | ०९.०४.२०२५ | दि.०१.०४.२०२३ ते दि.३१.०३.२०२५ या कालावधीतील (Sub-Division wise, Beed, Majalgaon Satona, Amjajogai & Division) कंत्राटी कामगार जसे Helper, H.D.O.L.D.O. Watchman or security Guard, Karkoon Clerk. Drivier. All Operatior, Claner, बाहय अभिकरणामार्फत घेण्यात आले. सर्व मंजूर अंदाज पत्रकाच्या प्रती, सर्व नीवीदा आदेशाच्या प्रती, विभागाअंतर्गत एकूण कार्यरत संयंत्राचा उप विभाग निहाय पूर्ण तपशील त्या वरील कंत्राटी मदतनीस संख्या, सूरक्षा यंत्रणा कायदा २००५ व महाराष्ट्र शासन गृह विभाग |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | शासन परीपत्रक क्रं. पीएसए-१२१८/प्र.क्रं.३६८/विशा-४ दिनांक ११.१२.२०१९ नुसार सूरक्षारक्षकाची सेवा पुरवणारे कीती खाजगी अभिकरणाकडे PASARA नोंदणीकृत परवानाधारक आहेत त्याच्या प्रती, आदेशाच्या प्रती, Without परवानाधारक यांच्या आदेशाच्या प्रती, आईल आदेशाच्या सर्व छायांकित प्रमाणीत प्रती अंदाज पत्रका सहीत मिळाव्यात. |
| ४८ | २३०६/२०२५ | ०९.०४.२०२५ | दि.०१.०४.२०२३ ते दि.३१.०३.२०२५ या कालावधीतील विभागीय लेखा शाखेतील Cheque Drawn Register, Cash Book Register (Payment side & Receipt side) व सर्व प्रकारच्या निवीदेंच्या आदेशाच्या छायांकित प्रमाणित प्रती मिळाव्यात |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची मागणी केलेली आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अगवत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती देण्याचे टाळले होते, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांचे लेखी निवेदन आयोगाच्या पटलावर सादर केलेले आहे. निवेदनाचे अवलोकन केले असता, त्यांना माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. तथापि अपिलार्थी यांनी मोघम, त्रोटक व विस्तृत स्वरुपाची माहिती मागितल्याचे दिसून येत आहे. अशी माहिती एकत्रित / संकलित करण्याकरिता सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधन सामग्री मोठ्या प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाही. या प्रकरणाच्या अनुषंगाने मा. सर्वोच्च न्यायालयाने सेंट्रल बोर्ड ऑफ सेकंडरी एज्युकेशन व इतर विरुध्द आदित्य बंडोपाध्य व इतर सिव्हिल अपील नं.४६५४/२०११ या निर्णयाकडे सर्व संबंधितांचे लक्ष वेधण्यात येत आहे. या निर्णयामध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने माहिती अधिकाराचा योग्य वापर होणेबाबत लक्ष वेधलेले आहे. याचाही सर्वांनी विचार करणे आवश्यक आहे, असे आयोगाचे मत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे दोन द्वितीय अपिले निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 19073 दिनांक : 31/12/25

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ४४३३/२०२५ व २५९२/२०२५**
**बोर्ड क्र.४९ व ५०**

अॅड. सदानंद म. वाघमारे,
रा. सरस्वती शाळेजवळ, पंचशील नगर,
ता.जि. बीड-४३११२२.
मो. नंबर-९८२२१३०३६६

अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
उप कार्यकारी अभियंता (अ.का.),
यांत्रिकी विभाग, बीड

: उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
यांत्रिकी विभाग, बीड

: उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०८.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२५.०९.२०२५ व दि.२४.०६.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपिले दाखल केलेले आहेत. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, श्री. अमोल विठ्ठलराव बोंद्रे, उप कार्यकारी अभियंता (अ.का.), यांत्रिकी विभाग, बीड व प्रथम अपिलीय अधिकारी, श्री.राम भालचंद्र कुलकर्णी, कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग, बीड उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| सु. बोर्ड अ.क्र. | द्वितीय अपील क्रमांक | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय/ तपशिल |
|---|---|---|---|
| ४९ | ४४३३/२०२५ | २२.०७.२०२५ | Wrd.maha.gov.in या वेब साईट वरुण आपल्या कार्यालयाने ई निविदा क्र.४/२०२५-२६_WRDMN_१२०१४६८_I on;ine Sr.No.६ आणि ई निविदा दिनांक १७.०७.२०२५ रोजी online पब्लीश करण्यात आल्या. त्या मध्ये दोन्ही निविदा दुसऱ्यानंदा (Second call) प्रकाशीत |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | केल्या असा मजकूर आहे तर सदर निविदा पहिल्यान्दा (First Time) केंव्हा प्रकाशी केल्या कोणत्या कारणामूळे रद्द करण्यात आल्या. जनतेची फसवणूक करण्यात आली. करीता वरील निविदा First Time. वरील वेब साईट वर केव्हा प्रकाशीत केल्या, वर्तमान पत्राची व सर्व संबंधीत कागदपत्राच्या प्रती मिळाव्यात |
| ५० | २५९२/२०२५ | २१.०४.२०२५ | दि.०२.०४.२०२५ ले दि.१४.०४.२०२५ या कालावधीतील दि.०२.०४.२०२५ या पत्राद्वारे आपल्या विभागामार्फत प्रसिध्द केलेल्या निविदा सूचना क्र.१३ व १४ सन २०२४-२५ बाबात |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाप्रमाणे अपिलार्थी यांना दि.१०.०९.२०२५ रोजीच्या पत्रान्वये माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.१०.०९.२०२५ रोजी सुनावणी घेऊन, जन माहिती अधिकारी यांनी संबंधित अर्जदारास सदरील माहिती विनामूल्य उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशीत करुन, प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, मुद्दाम माहिती देण्याचे टाळले जाते, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी लेखी निवेदन आयोगाच्या पटलावर सादर केले आहे. सदर निवेदनाचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नाही असे नमूद केलेले आहे. तथापि या ठिकाणी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद व घेतलेला निर्णय आयोगास योग्य दिसून येत आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाप्रमाणे अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन दिल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे त्यांच्या निवेदनात व त्यांनी नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत नाही. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांचे दोन्ही द्वितीय अपिले निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे दोन्ही द्वितीय अपिले निकाली काढण्यात येत आहे.

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

जा.क्र. 19074 दिनांक : 31/12/25

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ४४५७/२०२५**
**बोर्ड क्र. ५१**

श्री. पाराराम गोविंद यादव,
रा. धुनकवड, ता. धारुर, जि. बीड — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, धुनकवड,
ता. धारुर, जि. बीड — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन,
नगर रोड, बीड — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०८.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२९.०९.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ११.०५.२०२५ | तांडावस्ती धुनकवाड नं.१ व २ मधील लेखा परीक्षण अहवाल २०२३-२०२४ ते २०२४-२५ सुधार योजना व तांडावस्ती प्रपत्रक अ.ब.क. रहिवाशी लोकसंख्या वस्ती मान्यता ठराव व सांकेतीक क्रमांक. |

प्रस्तुत प्रकरणात, आयोगापुढील कागदपत्रावरुन, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास विहित मुदतीत प्रतिसाद दिला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम ७ (१) चा भंग झालेला आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन माहिती देण्याचे आदेश दिलेले आहेत. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपर्यंत माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये,

कोणतीही माहिती आजपर्यंत मिळाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांचा युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी माहितीचा अर्ज दि.११.०५.२०२५ रोजी समाज कल्याण विभाग, सामाजिक न्याय व विशेष विभाग, बीड (BEED) यांना व प्रथम अपील दि.०६.०७.२०२५ रोजी इतर मागास बहुजन कल्याण बीड यांचेकडे केल्याचे दिसून येत आहे. प्रथम अपिलीय अधिकारी, सहायक संचालक इतर मागास बहुन कल्याण बीड यांनी दि.०३.०९.२०२५ रोजी सुनावणी घेऊन, ग्रामसेवक यांनी ०८ दिवसांमध्ये माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी असा आदेश पारित केल्याचे दिसून येत आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशानुसार अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन दिल्याचे दिसून येत नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती देण्याचे आदेशीत करुनही जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिलेली नाही याबाबीची आयोगाने गंभीर दखल घेतलेली आहे. त्यामुळे अपिलार्थी यांच्या युक्तिवादात व त्यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, धुनकवड, ता. धारुर, जि. बीड यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, धुनकवड, ता. धारुर, जि. बीड यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात विहित मुदतीत कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच **दि.२४.०२.२०२६ रोजी** द्वितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, नगर रोड, बीड यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

४. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 19054 दिनांक : 31/12/2025 नोंदणीकृत टपालाद्वारे

प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता,

१. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, धारुर, जि. बीड

२. सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण,डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, नगर रोड, बीड

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ३१२५/२०२५**
**बोर्ड क्र.५२**

श्री. तांदळे गणेश बन्सीधर,
रा. श्रीरामनगर, नगर रोड, बीड
मो. नंबर-९०२८६९५५५५ — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, बीड — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
प्रादेशिक उपसंचालक,
इतर मागास बहुजन कल्याण (प्रादेशिक) विभाग,
छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०८.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१४.०७.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी प्रथम अपिलीय अधिकारी यांचे वतीने प्रतिनिधी, श्री. एस. डी. राठोड, प्रमुख लिपीक उपस्थित आहेत. अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २८.०२.२०२५ | बारगजे लक्ष्मण गहिनीनाथ (समाज कल्याण निरीक्षक बीड) यांच्या नियुक्ती पासूनच्या कामकाजा संबंधी माहिती प्रथम नियुक्तीचे पद, शैक्षणिक कागदपत्रे, व्यवसायिक कागदपत्रे, मूळ पदासह त्यांच्या असलेले पदभार, पदोन्नती संबंधिची सविस्तर माहिती, त्यांनी आजपर्यंत कोण कोणत्या पदावर किती कार्यकाळ काम केले याबाबतची माहिती सेवापुस्तिका याच्या साक्षांकित प्रती मिळणेबाबत. |

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.०९.०५.२०२५ रोजी सुनावणी घेऊन, जन माहिती अधिकारी तथा

सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण अधिकारी बीड यांनी अपिलार्थीस आवश्यक माहिती (वैयक्तिक स्वरुपातील माहिती अधिकार अधिनियम कलम ८(१)(जे) नुसार प्रकट करण्यास अपवाद ठरविण्यात आलेल्या माहिती व्यतीरीक्त ) जसे की मुळ पद, पदभार इत्यादी माहिती संबंधितास आठ दिवसात विनामूल्य देण्यात यावी, असा निर्णय पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगांकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न दिल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती, जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद व अधिनियमातील तरतुदी याचा सारासार विचार करता, प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या दि.०९.००५.२०२५ रोजीच्या उक्त नमूद निर्णयात बदल करण्याची आवश्यकता आयोगास दिसून येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, बीड यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. प्रादेशिक उपसंचालक, इतर मागास बहुजन कल्याण (प्रादेशिक) विभाग, छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र.---19075--- दिनांक :--31/12/25---

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**व्दितीय अपील क्रमांक ०८८३/२०२५ व ०८८४/२०२५**
**बोर्ड क्र. ५३ व ५४**

श्री. संपत शिवाजी सायकड, — अपिलार्थी
रा. आष्टी, ता. आष्टी, जि. बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
उपविभागीय अभियंता,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग, आष्टी, जि.बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, बीड

**(सुनावणी दिनांक ०८.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२८.०२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये दोन व्दितीय अपिले दाखल केलेले आहेत. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, बादाडे डि. एम. उपकार्यकारी अभियंता, सा. बां. विभाग, आष्टी, जि.बीड उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जान्वये हवी असलेली माहिती अपिलार्थी यांना उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. अपिलार्थी यांनी माहिती स्वीकारुन माहिती मिळाली व माहितीबाबत तक्रार व काही शंका निरसन झालेले आहे असे दि.०१.०५.२०२५ रोजी उपविभागीय अभियंता, सा.बां. उपविभाग, यांना आष्टी यांना निवेदन दिलेले आहे ते निवेदन आयोगासमोर सादर केले.

प्रस्तुत प्रकरणात, जन माहिती अधिकारी यांचा उपरोक्त युक्तिवाद व अपिलार्थी यांचे दि.०१.०५.२०२५ रोजीचे लेखी निवेदन विचारात घेता, विचाराधिन व्दितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपिलार्थी यांचे दोन व्दितीय अपिले निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.-----19022----- दिनांक :-31/12/25-----

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १८९७/२०२५ व १८९८/२०२५**
**बोर्ड क्र.५५ व ५६**

श्री. मुहंमद अबुबकर खमर पाशा, — अपिलार्थी
द्वारा कोहीनूर बेकरी बाबा चौक, भालदारपुरा, बीड,
ता.जि. बीड.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
उपविभागीय अभियंता,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग, बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, बीड

**(सुनावणी दिनांक ०८.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१३.०५.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, श्री. सी. पी. बोराडे, उपविभागीय अभियंता, सार्वजनिग बांधकाम उपविभाग, बीड व प्रथम अपिलीय अधिकारी, श्री. आर. पी. तोंडे, कार्यकारी अभियंता, सा.बां.वि.बीड उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| सु. बोर्ड अ.क्र. | द्वितीय अपील क्रमांक | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय/ तपशिल |
|---|---|---|---|
| ५५ | १८९७/२०२५ | २७.१२.२०२४ | १. आपले विभागाकडून शहरातील पर्यटन स्थळाच्या पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी १. दर्गा हजरत शेहंशावाडी २. कंकालेश्वर मंदिर येथे प्रादेशिक पर्यटन विकास योजने अंतर्गत खालील कामाना मंजरी दिली असून ते कामाचे अंदाजपत्रक नकाशा मंजूर निधिचे पत्र काम करणेचे आदेश करारनामा टेंडर एम.बी., सी.सी. ची छायांकित प्रत व इतर.. |

| | | | |
|---|---|---|---|
| ५६ | १८९८/२०२५ | २७.१२.२०२४ | १. शासनाच्या नगर विकास वि. कडून बीड शहरातील विविध ठिकाणी वैशिष्टयपुर्ण कामासाठी विशेष अनुदान देण्यात आले असून एकुण तीन कोटी रु. खर्च करुन बीड नगर परिषदेच्या हद्दीत विविध ठिकाणी सिमेंट कॉंक्रेट रस्ता व नालीचे काम करण्यात आले असून ते सर्व कामाची माहिती छायांकित प्रत मध्ये देण्यात यावे व इतर.. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये विस्तृत व्यापक स्वरुपाची माहिती मागितलेली आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती उपलब्ध करुन दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये मोघम विस्तृत माहिती मागितलेली आहे. नेमका कालावधी नमूद केलेला नाही. अशी माहिती एकत्रित / संकलित करण्याकरिता सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधन सामग्री मोठ्या प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे दोन्ही द्वितीय अपिले निकाली काढण्यात येत आहे.

प्र २।।३

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 19026 दिनांक : 31/12/25

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १९६७/२०२५**
**बोर्ड क्र.५७**

श्री. अब्दुल समद खान पिता मन्सूर खान, — अपिलार्थी
रा. मंडीबाजार अंबाजोगाई, ता. अंबाजोगाई, जि. बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, — : उत्तरवादी क्र.१
सार्वजनिक बांधकाम उपविभाग,
अंबाजोगाई, जि. बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
उप अभियंता,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग, अंबाजोगाई, जि. बीड

**(सुनावणी दिनांक ०८.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१५.०५.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १७.०२.२०२५ | सन १९७३ ते १९७४ या कालावधीतील अंबाजोगाई येथील परळी वेस ते पठाण मांडवा पुर्व-पश्चिम रोड मांडवा पठाण कडे जाणारा हा रस्ता चा केंद्र पासून दोन्ही बाजूने किती फुटाचा रस्ता आहे व रस्त्याची रुंदी किती फुटाची आहे त्याचा तपशील देण्यात यावा. |

प्रस्तुत प्रकरणात, आयोगापुढील कागदपत्रावरुन, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास विहित मुदतीत प्रतिसाद दिला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम १९ (६) चा भंग झालेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन अपिलार्थी यांना माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, अंबाजोगाई, जि. बीड यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.
२. तत्कालीन जन माहिती अधिकारी, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, अंबाजोगाई, जि. बीड यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात विहित मुदतीत कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच **दि.२४.०२.२०२६ रोजी** व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.
३. उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, अंबाजोगाई, जि. बीड यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.
४. अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, धाराशिव यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी कलम १९ (६) चा भंग दिसून येत आहे. म्हणून त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.केंमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१.०३.२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.
५. अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, धाराशिव यांना आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी आयोगास कोणतीही पूर्वसूचना न देता अथवा पूर्व परवानगी न घेता जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी सुनावणीस अनुपस्थित राहिले असल्याने त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.(२२२/१५)/सहा, दि.०१.१२.२०१५ नुसार कार्यवाही करावी.
१. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(स्वाक्षरी)

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

---

**जा.क्र.**--19053-- **दिनांक :**--31/12/2025-- **नोंदणीकृत टपालाद्वारे**

प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता,
अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, धाराशिव

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक २२१८/२०२५**
**बोर्ड क्र.५८**

श्री. शेख अखिल उस्मान, — अपिलार्थी
रा. भंडार गल्ली जुना बाजार, बीड, ता.जि.बीड-४३११२२,
मो. नंबर ९८५०२५५०८६

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — उत्तरवादी क्र.१
उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — उत्तरवादी क्र.२
कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, बीड

**(सुनावणी दिनांक ०८.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०३.०६.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी प्रथम अपिलीय अधिकारी, श्री. आर. जी. तोंडे, कार्यकारी अभियंता, उपस्थित आहेत. अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांना त्यांच्या दि.१९.१२.२०२४ रोजीच्या माहिती अर्जान्वये हवी असलेली माहिती अपिलार्थी यांना उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. अपिलार्थी यांनी माहिती स्वीकारुन माझी काही तक्रार नाही असे दि.०५.१२.२०२५ रोजी निवेदन सादर केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात प्रथम अपिलीय अधिकारी अधिकारी यांचा उपरोक्त युक्तिवाद व अपिलार्थी यांचे दि.०५.१२.२०२५ रोजीचे लेखी निवेदन विचारात घेता, विचाराधिन व्दितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपिलार्थी यांचे व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 19078 दिनांक : 31/12/25

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक २३३५/२०२५**
**बोर्ड क्र.५९**

श्री. मनोहर चिमाजी चाळक, — अपिलार्थी
रा. शास्त्री चौक रोडच्या पश्चिम बाजूस, नगर परिषद कोर्ट रोडच्या दक्षिण बाजूस गेवराई, ता. गेवराई, जि. बीड,
मो. नंबर ८८०५५६२६६९

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
सहाय्यक अभियंता श्रेणी-१,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग, गेरावई, जि. बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, बीड

**(सुनावणी दिनांक ०८.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१३.०६.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांचे वतीने प्रतिनिधी श्री. एस. व्ही. जायभाये उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १४.०२.२०२५ | दि.०१ जानेवारी २०२५ ते आजपर्यंत या कालावधीतील मौजे गेवराई शहर नगर परिषद अंतर्गत कोल्हेर रोड या रस्त्यावर सुरु असलेल्या डांबरी रस्त्याच्या कामाचे अंदाजपत्रकाची प्रत मिळणेबाबत. |

प्रस्तुत प्रकरणात, आयोगापुढील कागदपत्रावरुन, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास विलंबाने प्रतिसाद दिला असल्याचे दिसून येत आहे. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम ७ (१) चा भंग झालेला आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, जन माहिती अधिकारी यांनी अंदाजपत्रकाची माहिती विलंबाने दिलेली आहे. संबंधीत जन माहिती अधिकारी यांना दंड लावण्यात यावा.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, आजपर्यंत माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती विलंबाने मिळाली असल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.१५.०४.२०२५ रोजी सुनावणी घेऊन, जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्त्यास विनामूल्य ०८ दिवसात माहिती पुरवावी असा निर्णय पारित केल्याचे दिसून येत आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी निर्णय दिल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना दि.१७.०४.२०२५ रोजी विलंबाने माहिती उपलब्ध करुन दिल्याचे दिसून येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता श्रेणी-१, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, गेरावई, जि. बीड यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात विहित मुदतीत कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच **दि.२४.०२.२०२६ रोजी** व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.
२. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, बीड यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.
३. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

जा.क्र. 19052 दिनांक : 31/12/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक २८५७/२०२५**
**बोर्ड क्र.६०**

श्री. शेख जाफर चाँद, — अपिलार्थी
मु. पो. केरुळ, ता. आष्टी, जि. बीड,
ह.मु. सुदर्शन नगर, लेन-२,
गुरुकृपा रेसिडेंशी, प्लॅट-१,
पिंपळेगुरव, पुणे-४११०६१,
मो. नंबर-७२७६६६६३६०

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
उप कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, आष्टी, जि. बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.०२, बीड

**(सुनावणी दिनांक ०८.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०४.०७.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी, श्री. बादाडे धनंजय माधवराव, उपकार्यकारी अभियंता, उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २०.०२.२०२५ | ठवण वस्ती ते नहारवस्ती या रस्त्याबाबत खालीलप्रमाणे आठ मुद्याबाबत माहिती मागिलेली आहे., १.रस्त्याची लांबी X रुंदी मोजमाप नकाशा २. रस्ता तयार करण्यासाठी आ. सुरेश धस यांनी दिलेले शिफारस पत्र ३. जयदत्त म.स.सं.म.कडां या संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र ४. शिवरस्ता तयार करण्यासाठी शिव निश्चिती करिता तहसिलदार मंडळ अधिकारी यांचा मंजूरी अहवाल ५. संबंधीत रस्ता तयार करताना झ ाडांची कत्तल करण्यासाठी घेतलेले वनखात्यामार्फतचे मंजूरी पत्र ६. संबंधीत रस्ता तयार करतांना संबंधीत शेतकऱ्यांचे सम्मतीपत्र ७. रस्त्याचे बील अदा केल्याचा तपशील ८. ठवण वस्ती ते नहार वस्तीची लांबी / अंतर तपशील मिळणेबाबत. |

प्रस्तुत प्रकरणात, आयोगापुढील कागदपत्रावरुन, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास विहित मुदतीत प्रतिसाद दिला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम १९ (६) चा भंग झालेला आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, मी सध्या नवीन आहे. काही कालावधी दिल्यास अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती देण्यास नकार देत आहेत, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे अपिलार्थी यांच्या युक्तिवादात व त्यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## <u>आदेश</u>

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, आष्टी,

जि. बीड यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, आष्टी, जि. बीड यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात विहित मुदतीत कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच **दि.२४.०२.२०२६ रोजी** व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी खुलासा सादर न केल्यास, त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.०२, बीड यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

४. अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, धाराशिव यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी कलम १९ (६) चा भंग दिसून येत आहे. म्हणून त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.केंमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१.०३.२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

५. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

जा.क्र. 19051 दिनांक :- 31/12/2025 नोंदणीकृत टपालाद्वारे

प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता,
अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, धाराशिव

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक २८७६/२०२५**
**बोर्ड क्र.६१**

श्री. वैजनाथ ज्ञानोबा गित्ते,
रा. नंदागौळ, ता. परळी वै.जि. बिड — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग, अंबाजोगाई, जि. बीड — उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उप अभियंता,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग, अंबाजोगाई, जि.बीड — उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०८.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०७.०७.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०७.०२.२०२५ | काम सुरु झाल्यापासून आजतागायत या कालावधीतील परळी-नंदागौळ-पुत-जवळगांव-बदापूर या रस्त्याच्या कामाचे एम.बी. रेकॉर्ड, सदर कामावर झालेल्या खर्चाबाबत संबंधित गुत्तेदारास आजपर्यंत देयक अदा करण्यात आले त्या देयकाच्या छायांकित प्रती, कॅशबुकच्या छायांकित प्रती देण्यात याव्यात. सदर देयक चेकद्वारे किंवा आरटीजीएस द्वारे अदा केले असल्यास त्या पावतीच्या छायांकित प्रती देण्यात याव्यात. संबंधीत कामावर आतापर्यंत उपअभियंता, शाखा अभियंता यांचा कालावधीत व संपूर्ण नावासह माहिती देण्यात यावी. |

प्रस्तुत प्रकरणात, आयोगापुढील कागदपत्रावरुन, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास विहित मुदतीत प्रतिसाद दिला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम १९ (६) चा भंग झालेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती अप्राप्त, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे अपिलार्थी यांनी द्वितीय अपित नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, अंबाजोगाई, जि. बीड यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, अंबाजोगाई, जि. बीड यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात विहित मुदतीत कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच **दि.२४.०२.२०२६ रोजी** व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, अंबाजोगाई, जि.बीड यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

४. अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, धाराशिव यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी कलम १९ (६) चा भंग दिसून येत आहे. म्हणून त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.केंमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१.०३.२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

५. अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, धाराशिव यांना आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी आयोगास कोणतीही पूर्वसूचना न देता अथवा पूर्व परवानगी न घेता जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी सुनावणीस अनुपस्थित राहिले असल्याने त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.(२२२/१५)/सहा, दि.०१.१२.२०१५ नुसार कार्यवाही करावी.

६. उपरोक्त निर्देशासह अपील अपिलार्थी यांचे द्वितीय निकाली काढण्यात येत आहे.

(स्वाक्षरी) १५।२।२६

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

---

**जा.क्र.**-19050---- **दिनांक :**-31/12/2025---- **नोंदणीकृत टपालाद्वारे**

प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता,

अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, धाराशिव

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ५१०७/२०२५
बोर्ड क्र.६२

श्री. वासुदेव ज्ञानोबाराव डोंगरे, — अपिलार्थी
रा. बसस्टँड जवळ, केज, ता. केज, जि. बीड
मो. नंबर-९४२३७६२८२२

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी क्र.१
सार्वजनिक बांधकाम उपविभाग, केज, जि. बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
उप अभियंता,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग, केज, जि. बीड

(सुनावणी दिनांक ०८.१२.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.१०.११.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २५.०८.२०२५ | ग्रामपंचायत कार्यालय, मौजे कोठी, ता. केज, जि. बीड अंतर्गत २५/१५ हेड अंतर्गत मंजूर सविस्तर अंदाज पत्रकाच्या सत्यप्रत (सिमेंट रसता/ पांदण रस्ता, शेत रस्ता) व त्या कामावर वापरण्यात आलेल्या मापण पुस्तिकेच्या साक्षांकित प्रती. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, जन माहिती अधिकारी यांनी मला इस्टीमेंटची माहिती दि.१७.१०.२०२५ रोजी दिलेली आहे. मापन पुस्तीकेच्या नोंदीची माहिती दिलेली नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली परिपुर्ण माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, अपुर्ण

माहिती मिळाल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अपुर्ण माहिती मिळाली असल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांचा युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना दि.१७.१०.२०२५ रोजी माहिती दिलेली आहे. सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाल्याचे मान्य केलेले आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने कार्यालयात उपलब्ध असलेली व देय होणारी माहिती दिल्याचे दिसून येत आहे. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांच्या युक्तिवादात व त्यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत नाही. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांचे द्वितीय अपिल निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**<u>आदेश</u>**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र.-----19029----------------- दिनांक :-31/12/25-----------

## राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहितीआयोग,खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे,छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| | |
|---|---|
| बोर्ड क्रं.६३ ते ७३ एकूण ११ प्रकरणे | द्वितीय अपील क्रमांक १४५/२०२५ ते १५०/२०२५, ४८२/२०२५ ते ४८६/२०२५ एकूण ११ प्रकरणे |

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. सलीम कादर शेख,<br>रा. वार्ड नं.४, श्रीरामपूर,<br>जि. अहिल्यानगर (अहमदनगर)-४१३७०९.<br>मो. नंबर-९२२६३९०१९४ | : | अपिलार्थी |

विरुध्द

| सु. बोर्ड क्रं. | द्वितीय अपील क्र. | जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी | उत्तरवादी क्र.१ व २ | उपस्थिती |
|---|---|---|---|---|
| ६३ | १४५/२०२५ | वन क्षेत्रपाल,<br>सामाजिक वनिकरण परिक्षेत्र कार्यालय,<br>माजलगांव, जि. बीड | उत्तरवादी क्र. १ | उपस्थित |
| | | सहाय्यक वनसंरक्षक,<br>सामाजिक वनिकरण विभाग, बी. डी.<br>आदर्श नगर, ऑफिसच्या पाठीमागे,<br>एल.एन.एस.पी. रोड, बीड | उत्तरवादीक्र. २ | प्रतिनिधी उपस्थित |
| ६४ | १४६/२०२५ | वन क्षेत्रपाल, सामाजिक वनिकरण परिक्षेत्र कार्यालय, गेवराई, जि. बीड | उत्तरवादीक्र. १ | उपस्थित |
| | | सहाय्यक वनसंरक्षक,<br>सामाजिक वनिकरण विभाग, बी. डी.<br>आदर्श नगर, ऑफिसच्या पाठीमागे,<br>एल.एन.एस.पी. रोड, बीड | उत्तरवादीक्र. २ | प्रतिनिधी उपस्थित |
| ६५ | १४७/२०२५ | वन क्षेत्रपाल, सामाजिक वनिकरण परिक्षेत्र कार्यालय, केज, जि. बीड | उत्तरवादी क्र.१ | उपस्थित |
| | | सहाय्यक वनसंरक्षक,<br>सामाजिक वनिकरण विभाग, बी. डी.<br>आदर्श नगर, ऑफिसच्या पाठीमागे,<br>एल.एन.एस.पी. रोड, बीड | उत्तरवादी क्र.२ | प्रतिनिधी उपस्थित |
| ६६ | १४८/२०२५ | वन क्षेत्रपाल, सामाजिक वनिकरण परिक्षेत्र कार्यालय, धारुर, जि. बीड | उत्तरवादी क्र.१ | उपस्थित |
| | | सहाय्यक वनसंरक्षक,<br>सामाजिक वनिकरण विभाग, बी. डी. | उत्तरवादी क्र.२ | प्रतिनिधी उपस्थित |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | आदर्श नगर, ऑफिसच्या पाठीमागे, एल.एन.एस.पी. रोड, बीड | | |
| ६७ | १४९/२०२५ | वन क्षेत्रपाल, सामाजिक वनिकरण परिक्षेत्र कार्यालय, आष्टी, जि. बीड | उत्तरवादी क्र.१ | उपस्थित |
| | | सहाय्यक वनसंरक्षक, सामाजिक वनिकरण विभाग, बी. डी. आदर्श नगर, ऑफिसच्या पाठीमागे, एल.एन.एस.पी. रोड, बीड | उत्तरवादी क्र.२ | प्रतिनिधी उपस्थित |
| ६८ | १५०/२०२५ | वन क्षेत्रपाल, सामाजिक वनिकरण परिक्षेत्र कार्यालय, अंबाजोगाई, जि. बीड | उत्तरवादी क्र.१ | उपस्थित |
| | | सहाय्यक वनसंरक्षक, सामाजिक वनिकरण विभाग, बी. डी. आदर्श नगर, ऑफिसच्या पाठीमागे, एल.एन.एस.पी. रोड, बीड | उत्तरवादी क्र.२ | प्रतिनिधी उपस्थित |
| ६९ | ४८२/२०२५ | वन क्षेत्रपाल, सामाजिक वनिकरण परिक्षेत्र कार्यालय, शिरुर कासार, जि. बीड | उत्तरवादी क्र.१ | उपस्थित |
| | | सहाय्यक वनसंरक्षक, सामाजिक वनिकरण विभाग, बी. डी. आदर्श नगर, ऑफिसच्या पाठीमागे, एल.एन.एस.पी. रोड, बीड | उत्तरवादी क्र.२ | प्रतिनिधी उपस्थित |
| ७० | ४८३/२०२५ | वन क्षेत्रपाल, सामाजिक वनिकरण परिक्षेत्र कार्यालय, वडवणी, जि. बीड | उत्तरवादी क्र.१ | उपस्थित |
| | | सहाय्यक वनसंरक्षक, सामाजिक वनिकरण विभाग, बी. डी. आदर्श नगर, ऑफिसच्या पाठीमागे, एल.एन.एस.पी. रोड, बीड | उत्तरवादी क्र.२ | प्रतिनिधी उपस्थित |
| ७१ | ४८४/२०२५ | वनक्षेत्रपाल, सामाजिक वनिकरण परिक्षेत्र, बीड | उत्तरवादी क्र.१ | उपस्थित |
| | | सहाय्यक वनसंरक्षक, सामाजिक वनिकरण विभाग, बी. डी. आदर्श नगर, ऑफिसच्या पाठीमागे, एल.एन.एस.पी. रोड, बीड | उत्तरवादी क्र.२ | प्रतिनिधी उपस्थित |
| ७२ | ४८५/२०२५ | वनक्षेत्रपाल, सामाजिक वनिकरण परिक्षेत्र, पाटोदा, जि. बीड | उत्तरवादी क्र.१ | उपस्थित |
| | | सहाय्यक वनसंरक्षक, सामाजिक वनिकरण विभाग, बी. डी. आदर्श नगर, ऑफिसच्या पाठीमागे, एल.एन.एस.पी. रोड, बीड | उत्तरवादी क्र.२ | प्रतिनिधी उपस्थित |
| ७३ | ४८६/२०२५ | वनक्षेत्रपाल, सामाजिक वनिकरण परिक्षेत्र, परळी वैजीनाथ, जि. बीड | उत्तरवादी क्र.१ | उपस्थित |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | सहाय्यक वनसंरक्षक, सामाजिक वनिकरण विभाग, बी. डी. आदर्श नगर, ऑफिसच्या पाठीमागे, एल.एन.एस.पी. रोड, बीड | उत्तरवादी क्र.२ | प्रतिनिधी उपस्थित |

**( सुनावणीदिनांक ०८.१२.२०२५ )**

अपिलार्थी यांनी दि.०९.०१.२०२५(०६) दि.३०.०१.२०२५ (०५) रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये एकूण ११ द्वितीय अपिले दाखल केलेले आहेत. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी वरील प्रमाणे उपस्थित आहेत. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांचे वतीने प्रतिनिधी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये वेगवेगळया जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे ११ अर्जान्वये माहितीची मागणी केलेली आहे.

| बोर्ड क्रं. | माहिती अर्ज दिनांक | कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील क्रं. | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|---|---|
| ६३ | ३०.०८.२०२४ | ०१४५/२०२५ | दि.०१.०१.२०२४ ते आजतागायत या कालावधीतील आपल्या सामाजिक वनिकरण कार्यालयात माजलगांव, जि. बीड या कार्यालया अंतर्गत वरील कालावधीत मंजूर झालेले कामे त्या कामावर करण्यात आलेले खर्च आणि अदा केलेले बिले यांच्या झेरॉक्स प्रती मिळणेबाबत. |
| ६४ | ३०.०८.२०२४ | ०१४६/२०२५ | दि.०१.०१.२०२४ ते आजतागायत या कालावधीतील अपल्या सामाजिक वनिकरण कार्यालय गेवराई, जि.बीड या कार्यालया अंतर्गत वरील कालावधीत मंजूर झालेले कामे व त्या कामावर करण्यात आलेले खर्च आणि अदा केलेले बिले यांच्या झेरॉक्स प्रती मिळणेबाबत. |
| ६५ | ३०.०८.२०२४ | ०१४७/२०२५ | दि.०१.०१.२०२४ ते आजतागायत या कालावधीतील अपल्या सामाजिक वनिकरण कार्यालय केज, जि.बीड या कार्यालया अंतर्गत वरील कालावधीत मंजूर झालेले कामे व त्या कामावर करण्यात आलेले खर्च आणि अदा केलेले बिले यांच्या झेरॉक्स प्रती मिळणेबाबत. |
| ६६ | ३०.०८.२०२४ | ०१४८/२०२५ | दि.०१.०१.२०२४ ते आजतागायत या कालावधीतील अपल्या सामाजिक वनिकरण कार्यालय धारुर, जि.बीड या कार्यालया अंतर्गत वरील कालावधीत मंजूर झालेले कामे व त्या कामावर करण्यात आलेले खर्च आणि अदा केलेले बिले यांच्या झेरॉक्स प्रती मिळणेबाबत. |

| | | | |
|---|---|---|---|
| ६७ | ३०.०८.२०२४ | ०१४९/२०२५ | दि.०१.०१.२०२४ ते आजतागायत या कालावधीतील अपल्या सामाजिक वनिकरण कार्यालय आष्टी, जि.बीड या कार्यालया अंतर्गत वरील कालावधीत मंजूर झालेले कामे व त्या कामावर करण्यात आलेले खर्च आणि अदा केलेले बिले यांच्या झेरॉक्स प्रती मिळणेबाबत. |
| ६८ | ३०.०८.२०२४ | ०१५०/२०२५ | दि.०१.०१.२०२४ ते आजतागायत या कालावधीतील अपल्या सामाजिक वनिकरण कार्यालय अंबाजोगाई, जि.बीड या कार्यालया अंतर्गत वरील कालावधीत मंजूर झालेले कामे व त्या कामावर करण्यात आलेले खर्च आणि अदा केलेले बिले यांच्या झेरॉक्स प्रती मिळणेबाबत. |
| ६९ | ३०.०८.२०२४ | ०१४८/२०२५ | दि.०१.०१.२०२४ ते आजतागायत या कालावधीतील अपल्या सामाजिक वनिकरण कार्यालय शिरुर, जि.बीड या कार्यालया अंतर्गत वरील कालावधीत मंजूर झालेले कामे व त्या कामावर करण्यात आलेले खर्च आणि अदा केलेले बिले यांच्या झेरॉक्स प्रती मिळणेबाबत. |
| ७० | ३०.०८.२०२४ | ०४८३/२०२५ | दि.०१.०१.२०२४ ते आजतागायत या कालावधीतील अपल्या सामाजिक वनिकरण कार्यालय वडवणी, जि.बीड या कार्यालया अंतर्गत वरील कालावधीत मंजूर झालेले कामे व त्या कामावर करण्यात आलेले खर्च आणि अदा केलेले बिले यांच्या झेरॉक्स प्रती मिळणेबाबत. |
| ७१ | ३०.०८.२०२४ | ०४८४/२०२५ | दि.०१.०१.२०२४ ते आजतागायत या कालावधीतील अपल्या सामाजिक वनिकरण कार्यालय बीड, ता. जि.बीड या कार्यालया अंतर्गत वरील कालावधीत मंजूर झालेले कामे व त्या कामावर करण्यात आलेले खर्च आणि अदा केलेले बिले यांच्या झेरॉक्स प्रती मिळणेबाबत. |
| ७२ | ३०.०८.२०२४ | ०४८५/२०२५ | दि.०१.०१.२०२४ ते आजतागायत या कालावधीतील अपल्या सामाजिक वनिकरण कार्यालय पाटोदा, जि.बीड या कार्यालया अंतर्गत वरील कालावधीत मंजूर झालेले कामे व त्या कामावर करण्यात आलेले खर्च आणि अदा केलेले बिले यांच्या झेरॉक्स प्रती मिळणेबाबत. |
| ७३ | ३०.०८.२०२४ | ०४८६/२०२५ | दि.०१.०१.२०२४ ते आजतागायत या कालावधीतील अपल्या सामाजिक वनिकरण कार्यालय परळी वै., जि.बीड या कार्यालया अंतर्गत वरील कालावधीत मंजूर झालेले कामे व त्या कामावर करण्यात आलेले खर्च आणि अदा केलेले बिले यांच्या झेरॉक्स प्रती मिळणेबाबत. |

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी अवगत केले की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती देण्याचे आदेशीत करुनही जन माहिती अधिकारी यांनी मला अद्यापपर्यंत कोणतीच माहिती दिलेली नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीच्यावेळी वरीलप्रमाणे उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी एकाच तारखेला एकसारखी माहिती वेगवेगळया विभागाकडे एकूण ११

अर्ज केलेले आहेत. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची मागणी केलेली आहे. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांना वेळोवेळी माहितीचे अवलोकन करुन माहिती हस्तगत करावे कसे कळविले आहे. तथापि अपिलार्थी यांनी कोणताही प्रतिसाद दिलेला नाही. मनुष्यबळ कमी असल्यामुळे अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाला विहित मुदतीत प्रतिसाद देण्यास विलंब होत आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या ११ प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती देण्यास टाळाटाळ केली, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलाथी यांनी विस्तृत व मोघम माहिती मागितल्याचे दिसून येत आहे. अशी माहिती एकत्रित / संकलित करण्याकरिता सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधन सामग्री मोठ्या प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाही. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे अकरा द्वितीय अपिले निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./ 19080 /दि. 31/12/25

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १९८९/२०२५**
**बोर्ड क्र.७४**

श्री. तांदळे सुनिल जनार्धन, अपिलार्थी
रा. येवलवाडी (ना.), पो. पाटोदा,
ता. पाटोदा, जि. बीड-४१४२०४
मो. नंबर-९९७५४७५७०७

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक),
वनपरिक्षेत्र आष्टी, ता. आष्टी, जि. बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
विभागीय वन अधिकारी (प्रादेशिक),
वन विभाग, लेंढी रोड, बीड

**(सुनावणी दिनांक ०८.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१९.०५.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी, श्री. ए.डी. मुंडे, वनपरिक्षेत्र अधिकारी, आष्टी उपस्थित आहेत. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २४.१२.२०२४ | सन २०२१-२२ ते २४ डिसेंबर २०२४ अखेर पर्यंत या कालावधीतील नियत क्षेत्र पिंपरखेड मधील विविध योजने अंतर्गत झालेल्या कामाची एकूण सहा मुद्याबाबत माहिती व इतर.. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती देण्याचे आदेशीत करुनही जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपर्यंत माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, मी सध्या नवीन आहे. कार्यालयात संचिकेचा शोध घेऊन अपिलार्थी यांना देय होणारी माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलाथी यांनी विस्तृत व मोघम माहिती मागितल्याचे दिसून येत आहे. अशी माहिती एकत्रित / संकलित करण्याकरिता सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधन सामग्री मोठ्या प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 18178 दिनांक : 24.12.2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

व्दितीय अपील क्रमांक १९९७/२०२५
बोर्ड क्र.७५

श्री. नंदू सुकदेव बैसाणे, अपिलार्थी
रा. महाले नगर मोगलाई, धुळे-४२४००१.
मो. नंबर-९९२३९२७७४४

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
वनपरिक्षेत्र अधिकारी (वजी), नायगाव,
ता. पाटोदा, जि. बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
सहा. वनसंरक्षक (व.जी.), पैठण,
विभागीय वन अधिकारी कार्यालय,
चुन्नीलाल पेट्रोल पंपाजवळ, छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक ०८.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१९.०५.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये व्दितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, श्री. अशोक नागोराव काकडे, वनपरिक्षेत्र अधिकारी (वजी), नायगाव व प्रथम अपिलीय अधिकारी, श्रीमती प्र. वि. मोरे, सहा. वनसंरक्षक (वजी) पैठण, उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०३.०९.२०२५ | दि.०१ मार्च २०२४ पासून ते आजपर्यंत आपल्या रेंजमध्ये कोण-कोणती कामे करण्यात आली कोण-कोणत्या योजना राबविण्यात आल्या त्यांची माहिती योजनांचे नाव, वर्क ऑर्डर, एम.बी. बुक, कॅश बुक, मंजूरी बिले निघालेली बिले यांची छायांकित प्रतीत माहिती देण्यात यावी. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी

मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असल्याने त्यांना दि.०१.०४.२०२५ रोजीच्या पत्रान्वये, आपणास हवी असलेल्या माहितीचे अवलोकन करण्यासाठी आपण दि.१५.०४.२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता या कार्यालयात हजर रहावे. महिती पहाणी दरम्यान आपणास जे कागदपत्रे हवे असतील त्याची रितसर कार्यवाही करुन ते कागदपत्र आपणास पुरविण्यात येतील असे कळविण्यात आले होते. तथापि अपिलार्थी यांनी कोणताही प्रतिसाद दिलेला नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, कोणताही आदेश व माहिती प्राप्त नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना दि.०१.०४.२०२५ रोजी माहितीचे अवलोकन करुन माहिती हस्तगत करावे असे कळविण्यात आले होते. तथापि अपिलार्थी यांनी प्रतिसाद दिल्याचे दिसून येत नाही. अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जाद्वारे व्यक्तिश: माहिती मागितलेली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार व्यक्तिश: माहितीची मागणी केल्यानंतर त्या संदर्भातील पुढील घडामोडी, माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी लागणारे आवश्यक ते शुल्क, माहितीचा तपशील इत्यादी प्राप्त करुन घेणे हे अर्जदाराचे संपूर्ण उत्तरदायित्व असते. यावरुन अपिलार्थी यांना माहिती हस्तगत करण्यामध्ये स्वारस्य असल्याचे दिसून येत नाही. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपिल निकाली काढण्यात येत आहे.

प्र.२।।३

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.---18179--- दिनांक :---24.12.2025---

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ३६३२/२०२५**
**बोर्ड क्र.७६**

श्री. कैलास दत्तात्रय दरेकर,
रा. आष्टी, ता. आष्टी, जि. बीड,
मो. नंबर-९७३०८०११०४ — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय आष्टी (प्रा.), जि. बीड — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विभागीय वन अधिकारी, बीड — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०८.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०४.०८.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी, श्री.ए. डी. मुंडे, वनपरिक्षेत्र अधिकारी, आष्टी (प्रा.) उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०३.०६.२०२५ | सन २०२१-२०२२-२३-२४-२५ या कालावधीतील कामांचे कार्यारंभ आदेश, तसेच प्रशासकीय मान्यता तसेच या काळातील कॅशबुक प्रती साक्षांकित देण्यात याव्यात. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अगवत केले की, मी सध्या नवीन आहे. माहिती संकलीत करुन अपिलार्थी यांना आवश्यक असलेली माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये,

माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती मोघम विस्तृत स्वरुपाची आहे. तथापि अशा स्वरुपातील माहिती एकत्रित / संकलित करण्याकरिता सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधनसामग्री मोठ्या प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ७ (९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

---

**जा.क्र.**-18180------ **दिनांक :**-24.12.2025----

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ३६४३/२०२५**
**बोर्ड क्र.७७**

श्री. शेख जाफर चाँद, — अपिलार्थी
रा. स.नं.८०/३/२/१ सुदर्शन नगर,लेन-२, गुरुकृपा रेसिडेन्सी
फलॅट नंबर.०१, पिंपळगुरव, पुणे-४११ ०६१.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
वन परिक्षेत्र अधिकारी, आष्टी (प्रा.) खडकत रोड,
आष्टी, जि. बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
विभागीय वन अधिकारी, बीड

**(सुनावणी दिनांक ०८.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०५.०८.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी, श्री. ए. बी. मुंडे, वनपरिक्षेत्र अधिकारी आष्टी (प्रा.) उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १९.०५.२०२५ | १. दि.०५.०४.२०२५ च्या अर्जानुसार केलेल्या पंचनाम्याची प्रत मिळणेबाबत २. सदर पंचनाम्यानुसार केलेल्या कारवाईची तपशीलवार माहिती (छायांकित प्रत) मिळणेबाबत ३. पंचनामा केलेला दिनांकासह माहिती मिळणेबाबत,४. तोडलेल्या झाडांची संख्या व झाडांचा प्रकार यांची तपशील माहिती मिळणेबाबत. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अगवत केले की, मी सध्या नवीन आहे. माहिती संकलीत करुन अपिलार्थी यांना आवश्यक असलेली माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न दिल्याबाबत, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर ३०.०७.२०२५ रोजी सुनावणी घेऊन, जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा.), आष्टी यांनी सदर आदेश प्राप्त होताच ०७ दिवसाच्या आत अपिलार्थीस अवलोकनास्तव बोलवावे व देय असणारी माहिती उपलब्ध करुन द्यावी, असा निर्णय पारित केल्याचे दिसून येत आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती देण्याचे आदेशीत करुनही जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिली नाही याबाबीची आयोगाने गंभीर दखल घेतलेली आहे. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांनी केलेल्या युक्तिवादात व त्यांनी नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी, आष्टी (प्रा.) खडकत रोड, आष्टी, जि. बीड यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.
२. विभागीय वन अधिकारी, बीड यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.
३. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.---1818---------- दिनांक :---24.12.2025---

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ३६४५/२०२५**
**बोर्ड क्र.७८**

श्री. जरीफा बेगम रहीम शेख, — अपिलार्थी
रा. दर्गा मसजिद के पास, बालेपीर, बीड
मो. नंबर ७४६७४९३३०३

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
मुख्यलेखापाल,
विभागीय वन अधिकारी (प्रादेशिक), खासबाग लेंडी रोड, बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
विभागीय वन अधिकारी,
विभागीय वन अधिकारी कार्यालय, खासबाग लेंडी रोड, बीड

**(सुनावणी दिनांक ०८.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०५.०८.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी, श्री. एस. डी. भांगे, मुख्य लेखापाल, वि.व.अ.बीड उपस्थित आहेत. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांचे वतीने प्रतिनिधी, श्री.ए.डी.मुंडे, वन परिक्षेत्र अधिकारी,आष्टी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०३.०२.२०२५ | दि.०१ जानेवारी १९९३ ते दि.२१.११.२००९ पर्यंत शेख रहीम शेख अमरी हे आपल्या कार्यालयामध्ये नोकरी करत असताना यांच्या नावाची सर्व्हिसबुक मध्ये नोंद असलेल्या दस्ताऐवजांची माहिती मिळणेबाबत. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अगवत केले की, अपिलार्थी यांनी कार्यालयात उपलब्ध राहून माहितीचे अवलोकन करावे आवश्यक असलेली माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल असे कळविण्यात आले होते. तथापि अपिलार्थी यांनी कोणताही प्रतिसाद दिलेला नाही. त्यांनी कोणीतरी नातेवाईकांना (त्रयस्थ व्यक्तींना) कार्यालयात पाठविले होते.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न दिल्याबाबत, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे अपिलार्थी यांच्या युक्तिवादात व त्यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा मुख्यलेखापाल, विभागीय वन अधिकारी (प्रादेशिक), बीड यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.
२. विभागीय वन अधिकारी, विभागीय वन अधिकारी कार्यालय, बीड यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.
३. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 18176 दिनांक :- 24.12.2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ४८७५/२०२५ व ४८७६/२०२५**
**बोर्ड क्र.७९ व ८०**

श्री. प्रविण कचरु वाव्हळ, अपिलार्थी
मु. पो. क्वळपुरी, ता. पारनेर, जि. अहिल्यानगर-४१४१०३,
मो. नंबर ९७३०१९७२४१

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
वनपरिक्षेत्र अधिकारी, शिरुर कासार, जि. बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
सहाय्यक वनसंरक्षक,
सामाजिक वनीकरण, बीड

**(सुनावणी दिनांक ०८.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२८.१०.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपिलें दाखल केलेले आहेत. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, श्रीमती आर. एस. बांगर, वनपरिक्षेत्र अधिकारी, शिरुर कासार उपस्थित आहेत. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांचे वतीने प्रतिनिधी, श्री.गणेश शेवाळे, वनरिक्षेत्र अधिकारी, सामाजिक वनीकरण, बीड उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| सु.बोर्ड अ.क्र. | द्वितीय अपील क्रमांक | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जाती विषय/ तपशिल |
|---|---|---|---|
| ७९ | ४८७५/२०२५ | ०५.०७.२०२५ | १. ब्रश कटर व ब्लोअर खरेदीची एकूण संख्या २. खरेदीची दिनांक वार माहिती व संबंधित बीलांची छायांकि प्रत (invoice/ challan), ३. या खरेदीसाठी वापरण्यात आलेला निधी कोणत्या योजनेअंतर्गत आहे याची माहिती. ४. सदर खरेदीसंदर्भात केलेले पेमेंट व त्याचे व्हाउचर / देयक प्रत (Payment vouchers/ bills) ५. जर कोणतीही रक्कम अजून प्रलंबित असेल तर त्या प्रलंबित देयकांची माहिती व संबंधित फायलींच्या |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | छायांकित प्रती. |
| ८० | ४८७६/२०२५ | ०५.०७.२०२५ | १. नर्सरी पॉली बॅग शीट खरेदीची एकूण प्रमाण, २. खरेदी दिनांकवार माहिती व संबंधित एकूण प्रमाण ३. या खरेदीसाठी वापरण्यात आलेला निधी कोणत्या योजनेअंतर्गत आहे याची माहिती ४. सदर खरेदी संदर्भात केलेले पेमेंट व त्याचे व्हाउचर/ देयक प्रत (payment vouchers/ bill) ५. जर कोणतीही रक्कम अजून प्रलंबित असेल, तर त्या प्रलंबित देयकांची माहिती व संबंधित फायलींच्या छायांकित प्रती. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहितीचे अवलोकन करुन माहिती उपलब्ध करुन घेण्याबाबत कळविण्यात आले होते. तथापि अपिलार्थी यांनी कोणताही प्रतिसाद दिलेला नाही.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.२२.०९.२०२५ रोजी सुनावणी घेऊन, जन माहिती अधिकारी तथा वनपक्षेत्रपाल, सामाजिक वनीकरण, शिरुर का. हे गैरहजर असल्यामुळे तसेच अपिलार्थी हे सुध्दा गैरहजर असल्यामुळे सदर अपील अर्ज निकाली काढण्यात येत आहे. असा निर्णय पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न मिळाल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.२२.०९.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केल्याचे दिसून येत आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती, जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद व अधिनियमातील तरतुदी याचा सारासार विचार करता, प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या उक्त नमूद निर्णयात बदल करण्याची आवश्यकता आयोगास दिसून येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**<u>आदेश</u>**

अपिलार्थी यांचे दोन द्वितीय अपिले निकाली काढण्यात येत आहे.

(स्वाक्षरी)

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

---

**जा.क्र.**- 18182 ------ **दिनांक :**- 24.12.2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ०२७६/२०२५**
**बोर्ड क्र.८१**

श्री. रामभाऊ सिताराम आंबलकर, — अपिलार्थी
रा. आर. एस. आंबुलकर, प्लॉट नं.१६, रमानगर,
(८५ प्लॉट ऐरिया), बेलरोडी रोड, नागपूर-४४००२७.
मो. नंबर ९४२२१०७१४२

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
पोलीस निरीक्षक,
जिल्हा विशेष शाखा पोलीस अधिक्षक कार्यालय, बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
पोलीस उप अधिक्षक (मुख्यालय),
पोलीस अधिक्षक कार्यालय, बीड

**(सुनावणी दिनांक ०८.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२०.०१.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी प्रथम अपिलीय अधिकारी, श्री. देविदास भागवत, गात, पो.उप अधिक्षम (मु.), बीड उपस्थित आहेत. अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २२.०८.२०२४ | महाराष्ट्र राज्य शासनाच्या गृह विभागाने जारी केलेल्या दि.२० सप्टेंबर २०२२ च्या शासन निर्णयानुसार कोरोना काळातील प्रतिबंधात्मक आदेशाचे उल्लंघन झाल्यामुळे दाखल करण्यात आलेले खटले परत घेण्याविषयी आदेश झाले होते. या दिनांक २०.०९.२०२२ च्या आदेशाचे अनुपालन कितपत झाले हया शुध्द भावनेने सार्वजनिक हिताचे दृष्टी ने अर्जदाने दि.१४.०६.२०२३ ला पोलीस महासंचालंक मुंबई याना माहिती अधिकारात जोडपत्र अ सादर करुन पूर्ण राज्याच माहिती मागितली होती. |

| | |
|---|---|
| | पोलीस महासंचालक, मुंबई यांचे कार्यालयात जन माहिती अधिकारी श्रीमती स्मिता नायर यांनी अर्जदाराला कळविले की, सदरची माहिती हवी असल्यास संबंधीत जिल्हयातील जन माहिती अधिकारी यांना स्वतंत्र अर्ज करुन आपणास हवी असलेली माहिती उपलब्ध करुन घेणे योग्य होईल, असे कळविल्यामुळे आपल्या कार्यालयाकडून माहिती देण्यात यावी. स्मिता नायर यांचे पत्र जोडले आहे. तरी खालील मुद्यांवर माहिती देण्यात यावी, आपल्या जिल्हयातील सर्व पोलीस स्टेशनची एकत्रित माहिती देण्यात यावी व इतर.. |

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.१४.११.२०२४ रोजी सुनावणी घेऊन, जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक, जिल्हा विशेष शाखा, पोलीस अधीक्षक कार्यालय यांनी यांचे पत्र क्र.जिविशा/जिविशा-माहिती अधिकार/माहिती-८७९३ बीड, दि.०९.११.२०२४ अन्वये एकूण (०१) प्रत अपिलार्थी यांच्या पत्यावर पोस्टाने पाठविण्यात येत आहे, सदर अपील निकाली काढण्यात येत आहे असा निर्णय पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाप्रमाणे दि.१४.११.२०२५४ रोजी माहिती पाठविल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत नाही. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.---18777--- दिनांक :- 24.12.2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ०४२१/२०२५**
**बोर्ड क्र.८२**

श्री. प्रतीक नवनाथ सरवदे, अपिलार्थी
रा. महात्मा फुलेनगर, धानोरा रोड, बीड,
मो. नंबर-९९७५३६७१४३.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
कार्यालय अधिक्षक,
पोलीस अधिक्षक कार्यालय,बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
पोलीस उप अधिक्षक (मुख्या.), बीड

**(सुनावणी दिनांक ०८.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२७.०१.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी प्रथम अपिलीय अधिकारी, श्री. देविदास भागवत गात, पो. उप अधि. (मु.), बीड उपस्थित आहेत. तसेच जन माहिती अधिकारी यांचे वतीने प्रतिनिधी, सोनाली शंकर तांबे, वश्रेलि, अधीक्षक पोलीस अधिक्षक कार्यालय, बीड उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २४.०६.२०२४ | बीड शहरातील पोलीस अधिक्षक कार्यालया मार्फत बसविण्यात येणाऱ्या CCTV कॅमेऱ्याबाबत, प्रशासकीय मान्यता, अंदाजपत्रक, दरपत्रक कार्यारंभ आदेश, इ-निवीदा, टिप्पणीसह संपूर्ण संचिका पहावयास उपलब्ध करुन द्यावी. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असल्याने कार्यालयात उपस्थित राहून माहितीचे अवलोकन करावे असे कळविण्यात आले होते. तथापि अपिलार्थी यांनी कोणताही प्रतिसाद दिलेला नाही.

तदनंतर अपिलार्थी यांना दि.०६.११.२०२४ रोजीच्या पत्रान्वये व व्हाट्सअप द्वारे ८९ पृठांची माहिती पाठविण्यात आलेली आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अगवत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.१२.११.२०२४ रोजी सुनावणी घेऊन, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना दि.०६.११.२०२४ अन्वये एकूण (८९) प्रती अपिलार्थी यांच्या पत्यावर पोस्टाने व व्हाट्सअप द्वारे पाठविण्यात येत आहे, सदर अपिल निकाली काढण्यात येत आहे, असा निर्णय पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, परिपुर्ण माहिती उपलब्ध करुन दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी युक्तिवाद केल्याप्रमाणे अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिल्याचा पुरावा आयोगाच्या पटलावर सादर केलेले नाही. अपिलार्थी यांनी माहितीची पाहणी करण्यास मागणी केलेली आहे. अपिलार्थी यांना माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक, पोलीस अधिक्षक कार्यालय,बीड यांनी अपिलार्थी यांच्या सर्व जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं. ०५.००) करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. पोलीस उप अधिक्षक (मुख्या.), बीड यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र.- 402 दिनांक :- 19/1/26

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ०६००/२०२५**
**बोर्ड क्र.८३**

श्री. महादेव भिमराव केंद्रे, — अपिलार्थी
रा. भोजनकवाडी, पो. धर्मापुरी,
ता. परळी (वै.), जि. बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
पोलीस निरिक्षक, पोलीस स्टेशन,
परळी वै. ग्रामीण, जि. बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
उप विभागीय पोलीस अधिक्षक,
उपविभाग, अंबाजोगाई, जि. बीड

**(सुनावणी दिनांक ०८.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०६.०२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, श्री. एम.ए.सय्यद, पोलीस निरिक्षक उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०८.०१.२०२५ | ३०७ प्रमाणे जी कार्यवाही १८ लोकांवर झालेल्या कार्यवाहीची नक्कल मिळणेबाबत. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांना देय होणारी माहिती दि.२७.०७.२०२४ रोजी पाठविण्यात आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, सुनावणी घेतली नाही,माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि.२७.०७.२०२४ रोजी माहिती पाठविलेले आहे. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

जा.क्र.- 408 दिनांक :- 14/1/26

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १३११/२०२५**
**बोर्ड क्र.८४**

श्री. रमेश भागचंद शिंदे,
रा. भोसे, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर,
ह.मु. पाईपालाईनरोड, सावेडी, अ.नगर,
मो. नंबर-९६२३०५७१६७ — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा, कार्यालय अधिक्षक, पोलीस अधिक्षक कार्यालय, बीड — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप अधिक्षक (मुख्यालय), बीड — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०८.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२८.०३.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी, श्री. देवीदास भागवत गात, पोउपअधी(मु.), बीड उपस्थित आहेत. तसेच जन माहिती अधिकारी यांचे वतीने प्रतिनिधी, सोनाली शंकर तांबे, वरिष्ठ श्रेणी लिपीक, उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १४.१०.२०२४ | दि.१९.०१.२०२४ ते आजपावेतो या कालावधीतील माझी पत्नी कु. राणी दुर्गाजी ऊर्फ सौ. राणी रमेश शिंदे हिने माझ्या विरुध्द महिला सेल, बीड यांचेकडे दाखल केलेल्या तक्रार/फिर्यादीबाबत सदर नोटीसची मला बजावणी करणेकामी पाथर्डी पोलीस स्टेशन, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर यांचेकडे जी नोटीस पाठविली होती, ती नोटीस व त्याबाबतच्या संपूर्ण अहवालाची प्रमाणित प्रत मिळणेबाबतच्या संपूर्ण अहवालाची प्रमाणित प्रत मिळणेबाबत मी आपणाकडे माहिती अधिकार २००५ अन्वये माहिती मागितली होती. परंतु आपण मला सविस्तर माहिती न देता मला, दिनांक २५.०१.२०२४ रोजी व दि.०८.०२.२०२४ रोजीच्या सूचना पत्राच्या प्रमाणीत प्रती मला दिलेल्या आहेत. व इतर..दोन मुद्याबाबत. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, जन माहिती अधिकारी यांनी मला विलंबाने माहिती दिलेली आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी अगवत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती व कार्यालयात उपलब्ध असलेली देय होणारी माहिती त्यांना दि.०७.०१.२०२५ रोजी पाठविण्यात आलेली आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.०८.०१.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, संपूर्ण माहिती न देता जाणीवपुर्वक अपुर्ण व अर्धवट माहिती दिल्याने, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी विलंबाने माहिती मिळाली असल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद व घेतलेला निर्णय आयोगास योग्य दिसून येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

प्र २।। ६

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

---

**जा.क्र.** 409 **दिनांक :** 19/1/26

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १४६९/२०२५**
**बोर्ड क्र.८५**

श्री. वैजनाथ शामराव सुरवसे, — अपिलार्थी
रा. गांधी मार्केट स्टेशन रोड, परळी (वै.), ता. परळी वै., जि.
बीड- मो. नंबर ९१११२८७१२१२

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
पोलीस निरिक्षक, पोलीस स्टेशन परळी, वै., जि. बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
पोलीस निरिक्षक, पोलीस स्टेशन परळी वैजीनाथ, जि. बीड

**(सुनावणी दिनांक ०८.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१५.०४.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी यांचे वतीने प्रतिनिधी, श्री.शुभम रामहरी घुले, पोलीस अमलदार उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २४.०१.२०२५ | १. गुन्हा रजिस्टर नंबर १९३/२०१६ दाखल गुन्हयानुसार कलम १४३,३४१,१८८ भादवि व १३५ मुंबई पोलीस कायदा अन्वये दाखल असलेल्या गुन्हयानुसार शेतकऱ्याच्या विविध मागण्याकरिता गैर कायदयाची मंडळी जमून तहसीलदार यांच्या कक्षाचा दरवाजा बाहेरुन लावून त्यास कुलूप जावून त्यांना बाहेर येण्यास मज्जाव केला तसेच जिल्हा दंडाधिकारी याची बीड यांची कलम ३७ एक (१) तीन (३) उल्लंघन केले म्हणून दोषारोप दाखल करण्यात आले व न्यायालयात ही प्रकरण दाखल २. वरील पैकी सदरील दाखल झालेल्या संबंधित गुन्हेगारावर दाखल एफ आर ची नांवासहित माहिती व ३. गुना नंबर २९३/२०१६ च्या व्यतिरिक्त आपल्या पोलीस स्टेशन या ठिकाणी वरील आरोपीच्या विरुध्द इतर गुन्हे दाखल असतील त्या गुन्हयाची संपूर्ण माहिती व दाखल केलेल्या एफ आर च्या व चार शिटच्या संपूर्ण नकला व व्यापारच्या ओरिजनल प्रति देण्यात याव्यात. |

प्रस्तुत प्रकरणात, आयोगापुढील कागदपत्रावरुन, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास विहित मुदतीत प्रतिसाद दिला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय

अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम १९ (६) चा भंग झालेला आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती संकलीत करुन आज रोजी सोबत आणलेली आहे. आज अपिलार्थी अनुपस्थित आहेत. आपल्या आदेशाप्रमाणे अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, अद्याप माहिती दिलेली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमुद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी, पोलीस निरिक्षक, पोलीस स्टेशन परळी, वै., जि. बीड यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी, पोलीस निरिक्षक, पोलीस स्टेशन परळी, वै., जि. बीड यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात विहित मुदतीत कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच **दि.२४.०२.२०२६ रोजी** व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. पोलीस निरिक्षक, पोलीस स्टेशन परळी, वै., जि. बीड यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

४. अपर पोलीस अधिक्षक, पोलीस अधिक्षक कार्यालय, बीड यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी कलम १९ (६) चा भंग दिसून येत आहे. म्हणून त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.केमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१.०३.२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

५. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

---

जा.क्र. 19048 दिनांक : 31/12/2025 नोंदणीकृत टपालाद्वारे

प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता,

अपर पोलीस अधिक्षक, पोलीस अधिक्षक कार्यालय, बीड

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १४७०/२०२५**
**बोर्ड क्र.८६**

श्री. वैजनाथ शामराव सुरवसे, — अपिलार्थी
रा. मातोश्री ज्युस सेंटर मलबा हॉस्पीटल शेजारी भवानी रोड,
तुळजापूर, ता. तुळजापूर, जि. धाराशिव-
मो. नंबर-९११२८७१२१२

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
सहाय्यक पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन, दिंद्रुड,
ता. माजलगांव, जि. बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
पोलीस निरीक्षक,
पोलीस स्टेशन धारुर, ता. धारुर, जि. बीड

**(सुनावणी दिनांक ०८.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१५.०४.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, श्री. महादेव किसनराव ढाकणे, सहाय्यक पोलीस निरीक्षक, उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २४.०१.२०२५ | दि.०१ जाने २००८ ते दि.२०.०१.२०२५ आजतागायत या कालावधीतील १. गुन्हा रजिस्टर नंबर २९/२००८ दाखल गुन्हयानुसार कलम १४७,१४८,१४९,३५३,३३२,३३७,३३६ भा.द.वी. गुन्हयानुसार दाखल एफ आर आर धारुर येथील पंचायत समितीच्या सभापतीच्या निवडीवरुन मौजे तेलगाव येथील कैकाडी वस्तीच्या परिसरात आरोपींना गैर कायदयाची मंडळी जमवून गर्दी व दंगा करुन एकमेकांना दोन्ही गटांनी दगडफेक करुन गोळीबार करुन पोलीस जीपवर दगडफेक करुन तोडून नुकसान केले म्हणून सदरील एम आय आर दाखल २. |

| | |
|---|---|
| | वरीलपैकी सदरील दाखल झालेल्या गुन्हयाची संपूर्ण सविस्तर व विस्तारित गुन्हयाची चार शिट दाखल झालेल्या गुन्यासहित माहिती व दाखल झालेल्या संबंधित गुन्हेगारावर दाखल एफ आर ची नावांसहित माहिती व इतक्यानिशी एफ आय आर देण्यात यावे. ३. गुना नंबर २९/२००८ च्या व्यतिरिक्त आपल्या पोलीस स्टेशन या ठिकाणी वरील आरोपीच्या विरुध्द इतर गुन्हे दाखल असतील त्या गुन्हयाची संपूर्ण माहिती व दाखल केलेल्या एफ आय आर च्या व चार शिट च्या संपूर्ण नक्कला व एफ आर च्या ओरिजनल प्रति नावासहित देण्यात याव्यात. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांना दि.१९.०३.२०२४ रोजी देय होणारी माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिलेली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात जन माहिती अधिकारी यांचा युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन दिल्याचे दिसून येत आहे. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.- 410 दिनांक :- 19/1/26

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १४७२/२०२५ व १४७३/२०२५**
**बोर्ड क्र.८७ व ८८**

श्री. वैजनाथ शामराव सुरवसे, — अपिलार्थी
रा. हॉटेल शिव जगदंब मलबा हॉस्पिटल शेजारी भवानी रोड
तुळजापूर, ता. तुळजापूर, जि. धाराशिव,
मो. नंबर-९११२८७१२१२

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
सहा. पोलीस निरिक्षक,
पोलीस स्टेशन बर्दापूर, ता. अंबाजोगाई, जि. बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
पोलीस निरीक्षक,
पोलीस स्टेशन बर्दापूर, ता. अंबाजोगाई, जि. बीड

**(सुनावणी दिनांक ०८.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१५.०४.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपिले दाखल केलेले आहेत. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, श्री. ज्ञानेश्वर शंकरराव कांबळे, सहा. पोलीस निरिक्षक, उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| सु. बोर्ड अ.क्र. | द्वितीय अपील क्रमांक | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जाती विषय/ तपशिल |
|---|---|---|---|
| ८७ | १४७२/२०२५ | २४.०१.२०२५ | दि.०१ जानेवारी २०१९ ते दि.२०.०१.२०२५ या कालावधीतील १. गुन्हा रजिस्टर नंबर ५४/२०१९, दाखल गुन्हयानुसार कलम नंबर ४२०, ४६८, ४६८, ४६४,४७१ सह ३४भादवी मौजे पुस येथील बलखंडी देवस्थानची शासकीय जमीन शासनाच्या अधिकाऱ्यासोबत संगनमत करुन सदरील जमिनीचे खोटे खरेदीखत विकत केले |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | म्हणून प्रथम खबर अहवाल दाखल व दोषारोप दाखल माननीय सर्वोच्च न्यायालयाचे आदेशाने प्रकरण स्थगित का करण्यात आले त्याबाबतचा संपूर्ण माहिती दाखल करण्यात आलेला चार शिट व दाखल झालेल्या एफ आर च्या ओरिजनल सही शिक्कयांशी प्रत व माहिती देण्यात यावी २. वरील पैकी सदरील दाखल झालेल्या संबंधित गुन्हेगारावर दाखल एफ आर ची नावासहित माहिती व संपूर्ण चारशेच्या माहितीसह ओरिजनल नकला देण्यात याव्यात, ३. गुना नंबर ५४/२०१९ च्या व्यतिरिक्त आपल्या पोलीस स्टेशन या ठिकाणी वरील आरोपीच्या विरुध्द इतद गुन्हे दाखल असतील त्या गुन्हयाची संपूर्ण माहिती व दाखल केलेल्या एफ आर च्या व चार शिटच्या संपूर्ण नकला व व्यापारच्या ओरिजनल प्रति देण्यात याव्यात. |
| ८८ | १४७३/२०२५ | २४.०१.२०२५ | दि.०१ जाने २०१३ ते दि.२०.०१.२०२३आजतागायत या कालावधीतील १. गुन्हा रजिस्टर नंबर १३५/२०२३ दाखल असलेल्या गुन्हयानुसार कलम ४२०,४०६,४०९,४१८ सह ३४ भा.द.पी कलम तीन महाराष्ट्र ठेविदाराचे संरक्षण कायदा तसेच कलम १३(१) (क) (ड) १३ (२) लाच लुचपत प्रतिबंधक कायदयानुसार दाखल गुन्हयानुसार संत जगमित्र सहस सूतगिरणी टोकवाडी तालुका परळी हिचे अध्यक्ष व संचालक मंडळाने संगमत करुन बँकेला संस्थेचे ॲसेट व स्टॉक महाल कापूस व सूतगिरणी याचे कारण देऊन बँकेकडून कॅश क्रेडिट क्लीन कर्जाचे पैसे मुदतीत परत पेटीच्या अटीवर कर्जाचे घेतलेले रुपये तीनशे लाख मुदतीत भरणा करण्याची हमी असतानाही स्वत:च्या फायदयासाठी आर्थिक लाभासाठी अप्रामाणिकपणे लबाडीने बँकेच्या कर्जाच्या व्याजासह १३ कोटी ३७ लाख परतफेड न करता बँकेचे फसवणूक केली म्हणून गुन्हा व सदरील पहिली खबर प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी परळी यांच्या कोर्टात दाखल तसेच स्वत:च्या फायदयासाठी बँक सांगली व ठेवीदाराच्या हिताचे रक्षण केले नाही म्हणून लोकसेवक म्हणून काम करत असताना पदाचा व अधिकाराचा दुरुपयोग करुन गैरप्रकार केला व सार्वजनिक पैशाचा गैरव्यवहार/ अपहर केला म्हणून दोषारोप एफ आर दाखल व न्यायाला दाखल तरी सदरील आरोपीवर केला व सार्वजनिक गुन्हयाची व्यापारसह दाखल करण्यात आलेल्या संपूर्ण चार शीट सह ओरिजनल माहिती सही शिक्यानिशी देण्यात यावी व इतर दोन मुद्याबाबत.. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांना दि.१९.०२.२०२५ व दि.०३.०४.२०२५ रोजी अशी दोन वेळेस देय होणारी माहिती

उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिलेली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात जन माहिती अधिकारी यांचा युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने माहिती उपलब्ध करुन दिल्याचे दिसून येत आहे. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांचे दोन्ही द्वितीय अपिले निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे दोन्ही द्वितीय अपिले निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.- 411 दिनांक :- 14/1/26

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १६७९/२०२५**
**बोर्ड क्र.८९**

श्री. बाबासाहेब ज्योतीराम शिंदे,
रा. चिंचगव्हाण, ता. माजलगांव, जि.बीड — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
उपविभागीय पोलीस अधिकारी,
उपविभाग, माजलगांव, जि. बीड — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
सहाय्यक पोलीस अधिकारी,
उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, माजलगांव,
जि. बीड — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०८.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२९.०४.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व त्यांचे विधीज्ञ उपस्थित आहेत. तसेच जन माहिती अधिकारी यांचे वतीने प्रतिनिधी, श्री. एस. एन. राठोड, पोउपनि पो.ठा.माजलगांव उपस्थित आहेत.प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ११.१०.२०२४ | दि.१३.०२.२०२४ या तारखेला तक्रारी अर्ज दाखल केला होता, तसेच दि.१९.०४.२०२४ रोजी आपल्या कार्यालयात तक्रार अर्ज दाखल आहे. तक्रार अर्जावरती आपण केलेल्या कार्यवाहीची माहिती मिळणेबाबात. मौजे चिंचगव्हाण येथील गट नं.७ अ मधील मी खरेदी केलेली जागा बनावट कागदपत्रांच्या आधारे हडप करण्याचा प्रयत्न करणारांना प्रतिबंध करणेबाबतची माहिती मिळणेबाबत व इतर.. |

प्रस्तुत प्रकरणात, आयोगापुढील कागदपत्रावरुन, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या

माहिती अर्जास विहित मुदतीत प्रतिसाद दिला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम ७ (१) चा भंग झालेला आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी व त्यांचे विधीज्ञ यांनी अवगत केले की, जन माहिती अधिकारी यांनी चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिली. माहिती अर्जान्वये मागणी केलेली परिपुर्ण माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिल सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांना माहिती देण्यात आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, समाधानकारक व पुर्ण माहिती मिळाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती अपुर्ण व दिशाभूल करणारी मिळाली असल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना परिपुर्ण माहिती मिळाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे अपिलार्थी यांच्या युक्तिवादात व त्यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, उपविभाग, माजलगांव, जि. बीड यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, उपविभाग, माजलगांव, जि. बीड यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात विहित मुदतीत कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच **दि.२४.०२.२०२६ रोजी** व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. सहाय्यक पोलीस अधिकारी, उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, माजलगांव, जि. बीड यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

४. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

प्र २।।६

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

जा.क्र. 19049 दिनांक : 31/12/2025 नोंदणीकृत टपालाद्वारे

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक २२५६/२०२५**
**बोर्ड क्र.९०**

श्री. वामन एकनाथ उगले, — अपिलार्थी
रा. प्रगती चाळ नं.२, रुम नं.४, घर नं.८६८६,
सावंत पार्कच्या पाठीमागे, खदानजवळ,
महालक्ष्मीनगर, अंबरनाथ (पुर्व), जि. ठाणे-४२१५०१.
मो. नंबर-९८५०२५१५६९

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
पोलीस निरिक्षक,
जिल्हा विशेष शाखा पोलीस अधिक्षक कार्यालय, बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
जिल्हा पोलीस अधिक्षक,
पोलीस अधिक्षक कार्यालय, बीड

**(सुनावणी दिनांक ०८.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०६.०६.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी प्रथम अपिलीय अधिकारी, श्री. देवीदास भागवत गात, पोउपअधि (मु.), बीड उपस्थित आहेत. अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १३.०१.२०२५ | बीड जिल्हयात आत्मसंरक्षण (स्वरक्षण) करण्यासाठी देण्यात आलेले सर्व शस्त्र परवाना धारकांची यादी, परवाना असलेल्यांची व नसलेल्यांची यादी, विना परवानगी शस्त्र वापरत असलेल्यांची यादी, गृहमंत्री यांचे आदेशान्वये जप्त केलेल्या परवानाधारक यांची यादी. |

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.०७.०४.२०२५ रोजी सुनावणी घेऊन, जन माहिती अधिकारी तथा जिल्हा विशेष शाखा, पोलीस अधिक्षक कार्यालय हे हजर होते. अपिलार्थी यांना जा.क्र.जिविशा/माहिती अधिकार/२०२५-२५६७ बीड, दि.०७.०४.२०२५ अन्वये एकूण (१) प्रत अपिलार्थी यांनी नमूद केलेल्या पत्यावर पोस्टाने पाठविण्यात येत आहे. सदर अपील निकाली काढण्यात आले असा निर्णय पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, अपुर्ण चुकीची दिशाभूल करणारी माहिती दिल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी दि.०५.१२.२०२५ रोजी सादर केलेला लेखी युक्तिवाद आयोगाच्या पटलावर सादर केलेला आहे. सदर लेखी युक्तिवादाचे अवलोकन केले असता, माहिती पुरविण्यात मुद्दाम हेतुपूरस्सर टाळाटाळ करीत आहेत असे नमूद केल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे अपिलार्थी यांना माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांना माहितीचे अवलोकन देवून आवश्यक माहिती देण्यात यावी, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरिक्षक, जिल्हा विशेष शाखा पोलीस अधिक्षक कार्यालय, बीड यांनी अपिलार्थी यांच्या सर्व जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं. ०५.००) करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. जिल्हा पोलीस अधिक्षक, पोलीस अधिक्षक कार्यालय, बीड यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. ९१२ दिनांक : 14/1/26

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक २३३४/२०२५**
**बोर्ड क्र.९१**

सौ. मनिषा धनंजय देशपांडे, अपिलार्थी
रा. पवारवाडी, विठ्ठल मंदिराजवळ, त्रिमुर्ती निवास,
चाळीसगांव (जळगांव)-४२१४०१.
मोबाईल नंबर-७९९७४१६९८२

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
पोलीस निरिक्षक, पोलीस ठाणे, गेवराई, जि. बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
उपविभागीय पोलीस अधिकारी,
उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, गेवराई, जि. बीड

**(सुनावणी दिनांक ०८.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१३.०६.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच, आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी,श्री. किशोर पवार, पोलीस निरीक्षक, पोलीस ठाणे, गेवराई, जि.बीड उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १५.१२.२०२४ | १. दि.०१.०९.२०२२ ते दि.०१.१२.२०२४ पर्यंतच्या बीड ते गेवराई बस प्रवासा दरम्यान घडलेल्या चोरीच्या घटना, त्या संदर्भात उघड झालेले गुन्हे रिकव्हरी केसेस तपासावर असलेल्या केसेस, निकाली काढण्यात आलेल्या केसेस याचा तपशिल मिळावा.<br>२. गेवराई पो. स्टे. गु. र. नं. ५२५/२०२२ या दाखल केसची सद्यस्थिती याची तपशिलवार माहिती मिळावी सदर केसमध्ये तपशिलवार अहवाल मिळावा. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, जन माहिती अधिकारी यांनी विलंबाने माहिती दिलेली आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अगवत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांना दि.१७.०३.२०२५ रोजीच्या पत्रान्वये माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, अद्याप कोणतीही माहिती दिलेली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती विलंबाने मिळाली असल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना दि.१७.०३.२०२५ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेले आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 413 दिनांक : 14/1/26

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ३९७३/२०२५ ते ३९७५/२०२५**
**बोर्ड क्र.९२ ते ९४**

श्री. महारुद्र राजेंद्र डोईफोडे, — अपिलार्थी
रा. राजमुद्रा प्रतिष्ठान शिवाजी धांडे नगर बार्शी रोड, बीड
मोबाईल नंबर-९६०४५३९७४४

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
पोलीस अधिक्षक,
पोलीस अधिक्षक कार्यालय, बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
पोलीस उप अधिक्षक (मुख्या.), बीड

**(सुनावणी दिनांक ०८.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२६.०८.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये तीन द्वितीय अपिले दाखल केलेले आहेत. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी,श्री. देवीदास भागवत गात, पोउपअधी (मुख्या), बीड उपस्थित आहेत. तसेच जन माहिती अधिकारी यांचे वतीने प्रतिनिधी, सोनाली शंकर तांबे, वरिष्ठ, श्रेणी लिपीक, उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| सु. बोर्ड अ.क्र. | द्वितीय अपील क्रमांक | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जाती विषय/ तपशिल |
|---|---|---|---|
| ९२ | ३९७३/२०२५ | २७.०५.२०२५ | दि.०१.०१.२०२२ ते दि.२२.०५.२०२५ या कालावधीत पोलीस कल्याण निधीतून केलेला खर्च किती व कसा केला याची लेखी स्वरुपात माहिती मिळण्यास विनंती. २. दि.०१.०१.२०२२ ते दि.२७.०५.२०२५ या कालावधीत मा. पोलीस अधिक्षक यांच्या बंगल्यावर दुरुस्तीसाठी केलेला खर्च याची लेखी स्वरुपात माहिती मिळण्यास विनंती. |
| ९३ | ३९७४/२०२५ | २९.०५.२०२५ | दि.०१.०१.२०२५ ते दि.२९.०५.२०२५ या कालावधीतील पोलीस अधिक्षक कार्यालय व पोलीस मुख्यालय येथे लावण्यात आलेलया झाडांच्या कुंडया किती मागवल्या |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | आहेत. प्रति कुंडची किंमत व एकूण झाडे लावण्यासाठी केलेला खर्च याची लेखी माहिती मिळण्यास विनंती. |
| १४ | ३९७५/२०२५ | ३०.०५.२०२५ | सन २०२५ व त्यापूर्वीचा या कालावधीतील बीड जिल्हयातील एकूण पोलीस अंमलदार यांची संख्या, अ.क्र. पोलीस अंमलदार/ग्रेड पोउपनि यांचे नाव व हुद्दा व बक्कल नंबर, रुजू दिनं ाक, आज पावेतो कर्तव्य बजाविलेले पोलीस ठाणे/ शाखा, त्या त्या पोलीस स्टेशनच्या/ शाखेचा नियुक्ती/ रुजू दिनांक अशा तक्ता करुन माहिती मागितलेली आहे व इतर.. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जान्वये त्यांना दि.०२.०७.२०२५ रोजीच्या पत्रान्वये, अर्जदार यांनी मागणी केलेली माहिती अधिकार अधिनियम कलम ८(१)(त्र) अन्वये देणे शक्य होणार नाही, दि.११.०७.२०२५ रोजीच्या पत्रान्वये अर्जदार यांनी मागितलेली माहिती ही व्यापक जनहिताची नसल्याने सदरची माहिती नाकारण्यात येत आहे. तसेच दि.०२.०७.२०२५ रोजीच्या पत्रान्वये, अर्जामध्ये नमूद माहिती हे संबंधित पोलीस अंमलदार यांचा वैयक्तिक अभिलेख असल्यामुळे शासन निर्णय क्रमांक संकिर्ण २०१२/९८९/प्र.क्र.४७९/सहा/ दिनांक १७.१०.२०१४ मधील तरतुदीनुसार त्रयस्थ पक्षाची माहिती देय होत नाही असे तीन्ही माहिती अर्जान्वये अपिलार्थी यांना वेगवेगळया तारखेला कळविण्यात आलेले आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या तीन्ही प्रथम अपिलावर दि.०८.०८.२०२५ रोजी सुनावणी घेऊन, जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही कायम ठेवून तीन्ही प्रथम अपील निकाली काढलेले आहे, असा निर्णय पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न दिल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने वेळोवेळी जन माहिती अधिकारी यांनी माहिती / माहितीची वस्तुस्थिती कळविण्यात आलेली आहे. ही बाब विचारात घेता, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद व घेतलेला निर्णय आयोगास योग्य दिसून येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे तिन्ही द्वितीय अपिले निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.----419---------- दिनांक :---16/1/26---------

(सु. बोर्ड अ.क्र.१२ ते १४ द्वितीय अपील क्रमांक ३९७३ ते ३९७५/२०२५-०३ २/२)

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ४२९८/२०२५ ते ४३००/२०२५**
**बोर्ड क्र.९५ ते ९८७**

श्री. भगवान विष्णूपंत ठोंबरे,
रा. चेंबर नं.ए-४०७, ए-विंग बिल्डींग, ॲडव्होकेट चेंबर बिल्डींग, उच्च न्यायालय परिसर, एन-३, सिडको छत्रपती संभाजीनगर-४३१००९,
मो.नंबर-७५८८१२०५७/ ९३५६९०६४९७ — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
पोलीस निरिक्षक,
पोलीस ठाणे, गेवराई, जि. बीड — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
सहा. पोलीस अधीक्षक,
उपविभाग केज, जि. बीड — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०८.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१८.०९.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये तीन द्वितीय अपिले दाखल केलेले आहेत. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, श्री. किशोर पवार, पोलीस निरीक्षक उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| सु. बोर्ड अ.क्र. | द्वितीय अपील क्रमांक | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय/ तपशिल |
|---|---|---|---|
| ९५ | ४२९८/२०२५ | ०९.१२.२०२४ | दि.०५.०६.२०२४ ते दि.०९.१२.२०२४ या |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | कालावधीतील १. अर्जदार यांच्या दि.०७.०६.२०२४ रोजीच्या तक्रारीच्या अनुषंगाने एस.टी. डेपो गेवराई येथे दिलेल्या पत्राची छायांकित प्रमाणित प्रत, सही, शिक्का, आवक जावक क्रमांकासह मुदतीत देण्यात यावी.<br>२. अर्जदार यांच्या दि.०७.०६.२०२४ रोजीच्या तक्रारीच्या अनुषंगाने एस. टी. डेपो, अंबाजोगाई येथे दिलेल्या पत्राची छायांकित प्रत, सही, शिक्का, आवक जावक क्रमांकासह मुदतीत देण्यात यावी. |
| ९६ | ४२९९/२०२५ | २९.१०.२०२४ | दि.०५.०६.२०२४ ते दि.२७.०९.२०२४ या कालावधीतील १. जा.क्र.३०३८/२०२४ दिनांक २७.०९.२०२४ रोजीच्या पत्रामधील अनुक्रमांक २ समोर अर्ज क्रमांक समोर २२०/२०२४ आ.क्र.२२७८/२०२४ दिनांक ०३.०८.२०२४ स्थानिक अर्ज क्र.९५ आ.क्र.१६६४/२०२४ दि.०७.०८.२०२४ या नोंदी असलेल्या रजिष्टरच्या पानाची छायांकित प्रत देण्यात यावी. |
| ९७ | ४३००/२०२५ | ०१.०२.२०२५ | दि.०५.०६.२०२४ ते दि.०१.०२.२०२५ या कालावधीतील १. जनरल डायरी, २. स्टेशन डायरी ३. डेली डायरी वरील अनुक्रमांक १ ते ३ मध्ये वर्णन केलेल्या डायरी पैकी ज्या डायरीमध्ये दिनांक ०७.०६.२०२४ रोजीच्या अर्जदारासच्या तक्रारीची नोंद केली त्याची छायांकित प्रमाणित प्रत मुदतीत देण्यात यावी. किंवा ईतर ज्या डायरी मध्ये तक्रारीची नोंद केली त्याची छायांकित प्रमाणित प्रत मुदतीत देण्यात यावी. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांना दि.१७.०३.२०२५, दि.२४.०२.२०२५ तसेच दि.१७.०३.२०२५ रोजी पोस्टाने माहिती पाठविण्यात आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, चुकीचे कारण देऊन माहिती देण्यास नकार, चुकीची माहिती दिली व प्रमाणित प्रत मुदतीत दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात जन माहिती अधिकारी यांचा युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना परिपुर्ण माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या तिन्ही प्रथम अपिलावर दि.१५.०५.२०२५ व दि.१९.०६.२०२५सुनावणी घेऊन, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना मागणी केलेली माहिती अभिलेखावर उपलब्ध असलेली माहिती पुरविण्यात यावी, व पुरविण्यात आलेल्या माहितीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा तसेच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना मागणी केलेली माहिती अभिलेखावर उपलब्ध असलेली माहिती पुर्ण व स्पष्ट स्वरुपात

पुरवण्यात यावी, व पुरविण्यात आलेल्या माहितीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा, असा निर्णय पारित केल्याचे दिसून येत आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आदेशीत केल्यानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती, जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद व अधिनियमातील तरतुदी याचा सारासार विचार करता, प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या तीन्ही उक्त नमूद निर्णयात बदल करण्याची आवश्यकता आयोगास दिसून येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरिक्षक, पोलीस ठाणे, गेवराई, जि. बीड यांनी अपिलार्थी यांच्या तीन्ही जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती (वर उक्त नमूद प्रमाणे) आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. सहा. पोलीस अधीक्षक, उपविभाग केज, जि. बीड यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे तीन्ही द्वितीय अपिले निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 415 दिनांक : 16/1/26

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ४५४८/२०२५**
**बोर्ड क्र.९८**

श्री. साळवे प्रशांत राजू, — अपिलार्थी
मु. पो. कडा, ता. आष्टी, जि. बीड.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन, आष्टी, जि. बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
उप विभागीय पोलीस अधिकारी,
उप विभागीय पोलीस अधिकारी उप विभाग, आष्टी, जि. बीड

**(सुनावणी दिनांक ०८.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०६.१०.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संब्रंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, श्री. शरद ज्ञानदेव भुतेकर, पो.नि.पो.स्टे.आष्टी,उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २६.०७.२०२५ | जुन २०२५ ते आज रोजी पर्यंत या कालावधीतील कडा O.P.ला जो दुरुस्ती केलेली आहे, नविन दालन बनविण्यात आलेले आहे त्याचा खर्च कुठल्या फंडातून केलेला आहे. कुठल्या अधिकारी यांच्या लेखी आदेशाने काम सुरु केले, केला गेलेला एकूण खर्चाची रक्कम साहित्य खरेदीची साक्षांकित देयके, कारगीर यांना रक्कम कोणत्या पध्दतीने अदा केले व किती या संदर्भात लेखी पुरावे. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांना दि.२६.०९.२०२५ रोजीच्या पत्रान्वये, वैयक्तिक संबंधित असल्याने माहिती अधिनियम २००५ कलम ८(१)(ज) नुसार अंतर्भूत केले प्रमाणे आपण मागितलेली माहिती खाजगी बाबीत

आगंतुक हस्तक्षेप करील अशी वैयक्तिक तपशिला संबंधातील माहिती आपणास देय नाही असे कळविण्यात आलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न मिळाल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाप्रमाणे अपिलार्थी यांना दि.२६.०९.२०२५ रोजीच्या पत्रान्वये माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यामुळे अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोनजात तथ्यांश दिसून येत नाही. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 416 दिनांक : 14/1/26

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ४६३१/२०२५ व ४६३२/२०२५**
**बोर्ड क्र.९९ व १००**

श्री. शाहुराव दादाराव निकाळजे, — अपिलार्थी
रा. पिंपळवाडी, ता.जि. बीड.मो. नंबर-९६७३३७०७७०

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
पोलीस निरिक्षक, पोलीस स्टेशन नेकनूर, ता.जि. बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
उपविभागीय पोलीस अधिकारी,
उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, केज, जि. बीड

**(सुनावणी दिनांक ०८.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१९.१०.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. तसेच जन माहिती अधिकारी यांच वतीने प्रतिनिधी, श्री. ए.जी. सय्यद, पो.कॉ.१९३९ स्टे. नेकनूर उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र- "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| सु. बोर्ड अ.क्र. | द्वितीय अपील क्रमांक | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जाती विषय/ तपशिल |
|---|---|---|---|
| ९९ | ४६३१/२०२५ | १२.०५.२०२५ | माझ्या विरुध्द दाखल केलेले तक्रार अर्ज आपल्या पोलीस ठाण्यास प्राप्त झालेले असून सदर अर्जाची व त्यावर केलेल्या कार्यवाहीबाबतचे दस्तऐवज यांच्या साक्षांकित प्रती |
| १०० | ४६३२/२०२५ | २६.०४.२०२५ | सौ. दिपा लाला निकाळजे हिने आरोपी श्री. दिपक अंकूश निकाळजे यांनी माझी पुतनी कु. समीक्षा लाला निकाळजे हिचे अपहरण व जीवे मारण्याचा कट रचल्यामुळे नियमानुसार गुन्हा दाखल करण्यासाठी मा. पोलीस अधिक्षक साहेब, बीड अग्रेषित तथा मा. वरिष्ठ पोलीस निरिक्षक साहेब नेकनूर पोलीस ठोणे नेकनूर यांना प्रतिलिपी केलेल्या दि.०६.०१.२०२५ रोजीच्या अर्जाच्या अनुषंगाने मला खालीलप्रमाणे सहा मुद्याद्वारे माहिती मागितलेली आहे.१. दि.०६.०१.२०२५ रोजीचा तक्रार अर्ज |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | आपल्या कार्यालयात प्राप्त झालेल्या आवक/जावक रजिस्टरची छायांकित प्रत व इतर ५.. मुद्याबाबत.. |

प्रस्तुत प्रकरणात, आयोगापुढील कागदपत्रावरुन, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास विहित मुदतीत प्रतिसाद दिला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम ७ (१) चा भंग झालेला आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने देय होणारी माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिलेली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना परिपुर्ण माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे अपिलार्थी यांच्या युक्तिवादात व त्यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरिक्षक, पोलीस स्टेशन नेकनूर, ता.जि. बीड यांनी अपिलार्थी यांच्या दोन्ही जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरिक्षक, पोलीस स्टेशन नेकनूर, ता.जि. बीड यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात विहित मुदतीत कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच **दि.२४.०२.२०२६ रोजी** व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. उपविभागीय पोलीस अधिकारी, उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, केज. जि. बीड यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

४. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे दोन द्वितीय अपिले निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 19047 दिनांक : 31/12/2025 नोंदणीकृत टपालाद्वारे

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ४७१७/२०२५**
**बोर्ड क्र.१०१**

श्री. विजय ज्ञानोबा साळवे, — अपिलार्थी
मु. पो. फुलेपिंपळगाव,
ता. माजलगांव, जि. बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
पोलीस उपनिरीक्षक,
पोलीस स्टेशन माजलगांव, जि.बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
उपविभागीय पोलीस अधिकारी,
उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, माजलगांव,
जि. बीड

**(सुनावणी दिनांक ०८.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१५.१०.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी,श्री. एस.एम. राठोड, पोलीस उपनिरिक्षक, उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १०.०५.२०२५ | श्री. चक्रधर कठाळू पोटभरे रा. केसापुरी कॅम्प ता. माजलगांव जि.बीड यांने दि.१९.०३.२०२५ रोजी दिलेल्या (तु या शेतामध्ये यायचे नाही, हे आमचे शेत आहे, असे म्हणून मला विनाकारण शिवीगाळ करुन जीवे मारण्याची धमकी दिली.) या आशयाच्या तक्रारीवरुन (फिर्यादीवरुन) दिनांक २५.०३.२०२५ रोजी विजय ज्ञानोबा साळवे, बुध्दभूषण ज्ञानोबा साळवे, ज्ञानोबा सुखदेव साळवे, यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल केले, सदर दाखल करण्यात आलेल्या गुन्हयांची सत्यता व तथ्यता अविष्कृत होण्यासाठी तक्रारीचा एकच मुख्य मुद्दा केंद्रीभूत ठेवून त्या मुद्याच्या अनुषंगाने एकूण २० मुद्याबाबत माहिती मागितलेली आहे. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जान्वये त्यांना दि.११.०६.२०२५ रोजीच्या पत्रान्वये, एन सी ची प्रत उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती देण्यास टाळले, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी एका माहिती अर्जामध्ये अनेक विषयाची माहिती मागितल्याचे दिसून येत आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ३(क) प्रमाणे एक अर्ज केवळ एका विषयांशी संबंधीत आवश्यक आहे. तथापि याठिकाणी अपिलार्थी यांनी तसे केल्याचे दिसून येत नाही. परंतु जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि.११.०६.२०२५ रोजी विहित तदतुदनुसार देय होणारी माहिती /माहितीची वस्तुस्थिती अपिलार्थीस अवगत केल्याचे दिसून येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.----417---- दिनांक :---15/1/26---

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ४८४५/२०२५**
**बोर्ड क्र.१०२**

श्री. विलास किसनराव ढोले, — अपिलार्थी
रा. बार्शी नाका, बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
पोलीस निरिक्षक, पोलीस ठाणे, पेठ, बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
उपविभागीय पोलीस अधिकारी, उपविभाग, बीड

**(सुनावणी दिनांक ०८.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२७.१०.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे वतीने प्रतिनिधी श्री. साईनाथ एकनाथ बारगळ, पोलीस उपनिरिक्षक, व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे वतीने प्रतिनिधी श्री.शकिल सय्यद, पोलीस उपनिरिक्षक, उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ११.०८.२०२५ | दि.११.०८.२०२५ ते दि.२६.०८.२०२५ या कालावधीतील CCTV चे तपशील खालीलप्रमाणे फुटेज मिळणेबाबत, पोलीस ठाणे पेठ बीड येथील साक्षीदार आरोपीचे जबाब त्या दिनांकाचे |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी ६८ दिवसानंतरची माहिती देता येत नाही असे कळविलेले आहे. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी अगवत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांना दि.०२.०९.२०२५ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या

कलम ८ पोटकलम (त्र) प्रमाणे नाकारण्यात येत आहे असे कळविण्यात आलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती देण्यास नाकारली आहे, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे अपिलार्थी यांच्या युक्तिवादात व त्यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे. अपिलार्थी ज्या कालावधीमध्ये पोलीस स्टेशनला आले त्या कालावधीतील फक्त अपिलार्थी यांच्याशी संबंधित CCTV फुटेज देण्यात यावे, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरिक्षक, पोलीस ठाणे, पेठ, बीड यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती (वर नमूद केल्याप्रमाणे) आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत (वर नमूद केल्याप्रमाणे) अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. उपविभागीय पोलीस अधिकारी, उपविभाग, बीड यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.- 418 दिनांक :- 14/1/26

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ५२१९/२०२५**
**बोर्ड क्र.१०३**

श्री. केशव दादाराव तांदळे, अपिलार्थी
मु. पो. वंजारवाडी, ता.जि.बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
उप कार्यकारी अभियंता (प्र.),
सार्वजनिक बांधकाम विभाग, आष्टी, जि. बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.०२,बीड

**(सुनावणी दिनांक ०८.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१४.११.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यांनुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी, श्री. बादाडे डी. एम., उपकार्यकारी अभियंता, सा. बां. विभाग, आष्टी, जि. बीड उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०७.०६.२०२४ | श्री. प्र.म. मार्कंडेय कार्यकारी अभियंता येथे नियुक्ती कार्यकाळातील कार्यारंभ आदेश प्रशासकिय मान्यता आदेश, अदा केलेले देयके कामाची मोजमाप पुसितका (एम.बी.), कॅशबुक इ.. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अगवत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जान्वये दि.०९.०७.२०२४ रोजी कलम २(च) नुसार देता येत नाही असे कळविण्यात आलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न दिल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे अपिलार्थी यांच्या युक्तिवादात व त्यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे. अपिलार्थी यांना वेळ व दिनांक निश्चित करुन अवलोकन देऊन माहिती देण्यात यावी, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता (प्र.), सार्वजनिक बांधकाम विभाग, आष्टी, जि. बीड यांनी अपिलार्थी यांच्या सर्व जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं. ०५.००) करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.०२,बीड यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 419 दिनांक : 14/1/26